होळकर सरकार पुस्तकमाला.

पुस्तक १[illegible] वें.

# पुष्पांजलि.

कविः—नरहर शंकर रहाळकर.

होळकर सरकार पुस्तक-माला.
पुस्तक १५ वें.

—:o:—

# पुष्पांजलि.

कविः—
नरहर शंकर रहाळकर, बी. ए.
इंदूर.

प्रकाशकः—मेसर्स बी. वारुणे आणि कंपनी,
जुना तोफखाना मेन रोड, इंदूर.

मुद्रकः—अनंत आत्माराम मोरमकर,
श्रीलक्ष्मीनारायण प्रेस, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

*Poetry is the spontaneous overflow of powerful feelings.*

Wordsworth.

[ सर्व हक्क ग्रंथकर्त्यांचे स्वाधीन. ]

किंमत १ रुपया ४ आणे.

# अभिप्राय.

**पुष्पांजलिः**—होळकर सरकारच्या आश्रयानें इंदुरास जी पुस्तकमाला प्रसिद्ध होत असते तिच्यांतील हें पंधरावें पुस्तक होय. नरहर शंकर रहाळकर यांच्या कविता काव्यरत्नावली, मासिक मनोरंजन व मल्लारिमार्तण्ड इत्यादि मासिकांतून आणि वृत्तपत्रांतून वेगवेगळया प्रसंगीं प्रसिद्ध झाल्या असून त्या वाचणारांनीं रहाळकरांची गणना सत्कवींत पूर्वींच करून ठेविली आहे. पण एकएकटें फूल हुंगण्यापेक्षां अनेक फुलांची एकत्र गुंफलेली माला त्यांच्या सुगंधाची परीक्षा करण्यास केव्हांहि अधिक सोयीस्कर होय. या दृष्टीनें रहाळकरांची काव्यसुमनें अंजलीभर एकत्र हुंगण्यास मिळाली ही फार चांगली गोष्ट झाली.

सहृदयता हा कवीचा प्रधान गुण होय आणि तो रहाळकरांच्या कवितेंत सर्वत्र आढळतो. या सहृदयतेस भावनेची जोड मिळाल्यामुळें त्यांच्या कवितेंत रसपरिपोष चांगला झाला आहे. यांतील कविता शृंगार, वीर व करुण अशा विविधरसांनीं युक्त असून त्यांपैकीं 'विधवांचें गाऱ्हाणें,' 'माझी आई, व 'होळकरांचा कटका' या कविता विशेष सरस आहेत. बहुतेक कविता कवीनं वयाच्या १६ ते २२ वर्षीपर्यंत रचल्या असल्यानें त्यांतील भावना उत्कट असतील हें सांगावयास नकोच.

पुणें
ता. ६-१०-२१.

न. चिं. केळकर.

# 'पुष्पांजली'चा आमोद !

" जुन्यांतुनिच जें नवें निघत तें मना तोषवी "

—रहाळकर.

( पुष्पांजलि. पृ. ११६. श्लोक ४३ )

आपल्या इष्टदेवतेस किंवा एखाद्या पूजनीय विभूतीस अर्पण करण्यासाठीं म्हणून भाविक भक्तानें जुळविलेल्या 'पुष्पांजली'चा स्वीकार करण्याचा खरा अधिकार जरी त्या देवतेचा किंवा त्या पूजनीय विभूतीचाच असतो आणि त्यांनीं केलेल्या स्वीकारानेंच त्या पुष्पांजलिसमर्पणाची खरी सांगता होते. तथापि, तो पुष्पांजलिसमर्पणाचा मंगलकारक व आनंददायक विधि पहाण्याचा सुयोग लाभलेल्या एखाद्या निकटवर्ती प्रेक्षकाला, त्या 'अञ्जलीं'-तून बाहेर दरवळणाऱ्या आल्हादजनक 'आमोदा'चा आस्वाद व परामर्ष घेण्यास कांहीं प्रत्यवाय नसतो आणि त्यांत औचित्य-भंगही होत नाहीं.

या न्यायानें, श्री **शारदा** देवी आणि गुणग्राही व काव्यरस-कोविद वाचकविभूति यांना अर्पण करण्यासाठीं तयार केलेल्या 'पुष्पांजली'चें पूर्वदर्शन तिच्या सन्मान्य कर्त्यांनीं मला आपले-पणाच्या नात्यानें करविलें असतां, तिच्या मनोहर सुगंधाचा जो आल्हादजनक 'आमोद' मला आगाऊ आस्वादावयास सांपडला व तदनुषंगानें माझ्या मनांत सामान्यतः काव्यासंबंधानें जे कांहीं स्फुट

विचार उद्भूत झाले, त्यांचें अल्प दिग्दर्शन, '**पुष्पांजली**' कर्त्यांच्या विशेष उत्कट व निरपेक्ष प्रेमळपणाच्या इच्छेनुरूप, मी वाचकांस सादर केल्यास, तें अनुचित होणार नाहीं असें मला वाटतें, ह्मणून '**पुष्पांजली**' स प्रस्तावना लिहिण्याविषयीं मला आग्रहपूर्वक विनंती करून, रा. **रहाळकर** ह्यांनीं, माझ्याविषयीं जी अकल्पित व निरपेक्ष प्रेमळपणाची वृत्ति दाखविली, आणि त्यांनीं आपल्या निरतिशय सौजन्यानें माझा जो गौरव केला आहे, त्याबद्दल त्यांचे प्रथमतः मनःपूर्वक आभार मानून, मी आतां माझें आनंददायक कर्तव्य यथाशक्ति बजाविण्यास प्रारंभ करतों.

इंदूरचे आमचे सन्मान्य मित्र मशीर बहादूर रा. रा. **नरहर शंकर रहाळकर** बी. ए. हे, आपल्या '**केशवसुत आणि त्यांची कविता**' या सुंदर पुस्तकाच्या द्वारें, कै० कवि **केशवसुतांचे** एक जिव्हाळ्याचे मित्र, आणि **केशवसुत** त्यांच्या कवितेचे अथवा एकंदरच काव्यविषयाचे एक मार्मिक व रसिक टीकाकार ह्मणून महाराष्ट्रास सुपरिचित व आदरपात्र झालेलेच आहेत. आज त्यांच्या या '**पुष्पांजली**' नामक काव्यमय कृतीच्या द्वारें, एक चांगले कवि या नात्यानेंही सध्यांच्या पिढीस यांचा परिचय होण्याचा सुयोग येत आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे.

'सध्यांच्या पिढीस' असें मुद्दाम म्हणण्याच कारण हें कीं. अलीकडे ब-याच वर्षांत रा. **रहाळकर** यांच्या कविता '**मनोरंजन**,' '**काव्यरत्नावली**' वगैरे मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध

झालेल्या नाहींत. त्यामुळें केवळ जिज्ञासु आणि काव्यविषयक गोष्टींची विशेष आस्था बाळगणाऱ्या थोडया लोकांखेरीज सध्यांच्या साधारण वाचकवर्गास रा. **रहाळकर** यांच्या काव्याचा आस्वाद फारसा मिळालेला नाहीं.

इतिहास आपल्या डोळ्यांदेखत बनत असतो; किंबहुना प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें तो आपणच बनवीत असतों. परंतु त्याची जाणीव मात्र आपल्याला कांहीं विशेष ढोबळ स्थित्यंतर दर्शविणारी गोष्ट आपल्या दृष्टीसमोर आली म्हणजेच होते. या गोष्टीची प्रतीति प्रस्तुत प्रसंगीं चांगली येण्यासारखी आहे. कारण " पुष्पांजलि ' द्वारें वाचकांस सादर होणाऱ्या कविता इ० स० १८९८ ते इ० स० १९०४ या अवधींतील म्हणजे उण्यापुऱ्या–पाव शतकापूर्वींच्या आहेत. त्या कालानंतर रा. **रहाळकर** यांच्या कवितास्फूर्तीनें त्यांस प्रसंगोपात्त भेट दिली असली तरी, ती, अखंड प्रेमळ परंतु एकान्तवास व निवृत्तिप्रिय अशी दूरस्थ माता आणि तिचा भाग्यशाली व अनेक कार्यव्यापृत परंतु अढळ मातृनिष्ठ प्रौढवयी सत्पुत्र, यांच्या कांहीं आनंददायक कार्यप्रसंगाच्या निमित्तानें होणाऱ्या जुजबी भेटीसारखीच होय. तथापि या जुजबी भेटींत देखील, दोघांचें तोंडावळा वगैरे बाबींतील साम्य आणि परस्परांच्या भाषणांतील प्रेमोत्कटता पाहून दोघांमध्यें असलेलें मातापुत्राचें नातें कोणाच्याही चटकन् लक्ष्यांत आल्यावांचून व त्या उभयतांबद्दल सकौतुक आदर व आनंद वाटल्यावांचून रहात नाहीं.

या न्यायानें पहातां, १९०४ नंतर रा. **रहाळकर** यांच्या हांतून जरी फारशी काव्यरचना झाली नाहीं हें जरी खरें आहे

तरी, जी कांहीं थोडीबहुत झाली तिच्या निदर्शक अशा ज्या २।३ कविता–'आईची विनवणी,' (पृ० १३१); फटका. ('वारुणी," पृ० १६३); व 'होळकरांचा फटका' (पृ० १८५–९७)— पुढील **पुष्पांजलींत** रा. रहाळकर यांनीं दिल्या आहेत, त्यांवरून अजून सुद्धां रा. **रहाळकर** यांच्या कवितेंत, त्यांच्या पूर्व वयांतील काव्यस्फूर्तीचा तडफदार आवेश आणि सहजरम्य अभिनव कल्पना हे दोन्ही गुण चांगले कायम आहेत, असें त्या कविता लक्षपूर्वक वाचणाऱ्या कोणाही सहृदय वाचकाच्या प्रत्ययास आल्यावांचून रहाणार नाहीं असें आम्हांस वाटतें. म्हणून " 'कवि' या नात्यानें मी १९०४ सालींच मेलों असून सध्यां माझें भूत वावरत आहे, असें मला वाटतें" असे रा. **रहाळकर** यांचे उद्गार जरी प्रसंगविशेषीं आमच्या कानावर आले, तरी ते उद्गारच एक प्रकारचें काव्य असून, त्यांच्या स्वाभाविक विनयाचे द्योतक आहेत, असेंच समजलें पाहिजे!

'**पुष्पांजली**' त एकंदर लहान मोठया मिळून सुमारें ७५ कविता आल्या आहेत. त्यांतील बहुतेक 'गीतकें' (Lyrics) याच लघुरचनाप्रकाराच्या धर्तीचीं असल्यामुळें एक किंवा दोन —फार तर तीन—पानांच्या पेक्षां जास्त विस्ताराचीं नाहींत. त्यायोगानें तीं सबंध वाचण्याइतकी वाचकांची रसोत्सकता कायम राहते. 'माझी आई,' 'आईची विनवणी,' 'होळकरांचा फटका' अशा कांहीं कविता अधिक विस्ताराच्या आहेत; पण तो विस्तार काव्यरसापकर्षक नसून, विषयाच्या महत्वास अनुरूप व साहजिक असाच आहे. विषयांच्या दृष्टीनें विचार केला असतां, त्यांतही चांगलें वैचित्र्य दिसून येतें. ठोकळ मानानें '**पुष्पांजली**-

तील' कवितांचें, १ प्रेमविषयक, २ उपरोधिक, अथवा उपालंभ व उपदेशगर्भ, ३ आत्मवृत्तिविषयक, ४ सर्वसाधारण, ५ उन्मनावस्थाद्योतक, आणि ६ ऐतिहासिक, असें वर्गीकरण करितां येईल.

कवितांच्या संग्रहांत कविता ग्रथन करण्याचे दोन प्रकार असतात. एक त्यांच्या रचनेच्या कालानुक्रमानें व दुसरा त्यांतील विषयांच्या स्वरूपानुरोधानें. यांपैकीं वर्गीकरणाचा पहिला प्रकार, ज्या ठिकाणीं कवीच्या जीवनचरित्राच्या अंगभूत म्हणून त्याच्या काव्यांचा निर्देश करावयाचा असेल, आणि त्याच्या काव्यशक्तीचा विकास कसकसा होत गेला हें दर्शवावयाचें असेल तेव्हां किंवा कवीच्या मनोवृत्तींत व विचारसरणींत स्थित्यंतरें होत गेल्याचें स्पष्ट दर्शविणारे असे विशिष्ट कालविभाग त्याच्या काव्यरचनेवरून सहज पडण्यासारखे असतील अशा ठिकाणीं उचित व उपयुक्त असतो.

**शेक्सपीअरच्या** नाट्यकलाविकासाच्या तीन अवस्था क्रमवार दर्शविणारें म्हणून जें त्याच्या नाटकांचें तीन कालभेदानुसार वर्गीकरण करण्यांत येतें तें, किंवा **श्रीतुकारामांच्या** निरनिराळ्या आध्यात्मिक मनोवृत्तींची संगति लावण्यासाठीं त्यांच्या अभंगांची निरनिराळ्या सदराखालीं वर्गवारी करण्याचा जो प्रयत्न कित्येकांचा चालू आहे, तो याच पहिल्या प्रकारचा निदर्शक आहे. परंतु अशा तऱ्हेचें वर्गीकरण कवीच्या कालोत्तर कोणी करण्यापेक्षां खुद्द कवीनेंच अथवा त्याच्या मनोवृत्तीची किंवा काव्यरचनेची ज्यास प्रत्यक्ष व खरी माहिती असेल,

अशा त्याच्या एखाद्या निकट आप्तेष्टानें करून ठेविलें असेल तर तें विशेष विश्वसनीय व बोधप्रद मानतां येईल.

पण साधारणत: कवींचा काव्यरचनेच्या बाबतींतील मनोव्यापार अशाच व्यापक स्वरूपाचा असतो कीं, त्याचें महत्त्व विशिष्ट काल अथवा स्थल यांच्यावर फारच क्वचित् प्रसंगीं अवलंबून असतें. त्याच्या स्वारस्याचें खरें बीज, काव्यामध्यें व्यक्त होणारी कवीची उत्कट प्रतिभा व भावनाविष्कृति, अथवा, एखादा वर्णन-प्रधान विषय असल्यास, कवींचें मार्मिक व यथार्थ वर्णनकौशल्य यांच्यांतच असतें. एखाद्या कवितेंत कवीनें **'ताजमहाला'**चें वर्णन केलें असलें, तर त्या कवितेचें खरें स्वारस्य, **'ताजमहाल'** दृष्टीस पडण्यापूर्वी ऐकीव वर्णनावरून कवीनें त्याच्यासंबंधीं मनांत रंग-विलेलीं अनेकविध कल्पना–चित्रें, **'ताजमहाल'** पहावयास जाण्यासाठीं निघण्याच्या वेळीं त्याच्या मनाची होणारी अनेक विचारमिश्र व आनंदप्रधान सोत्सुक अधीरवृत्ति व 'ताज-महाल' एकदम व संपूर्ण दृष्टीस पडण्याच्या **प्रथमक्षणीं** त्याच्या मनावर होणार संस्कार व मनांत उद्भूत होणाऱ्या भावना व विचारतरंग आणि नंतर त्याचाच विस्तार होऊन, त्याविषयावर त्यास स्फुरणारे इतर विचार किंवा कल्पनातरंग–इत्यादि रसिका-पेक्षित निरनिराळ्या काव्यपोषक गोष्टींचें प्रतिबिंब कवीच्या स्वत:च्या मनोवृत्तीनुरूप त्या कवितेंत ज्या मानानें चित्ताकर्षक व उदात्त रीतीनें उठलें असेल त्यावर अवलंबून आहे. कवीनें **'ताजमहाल'** कोणत्या तारिखमितीस पाहिला याच्या नोंदीशीं साधारण रसिकवाचकास फारसें कर्तव्य नसतें. हें विधान जसें एखाद्या विशिष्ट स्थलवर्णनास लागू आहे, तसेंच तें काव्यस्फुर्तीस

निमित्त होणाऱ्या इतर भावनोद्दीपक काव्यविषयांस व काव्य- प्रसंगांसही सामान्यपणें लागू आहे. थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे, एखाद्या कवितेचें वर्गीकरण तिच्या रचनेच्या विशिष्ट स्थलकालावर तादृश अवलंबून नसून, त्या कवितेला निमित्तमात्र झालेल्या काव्यप्रसंगाच्या विशिष्ट स्वरूपावर अथवा त्या कवितेंत ग्रथित केलेल्या किंवा प्रमुखत्वानें व्यक्त होणाऱ्या भावनांच्या विशिष्ट भेदांवरच तें अवलंबून असतें.

'**पुष्पांजली**'तील कवितांची निवड करतांना रा. **रहाळ- कर** यांनीं दुसरा–विषयवार वर्गीकरणाचा–प्रकार स्वीकारला आहे, व तोच एकंदरीनें इष्ट व सोईस्कर होय. '**केशव- सुतांच्या कविते**'वरील आपल्या टीकात्मक पुस्तकांतही रा. **रहाळकर** ह्यांनीं '**केशवसुता**'च्या कवितांचें वर्गीकरण याच धोरणानें केलें आहे व त्याला, त्या पुस्तकाचे प्रस्तावनाकार सुप्र- सिद्ध नाटयलेखक व कवि '**किरात**' यांनींही आपली संमति दर्शविली आहे. (**केशवसुत आणि त्याची कविता.** प्रस्ता- वना–पृष्ठ १०.) असो.

रा. रा. **रहाळकर** यांच्या काव्यरचनेचें समालोचन करा- वयास लागण्यापूर्वीं एकंदरींत आधुनिक कवितेच्या इतिहासा- विषयीं व तिच्यांत आतांपर्यंत झालेल्या स्थित्यंतरांविषयीं कांहीं ठोकळ गोष्टींचें थोडक्यांत दिग्दर्शन करणें अवश्य आहे. त्या योगानें, रा. रा. **रहाळकर** यांची काव्यरचना ज्या काळांतील आहे त्या काळांतील मराठी काव्याचें स्वरूप कशा प्रकारचें होतें, तशा तऱ्हेचें स्वरूप बनण्यास कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत

झाल्या, त्यावेळच्या प्रमुख कवींच्या काव्यरचनेंत कोणकोणते विशेष दिसून येत होते इत्यादि गोष्टींचें परिज्ञान होऊन, त्यांच्या धोरणानें रा. रा. **रहाळकर** यांच्या काव्यरचनेचें स्वरूप व स्वारस्य समजण्यास जास्त सुलभ जाईल. म्हणून थोडक्यांत तसें दिग्दर्शन करण्यास प्रारंभ करितों.

प्रथमत: हें सांगणें इष्ट आहे कीं, ' आधुनिक कविता ' या शब्दांत कित्येकांच्या मतें, जुन्या मराठी कवितेच्या तुलनेच्या दृष्टीनें हीनतादर्शक किंवा निंदाव्यंजक कल्पनांचा अर्थ ध्वनित होतो. तशा अर्थीं मी हे शब्द योजीत नसून, केवळ, महाराष्ट्रांत ब्रिटिश अंमल सुरू झाल्यापासून, जो मराठी काव्याचा प्रवाह आज तागायत चालू आहे त्याचा सामान्यत: निर्देश करण्याच्याच उद्देशानें हे शब्द प्रस्तुत विवेचनांत मी सर्वत्र वापरले आहेत. वस्तुत:, सत्काव्याला प्राचीन, अर्वाचीन असें कालभेदानुरूप पंक्तिप्रपंचाचें स्वरूप केव्हांच नसतें; शिवाय, स्वत: लेखकच आधुनिक कालांतील असल्यामुळें, त्याला आपल्या काळच्या उत्तमोत्तम काव्यनिर्माणकुशल सत्कविमित्रांविषयीं आणि मराठी काव्यप्रवाहांत, उत्क्रांतीच्या तत्त्वानुरूप वेळोवेळीं येऊन मिसळणाऱ्या खऱ्या सौंदर्यपोषक नाविन्याच्या नव्यानव्या रम्य निर्मल निर्झरौघांविषयीं सकौतुक आदर आणि साभिमान प्रेम वाटल्यावांचून रहाणें शक्य नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहेच.

तेव्हां, स्थूलमानानें इ. स. १८१८ ते १९२४ या सालांमधील एकंदर आधुनिक कवितेच्या इतिहासाचे, प्रथम १८५४ पर्यंत एक आणि नंतर दर १५।२० वर्षांस एक, अशा प्रकारें काल-

विभाग पडण्यासारखे आहेत. अर्थात, हे कालविभाग त्या त्या कालांतील एकंदर सामुदायिक काव्यरचनेच्या कांटेतोल निरीक्षणाच्या अनुरोधानें केलेले नसून, सामान्यत: तेवढ्या तेवढ्या विशिष्ट कालविभागांत, कोणकोणत्या प्रकारच्या विशिष्ट काव्य-प्रवृत्ति इतरांपेक्षां जास्त प्रबल होत्या अथवा कोणकोणत्या नवीन प्रचलित होण्यास प्रारंभ झाला होता, इत्यादि ज्या गोष्टी आधुनिक मराठींतील काव्यप्रवाहाचें वरवर निरीक्षण करणाऱ्याच्या देखील सहज लक्ष्यांत येण्यासारख्या आहेत, त्यांच्याच अनुरोधानें व ठोकळमानानें विवेचनाच्या सोयीसाठीं केले आहेत, ही गोष्ट विशेषेंकरून सांगणें अवश्य आहे. दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे, ती ही कीं, अमुक एका विशिष्ट कालविभागांत अमुक एक काव्यप्रवृत्ति विशेष प्रबल व प्रचलित आहे, असें म्हटलें किंवा दिसलें तरी, त्या योगानें पूर्वींच्या कालविभागांतील इतर प्रवृत्ति समूळ लुप्तप्राय अथवा नि:शेष होतात, असें मात्र कधींही होत नाहीं. त्या प्रवृत्ति थोडया अधिक सूक्ष्म प्रमाणांत नेहमीं दृग्गोचर होतच रहातात. किंबहुना, काव्याच्या प्रगतीला नदीच्या प्रवाहाची उपमा देण्यांत येते तिच्यावरूनच ही गोष्ट ध्यानांत येण्यासारखी आहे. एखादी महानदी पुढें पुढें वहात जातांना, तिच्यांत नवे नवे जलप्रवाह येऊन जरी मिळाले, तरी नदीच्या प्रवाहांत तिच्याशीं एकरूप झालेल्या पूर्वींच्या जलौघांचा अंश असतोच. हाच न्याय प्रगमनशील काव्यप्रवाहासही लागू आहे.

या दोन गोष्टी ध्यानांत वागवून, वर दर्शविलेल्या कालमर्यादेंतील मराठी काव्याच्या स्थित्यंतरांचा विचार केला तर त्यांत १ संस्कृत काव्यानुसारी पंडित व शास्त्री वर्गांतील कवि, २ प्राकृत

काव्यानुसारी ( मराठी शिक्षक व इतर केवळ मराठी काव्यव्यवसायी कवि. ), ३ सुश्लिष्ट व अभियुक्त इंग्रजी संस्कृत काव्यानुयायी सुशिक्षित पदवीधर कवि, ४ इंग्रजी शिक्षकव्यवसायी व विद्यार्थीदशेंतील किंवा तत्सदृश इंग्रजी काव्यपद्धतीचा '**सहजानुसारी**' कविवर्ग, ५ इंग्रजी किंवा पाश्चात्त्य काव्यपद्धतीचा, सहेतुक व ब्रीदोद्घोषपूर्वक, **व्रतानुसारी** कविवर्ग.–अशा **पांच प्रकारच्या** काव्यप्रवृत्तीचे निदर्शक कालविभाग दृष्टोत्पत्तीस येतात.

अर्थात् या पांचही कालविभागांच्या स्वरूपांचें नुसतें ओझरतें देखील विवेचन करणें प्रस्तुत प्रसंगीं अशक्य व विषयांतरवजा होईल. म्हणून, जातां जातां, त्या त्या प्रवृत्तींच्या निदर्शक अशा कांहीं कवींचा नुसता नामनिर्देश करितों. त्यावरून, वरील कालविभागांच्याद्वारें काय दर्शविण्याचा आमचा उद्देश आहे, तो चाणाक्ष वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल. १ कै. कृष्णशास्त्री राजवाडे, गणेशशास्त्री लेले, पांडुरंग शास्त्री पारखी, २ परशुरामपंत तात्या, पाळंदे, लोंढे, लेंभे, मोगरे, ३ कै. महाजनी, आगाशे, कानिटकर, ४ ( अ. ) कै. कुंटे, चिंतामणि पेठकर, ( ब. ) दत्तोपंत घाटे, माधवानुज, विनायक, ५ केशवसुत, बालकवि, गोविंदाग्रज.

या ५ विभागांपैकीं ४ थ्या व ५ व्या विभागांविषयींच येथें जरा अधिक खुलासेवार प्रतिपादन केलें पाहिजे. ४ थ्या विभागांत दोन पोटविभाग दर्शविले आहेत. त्याचा हेतु असा कीं, हल्लीं 'आधुनिक कविता' या शब्दांनीं ज्या तऱ्हेच्या काव्यपद्धतीचा किंवा काव्यकल्पनांचा अर्थ ध्वनित होतो आणि पूर्वापार मराठी

भाषेंत रूढ असलेल्या काव्यप्रकारांपेक्षां, भाषापद्धतीच्या व रचनावैचित्र्याच्या दृष्टीनें नवीन असे काव्यप्रकार प्रचलित करण्याचाच हेतु धरून व त्याचा स्पष्ट व उच्चस्वर गर्जनेनें ब्रीदोद्‌घोष करून, तशा तऱ्हेचे प्रयत्न करण्याची जी विशिष्ट काव्यप्रवृत्ति आहे, तिचा थोडासा उगम वस्तुत: कै. **कुंटयांच्या 'राजा शिवाजी' 'मन'** वगैरे काव्यद्वारें व कै. **चिंतामणि पेठकरांच्या 'गंगावर्णना'**काव्यद्वारां १९ व्या शतकाच्या चरमचरणांतच झाला होता;* परंतु, सरस्वतीच्या प्रवाहाप्रमाणें तो मध्यंतरीं गुप्त होऊन

---

* या पुस्तकांसंबंधीं व एकंदरींतच भावी कवितेच्या स्वरूपासंबंधीं, **कै. निबंधमालाकारांचे** पुढील उद्गार फार मार्मिक व रम्य भविष्यवाणीसारखे वाटतात:—

"प्रकृतस्थळीं एवढेंच सांगणें पुरें आहे कीं, मराठी कवितेचा ओघ आजपर्यंत ज्या दिशेनें वहात आला ती दिशा आतां बदलली. तो मुळींच बंद न होतां इतउत्तर पुढें चाललाच तर त्याचा रोंख अगदीं निराळा होईल यांत शंका नाहीं. तो कांहीं इंग्रजी कवितेच्या व कांहीं संस्कृत कवितेच्या मार्गाकडे वळेल. किंवा कविच्या रुच्यनुरूप तो वरच्यापैकीं एकेका पंथासच अनुसरेल. हा प्रकार सध्यांही कांहीं दृष्टीस पडूं लागला आहे. पहिल्या प्रकारचें उदाहरण 'गंगावर्णना' हें २।३ वर्षांमागें प्रसिद्ध झालेलें एक लहानसें काव्य होय; व दुसऱ्या दोहोंचीं 'राजा शिवाजी' व दैवसेनी' आणि 'विद्याधनप्रशंसा' हीं उदाहरणें होत. या चारी काव्यांची योग्यता अर्थातूच फार निराळी आहे."
**निबंधमाला**—'भाषापद्धति' पृ. १५८, चि. शा. प्रत.

इतर काव्यप्रवृत्तींच्या प्रवाहांत लीन झाला होता, तो पुनः चालू दशकांत नवीकृत रूपानें विशेष दृग्गोचर होऊं लागला आहे.

याखेरीज ४ थ्या व ५ व्या विभागांत एका दृष्टीनें बरेंच साम्य असूनही, दोघांमध्यें भिन्नतादर्शक असे कित्येक महत्त्वाचे विशेष आहेत. पूर्वापार चालत आलेल्या मराठी काव्यपद्धतीच्या रूढ स्वरूपापेक्षां भिन्न प्रकारची रचना करण्याचा पृथक् व सरसहा असा प्रयत्न वस्तुतः १८८५।९० सालापासून अस्तित्वांत आला. कारण त्या वर्षापासून किंवा त्याच्याही अगोदर पांच वर्षांपासून एकंदरच वाङमयाच्या व शिक्षणाच्या बाबतींत एकप्रकारचें नव्या उत्साहाचें व आचारविचारस्वातंत्र्यप्रस्थापनोत्सुक अशा चैतन्याचें वारें साऱ्या महाराष्ट्रभर खेळूं लागलें. या चैतन्योत्पादनास, व व्यापक विचारप्रसाराच्या बाबतींत ' न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना,–हें थोडेंबहुत अप्रत्यक्ष असलें तरी प्रमुख व प्रवर्तक कारण झालें, यांत शंका नाहीं. या नव्या धोरणाच्या शाळेंत नव्या व तेजस्वी विचारांच्या, आदर्शभूत ज्ञानलालसेच्या, उत्कट कळकळीच्या, गाढ व अष्टपैलू रसिकतेच्या व लेखन-अध्यापनरूप सव्यसाची व विविध वाङ्मयकौशल्ययुक्त अशा शिक्षकवर्गाच्या सतत सहवासाचा व सात्विक ईर्ष्यासंचारक विचारविनिमयाचा लाभ पुष्कळ होतकरू विद्यार्थीवर्गास घडून त्याच्याद्वारें, हळुहळु व अदृश्यरूपानें या चैतन्याचीं आंदोलनें सर्व महाराष्ट्रभर प्रसृत होत गेलीं.

तसेंच, वाङ्मयदृष्ट्या देखील मधून मधून विविध उन्नत विषयांचा परिचय करून देणारें व वाचकांची ज्ञानलालसा विकसित व परिपुष्ट

करणारें असें ' **केसरी** ' व '**सुधारक**' या दुक्कलीचेंही लेखन-कर्तृत्व आपला प्रभाव महाराष्ट्रभर गाजवीत होतेंच. या खेरीज, या अवधींत, (इ. स. १८९० आक्टोबर) '**करमणूक**' पत्राचा जन्म होऊन, सुबोध, निष्पाप व सुभग मनोरंजनात्मक वाङ्मय-प्रसाराच्या बाबतींत नवीन अभिनंदनीय युगाचा उदय झाला. त्याच पत्रांत कै. ' **केशवसुत** ' ' **माधवानुज** ' वगैरे तरुण व होतकरू कवींचा प्रेमळपणानें सत्कार व गौरव होऊन, नव्या कवितेला चांगलें प्रोत्साहन मिळालें.या कामांत **काव्यरत्नावली** व पुढें '**मासिक मनोरंजन**,' यांनींही प्रशंसनीय साहाय्य केलें.

वास्तविक पहातां ' **केशवसुतां** ' प्रमाणेंच त्यांचे दुसरे समकालीन कै. **माधवानुज, विनायक, दत्त,** इत्यादि कवीही आधुनिक कवितेचेच पुरस्कर्ते व अनुयायी होते. त्यांच्याही कवितांचे विषय नित्याच्या अनुभवांत येणारे व व्यावहारिक स्वरूपाचे असत. त्यांच्या कवितांमधून केलेलें विचारप्रदर्शन व भावनाविष्करणही बऱ्याच अंशीं इंग्रजींतील '**गीतकां**' (Lyrics) सारखेंच आहे. त्यांच्याही रचनेचा ओढा, गणवृत्तांपेक्षां मात्रावृत्तांकडे आणि तत्कालीन लोकप्रिय ' चंद्रकांत राजाची' 'उद्धवा शांतवन कर जा' 'तस्करा हातीं' 'लाल जोडी' ' प्रिये पहा रात्रीचा समय सरुनि' 'अर्धतनू वारुळीं बुडाली' 'भूपति खरं तें वैभवसुख सेवीती' 'वधू ही वल्ली' 'नृपममता रामावरती' 'रुचती की तीर्थयात्रा' ' अभिनव मधुलोलुप हे-' इत्यादि अनेक मनोहर व गायनसुलभ पद्यांच्या चालीकडेच असे.

असें असतां, कै.**केशवसुत** यांनाच आतां साधारणतः सर्वानुमतें आधुनिक कवितेचे अध्वर्यु मानण्याचा प्रघात पडला आहे,

हे सकृद्दर्शनीं फार चमत्कारिक वाटतें. फार तर काय, खि. वा. रे. **टिळक** हे '**केशवसुतां**'च्या अगोदरचे होते आणि '**केशवसुतां**'च्या मागून पुष्कळ वर्षेंपर्यंत ते विद्यमान होते; त्यांची काव्यरचनाही विविधप्रकारची, फार विपुल व आधुनिक वळणाची असूनही, आधुनिक कवितेच्या अध्वर्युत्वाचा मान त्यांना लाभला नाहीं, हेंही एका दृष्टीनें कसेंसेंच वाटतें.

तथापि, या सर्व कवींच्या कृतींचा आणि कै. **केशवसुत** यांच्या कवितांचा सूक्ष्म व व्यापक रीतीनें तुलनात्मक विचार केला असतां, सकृद्दर्शनीं चमत्कारिक भासणाऱ्या या कोड्याचा उलगडा सहज होतो. तो उलगडा म्हटला म्हणजे थोडक्यांत हाच कीं, बाकीचे कवि आधुनिक कवितेचे अनुयायी व पुरस्कर्ते असले तरी, ते तसे केवळ **सहजानुसारी** प्रकारचे होते. त्यांच्यावर इंग्रजी शिक्षणाच्या ओघानें प्राप्त झालेल्या इंग्रजी काव्यपद्धतीचा अनुकूल संस्कार झाला होता व तशा तऱ्हेची काव्यरचना करणें त्यांस इष्ट वाटून त्यांनीं सहजगत्या तशा तऱ्हेची रचना करण्याचा उपक्रमही केला होता, हें खरें. तथापि, यांत आपण कांहीं विशेष व सहेतुक अशी कांहीं वाङ्मयक्रांति करीत आहों, अशी त्यांची तादृश भावना असल्याचें त्यांच्या काव्यांवरून दिसून येत नाहीं, किंवा अशा तऱ्हेच्या प्रतिज्ञेचा—या ब्रीदाच्या उद्घोषाचा—स्पष्ट ध्वनीही त्यांच्यांपैकीं कोणाच्या काव्यांत दिसत नाहीं; पण ही प्रतिज्ञा व हा ब्रीदाचा उद्घोष "**केशवसुत**" यांच्या, '**तुतारी**,' '**मूर्तिभंजन**' '**स्फूर्ति**' '**गोफण**' वगैरे अनेक काव्यांत स्पष्टपणें दृग्गोचर होतो, हेंच त्यांच्याकडे आधुनिक कवितेचें अध्वर्युत्व येण्याचें मुख्य कारण होय.

काव्यकल्पनांत नवीन युग सुरूं करण्याच्या प्रतिज्ञेखेरीज,संस्कृत व साधेभाबडे पण जोरदार मराठी शब्द यांच्या सरमिसळीची त्यांनीं स्वतःसाठीं मुद्दाम बनविलेली अशी विशिष्ट भाषाशैली,'**स्वनितकें**' ( Sonnets ) वगैरे सारखे इंग्रजी धर्तीचे रचनाप्रकार मराठींत रूढ करण्याचा केलेला सहेतुक प्रयत्न, हींही कारणें वरील गोष्टीसच पोषक झालीं.

या सर्व कारणांखेरीज, त्यांच्या काव्यांचें विशिष्ट व उज्वल गांभीर्य, त्यांतील उदात्त व गूढमय तत्त्वान्वेषणाची व थेट इंग्रजी काव्यांच्या धर्तीची विचारप्रदर्शनाची धाटणी, व तदनुरूप भाषासरणी व कल्पनाविष्कार;कवींच्या योग्यतेविषयीं व त्यांच्या कार्याच्या थोरवीविषयीं आत्मविश्वाससूचक, परंतु अहंकारपूर्ण आवेशातिशयामुळें उद्दाम वाटणाऱ्या दर्पोक्ति, हेही गुण त्यांच्या काव्यशैलीचें, त्यांच्या समानकालीयांच्या काव्यशैलीहून, भिन्नत्व व विशिष्टत्व प्रस्थापित करण्यास कारणीभूत झाले. याच गुणांची कमीअधिक छटा, कै. '**विनायक, दत्त**' वगैरे सारख्या त्यांच्या समानकालीन कवींवर व त्यांच्या मरणानंतर, थोडयाबहुत उशीरां रे. **टिळकां**वरही ( उ० '**रणशिंग**' '**कोलाहल-मौन गान**' या कविता. )—पडल्याचें स्पष्ट दिसून येतें.

**केशवसुतांचे** हे विशेष बाजूला ठेविले तर, त्यांच्या वेळच्या एकंदर आधुनिक कवींच्या कवितेचें स्वरूप पूर्वापार रूढ अशा मराठी काव्यपद्धतीच्या व काव्यविषयक कल्पनांच्या संबंधीं पुढील **पांच गोष्टींत** स्पष्टपणें पृथक् व नाविन्ययुक्त दिसूं लागलें, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्या गोष्टी ह्या होत:—१ निसर्गात्मक

सौंदर्यवर्णनास व नदी, निर्झर, लता, पक्षी वगैरे स्थावरजंगमात्मक सृष्टपदार्थांच्या काव्यमय वर्णनास पृथक् महत्व देणें. २. नित्य व्यवहारांतील प्रासंगिक अनुभवांचें आणि काव्यस्फूर्तीप्रेरक साध्या विषयांचेंही भावनोत्कट अथवा भावनाविष्कारमिश्र अशा रीतीनें-'**गीतकां**'च्या(Lyrics) धर्तीवर थोडक्यांत तीव्र परिणामकारक असें निवेदन करणें. ३. निरनिराळ्या कोमलोदात्त, करुणरम्य व ललितमोहक अशा प्रणयविषयक नाजूक भावनांचे विरहार्त व्यथेचे. सुखद अनुभवांचे अथवा सात्विक शृंगारोपभोगांचें वर्णन तिऱ्हाईतपणानें अथवा उदात्त नायकनायिकादिकांच्या प्रच्छन्न व अप्रत्यक्ष स्वरूपांत किंवा ठराविक कविसंकेतानुसार करण्याऐवजीं, स्वतःचेच असे व्यक्तिविषयक व रहःसौख्यमय अनुभव काव्यांत ग्रथित करणें. ४. **गीतकांचे** (Lyrics) मुख्य गुण जे **नादानुकूलता** (Verbal Melody) आणि **गायनानुकूल रचनासंवाद** (Musical Harmony) यांच्या अनुरोधानें, गणवृत्तांपेक्षां, लोकप्रिय व नादमधुर नाटकी चाली वगैरे मात्रावृत्तांतच रचना करण्याकडे विशेष भर असणें. ५. भाषासरणींत, संस्कृत शब्दांच्या प्राधान्यापेक्षां, साध्यासुध्या पण योग्य अर्थद्योतक व अर्थोद्दीपक वाटणाऱ्या '**शुद्ध मराठो**' शब्दांचाच जास्त अवलंब करणें.

आधुनिक कवितेचे वरील विशेष लक्ष्यांत घेतले असतां, पंचवीस वर्षांपूर्वीच्या काळांत आणि सध्यांच्या काळांत तादृश फरक वाटत नाहीं हें जरी खरें तरी, पूर्वीच्या १५।२० वर्षांपेक्षां

सध्यांच्या चालू दशकांत आधुनिक कवितेच्या स्वरूपांत आणखी दुसऱ्या कित्येक नव्याच प्रकारांचा प्रादुर्भाव झालेला दिसून येतो! त्यांतील मुख्य म्हटलें ह्मणजे, '**स्वनितकां**' दि (Sonnets) रचनाप्रकारांना प्राधान्य देणें, नवीं नवीं क्लिष्ट व वैगुण्ययुक्त वृत्तें शोधून काढणें, आणि भाषाशास्त्रदृष्ट्या व भावनाविष्कारविषयक वैशिष्ट्याच्या दृष्टीनें मराठीहून अगदीं भिन्न संस्कृतीच्या व भिन्न नादसंयोजक तत्त्वावर बसविलेल्या **गज्जलादि** चालींचा प्रचार रूढ करण्यासंबंधीं कांहीं कवींचा चालू असलेला अट्टाहास इत्यादि होत.

हे प्रयोग सध्यां संक्रमणावस्थेंतच असल्यामुळें आणि त्यांचा प्रस्तुतप्रसंगीं तादृश संबंध नसल्यामुळें, त्यांचा येथें ऊहापोह करण्याची आवश्यकता नाहीं. तथापि, जातां जातां यासंबंधीं एकाच मुद्याचा उल्लेख करणें आम्हांस इष्ट दिसतें. तो हा कीं, जुन्या संस्कृत व मराठी काव्यपद्धतींत, यमकें, प्रासानुप्रास, निरनिराळे चित्रबंध, अनेक लहान मोठीं गणमात्रांच्या घोटाळ्यांची वृत्तें, इत्यादिकांच्या सुळसुळाटानें, मराठींतील खऱ्या काव्यास अत्यंत कृत्रिम, क्लेशकारक व 'अधम' स्वरूप येत गेलें, अशी एकीकडे हांकाटी करणाऱ्यांनींच, लागलीच दुसरीकडे, आधुनिक कवितेंत नवीन युग प्रवर्तित करण्याच्या ईर्ष्येनें, पुनः इंग्रजी, पर्शियन वगैरेतील खऱ्या काव्योत्कर्षाच्या दृष्टीनें तादृश महत्त्वाचे नसणारे '**स्वनितकें**' (Sonnets) **गज्जला**दिसारखे कृत्रिमरचनाप्रधान, आयासकारक व कित्येकदां काव्यरसापकर्षकही, असे नवे नवे प्रकार मराठींत रूढ करण्याविषयीं

वृथा हांवेच्या भरीं भरावें, ही गोष्ट बऱ्याच अंशीं विसंगत व हास्यास्पद दिसते ! असो.

आतां शेवटीं, रा. रा. **रहाळकर** यांच्या **पुष्पांजलींतील** कवितांचें थोडक्यांत समालोचन करून ही प्रस्तावना पुरी करूं.

रा. रा. **रहाळकर** यांची कविता मागें '**मनोरंजन**' '**काव्यरत्नावली**' वगैरे मधून प्रसिद्ध होत असतांनाच काव्य-रसिक जनतेनें त्यांची तत्कालीन प्रमुख कवींमध्यें गणना केलेली आहे. म्हणून रा. रा. **रहाळकर** यांच्या कवितेशीं पूर्वपरिचय असलेल्या अनेक रसिक लोकांना अजून सुद्धां, त्यांच्या काव्यास्वा-दाचा अलीकडे लाभ मिळत नसल्याबद्दल हळहळ वाटत असल्याचें आम्हांस स्वानुभवानें माहित आहे. अशा लोकांना प्रस्तुत **पुष्पांजलीच्या** द्वारें रा. **रहाळकर** यांच्या पूर्वानुभूत काव्य-रसास्वादसुखाचा पुन: नव्यानें व चिरस्थायी स्वरूपांत अनुभव घ्यावयास सांपडेल, ही मोठ्या संतोषाची गोष्ट आहे.

साधारणत: बहुतेक कवि आपल्या वेळच्या युगांचे निदर्शक असतात; व कांहीं फारच विरळा असे आपल्या वेळच्या युगांत थोडें तरी सूक्ष्म संक्रमण घडवून आणण्याच्या सामर्थ्याचे असतात. तथापि एखादा कवि हा स्वत:च्या युगाचा निदर्शक असला तरी, त्याचे स्वत:चे असे जे विशिष्ट काव्यगुण असतील त्यांच्या योगानें, आपल्या समकालीन कविबंधूंत त्याचें कमी अधिक उच्चस्थान निश्चित होतेंच. या दृष्टीनें पहातां, रा. **रहाळकर** यांच्या कवितेंत त्यांचे असे विशिष्ट गुण पुष्कळ आहेत.

त्यापैकीं मुख्य म्हटले म्हणजे साधारणत: गंभीर, प्रांजळ व प्रौढ भाषाशैली, काव्यविषय खरोखरच स्फुरला असल्यामुळें

त्याच्याशीं उत्कट तादात्म्य पावून, त्या योगानें, क्रमशः मनोहर रीतीनें विकास पावणारा कल्पनाविष्कार; तात्त्विक विषयास काव्यमय स्वरूप देतांना दिसून येणारी, सूक्ष्म व उच्चप्रकारची मननशीलता; सात्विक प्रणय, मातृवात्सल्य, अढळ मातृनिष्ठा, कौटुंबिक सौख्याच्या अथवा वैधव्यादि दुर्धर सामाजिक दुःखांच्या घोर अन्यायाच्या प्रसंगांच्या अनुरोधानें स्फुरलेल्या करुण व कोमलोदात्त भावनाप्रधान काव्यप्रसंगांच्या निवेदनांत दिसून येणारी तीव्र तन्मयता; आणि लौकिक कर्तव्य, नीत्युपदेश, सामाजिक जागृति, ऐतिहासिक संस्मरण वगैरे सारख्या व्यावहारिकविषयपर काव्यग्रथनांत दिसून येणारा तडफदार आवेश आणि उत्साहसंचारक पौरुषवृत्तीची छटा, उपालंभाची किंवा निर्भर्त्सनेची सात्विक संतापयुक्त व तीव्र उपरोधपूर्ण मर्मभेदकता हे होत. **पुष्पांजलीचें** वरवर अवलोकन करणाऱ्यांस देखील वरील गुणांच्या निदर्शक अशा कविता सहज सांपडण्यासारख्या आहेत. तथापि, दिग्दर्शनादाखल पुढील कवितांचा येथें उल्लेख करतों— 'धिक्कार' 'ताईनें आणलेलें गुलाबाचें फूल' 'दृष्टीभेट' 'कविता आणि कविताकार' 'कवीचा वाढदिवस' 'केशवसुतास' 'रानांत उमलेलें फूल' 'माझी आई' 'आईची विनवणी' 'विधवांचें गाऱ्हाणें' 'अवन्तिकेस' 'स्फूर्ति कशांत आहे' 'ओसाडी' 'फटका' (पृ. १६३) 'फटका' (पृ. १६७) 'होळकराचा फटका' (पृ. १८५).

रा. **रहाळकर** हे ज्या कालाचे निदर्शक आहेत त्या कालांत, इंग्रजींतील 'Golden Treasury' 'Thousand

and one Gems of Poetry ' वगैरे सुप्रसिद्ध कविता संग्रहाच्या पुस्तकांतील चांगल्या चांगल्या **गीतकांचा** अनुवाद करण्याची प्रवृत्ति विशेष प्रचलित होती; व तिचा काव्य-रचनाशैलीस ठरेलपणा व सकसपणा येण्याच्या बाबतींत फार उपयोग होत असे.तशा तऱ्हेचे कांहीं नमुने **पुष्पांजलींत** आहेत.

भाषाशैलीचा मोकळा व गांभीर्ययुक्त साधेपणा, कल्पनाविष्काराचा रम्य भराऱ्या मारणारा उदात्तपणा, आणि साध्या शब्दांत सहजगत्या एखादा अर्थपूर्ण सिद्धांत ग्रथित करण्याचें कौशल्य, या बाबतीत रा. रा. **र्‍हाळकर** यांचें **केशवसुतांशीं** बरेंच साम्य आहे. याचीं कांहीं उदाहरणें पुढें देतों:–' बाहेर येति हृदयांतुनि जे उसासे। नाहीं तुवां परिसिलें वद त्यांस कैसें ? ;' ' मना ने गमे स्वर्गि तें गान–यान.' ' प्रश्नार्थीत वसे खुशी न तसली ती स्पष्ट बोलांत ये।'. ' प्रयत्न सुरु ठेवणें सतत, सिद्धि देवावरी. । ' ' कधीं असें मग कधीं तसें हा दैवाचा खेळ. । ' ' मधुर मोहक मृद्गंगि मुग्ध बाला; ।' ' दारिद्र्याच्या शून्यमहालीं नरा, घेउनि जाशी धरुनी त्याच्या करा ' ' कां भीसि, **काढिसी ओंठ,** (फार सुंदर व रम्य स्वभावोक्ति.) काय तुज बोंचे ! '

कित्येक स्थळीं सहजसुभग शब्दरचना किंवा चमत्कृतिजनक कल्पना यांचा मोठा आल्हाददायक आविष्कार झाला आहे. त्याचीं दोनच उदाहरणें पुरीं होतील. ( १ ) ' आई ' या शब्दाच्या वर्णावर दोन रम्य व अभिनव कल्पना. ' जगीं मधुर गायनाविण दुजें न सुश्राव्य तें । न साधन असें मना रमविण्या दुजें वाटतें ॥ तुझा प्रथम वर्ण तो म्हणति सूर **'आ'** गे असा । द्वितीय म्हणतात

'ई' खचित गायनीं तो तसा ॥ १ ॥ मिळून तव नाम गे मधुर 'आई' हें जाहलें। जगीं सहज नाम तें प्रियचि होउनी बैसलें ॥ परी सहज तें मुखा न रसना न ते ओष्ठ गे । अवश्य असती, सुनाम तव ध्यावया येत गे ॥ २॥"

( २ ) '**मावळे**' शब्दावर सहज करुणोत्कट व वीरश्रीसंचारक कल्पना—। तुम्हीं 'मावळे' म्हणुनि मावळे कीर्ती तुमची अशी। जोडतां कां या अपकीर्तीशीं ॥

याच्या उलट, कित्येकठिकाणीं भाषाशैलीच्या शिथिलतेमुळें, कर्णकटु, व्याकरणदृष्टया अशुद्ध किंवा इंग्रजी धर्तीचे शब्दप्रयोग, व त्या धर्तीचा कल्पनाविष्काराचा प्रकार, इत्यादिकांमुळें, एकदम काव्यरसापकर्ष होऊन, वाचकांचा विरस होतो; व क्वचित् प्रसंगीं तर भलताच अनिष्ट अर्थ सूचित होतो. त्याचींही कांहीं उदाहरणें समालोचनाच्या समतोलपणाच्या दृष्टीनें देणें अपरिहार्य आहे:- ' हृदयिं मी प्रेमें तिला ( पुष्पकलिकेला ) लाविलें ' ( इंग्रजींतील ' Held it to my breast ' सारखा प्रयोग; पण मराठींत, त्याचा स्तनपानाच्या प्रयोगासारखा अरुचिकारक अर्थसंभ्रम उत्पन्न होतो ! ) 'आशाळू नयनीं;' प्रेमाश्रू तव चुंबणें;' 'परवणी मातें गमे सुंदरीं,' ( ' परवणी ' हा अशुद्ध प्रयोग पुढील पाठभेदानें टाळतां येण्यासारखा आहे. । 'प्रेमाश्रू तव 'चुंबणें' मज गमे ही पर्वणी सुंदरी । ). 'फेकाणी नासिका;' 'केंश उठविती कांटयाची भूमिका' ( ' केंश ताठ उभे रहाण्यानें केशांनीं कांटयाची भूमिका वठविली, असा अर्थ इष्ट असून, ' उठविणें' या शब्दावर भ्रामक श्लेष केल्यानें, 'भूमिका उठविणें' हा प्रयोग

तितकासा हृद्य लागत नाहीं. तुलनेसाठीं पृ० ११८ वर, खालून २ री ओळ पहावी,); 'काय तुज बोंची ('बोचे, हा प्रयोग विशेष शुद्ध व कर्णसुभग.)''श्रमें जगति पेर ('पेरणी' या अर्थी.) तो निशिदिनीं तिचा होतसे.।' 'गाल हे, खोल किती पोंचले' (इंग्रजींतील Sunken' या अर्थी 'पोचले' हा शब्द कर्णकटु लागतो व त्यांतून 'पोचे आले' असा विचित्र भ्रमोत्पादक अर्थ निघतो!) 'बहु लडिवाळें जोपासिली बाई' ('लडिवाळें' या विशेषणाचा 'लडिवाळपणा'नें या नामाऐवजीं दृष्टिसंभ्रमानें प्रयोग पडला आहे.) हाच प्रकार पृ० १९० वर 'नामसादृशें (दृश्यें)' या संबंधीं झालेला दिसतो.

'**विधवेचीं गाऱ्हाणीं**' व '**आग**' या दोन्ही कविता करुणरसपूर्ण व हृदयस्पर्शी असून, त्या वाचीत असतां, कविवर्य रा. **तांबे** यांच्या '**विधवेचें स्वप्न**' या करुणोदात्त कवितेची सहजगत्या स्मृति होते. असो.

आतां एकच गोष्ट करण्याची उरली आहे.ती म्हटली म्हणजे, प्रकृतीस मधून मधून आलेलें अस्वास्थ्य व इतर कामांची व्यग्रता यांच्यामुळें हें '**आमोद**'लेखन माझ्या हातून तडीला जाण्याला जो कल्पनातीत विलंब झाला, आणि त्या योगानें माझ्यामुळें रा. **रहाळकर** यांस व्यावहारिक व मानसिकरीत्या जो निष्कारण त्रास सोसावा लागला असेल, त्याबद्दल मनःपूर्वक दिलगिरी प्रदर्शित करणें, ही होय. ती मी प्रांजलपणें व्यक्त करितों; आणि या प्रसंगानुसार रा. **रहाळकर** यांनीं माझ्याविषयीं प्रारंभापासून शेवटपर्यंत जी असाधारण गौरवातिशयाची आणि निर-

पेक्ष व प्रेमळ 'समानधर्मीय'त्वाची वृत्ति व्यक्त केली, तिच्याबद्दल त्यांचे पुनः एकदां आभार मानून, बराच दूरवर पसरत गेलेला हा '**पुष्पांजलीचा आमोद**' येथेंच आटो-पतां घेतों व श्री **ज्ञानेश्वरांच्या** उदात्त '**पसाय-दाना**'त्मक अवतरणानें त्याचा उपसंहार करितों:—

**" दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ॥**
**जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ १ ॥**

**पुणें,**
शुक्रवार, फाल्गुन शुद्ध २या, शके १८४५.
( ता. ७-३-१९२४ )
**श्री. नि. चापेकर.**

# हद्गत.

कवी, गायक, वादनकार किंवा चितारी यापैकीं प्रत्येक जो खटाटोप करीत असतो, तो प्रथमतः आपलें स्वतःचें मन रिझविण्याकरितां. त्याची दृष्टी एरवीं बाह्य जगाकडे फारशी नसते. असें नसतें तर इतरांना कर्णकटु वाटणाऱ्या तानेच्या भरांत सामान्य गायक तल्लीन झाला नसता. हा रोजचा अनुभव सर्वांच्या परिचयाचा आहे.

२. असें जरी असलें तरी गाणाऱ्याला काय, वाजवणाऱ्याला काय किंवा चित्रकाराला काय आपल्या आनंदाचा उपभोग घेण्यास जर दुसरा कोणी साथी मिळाला तर त्याचा तो आनंद द्विगुणित होतो, हाही पण रोजचाच अनुभव आहे. हा जो ललितकलांचा अनुभव, तोच कवितेलाही सर्वस्वीं लागू आहे. असें नसतें तर भवभूति सारखा महाकवि आपल्या काव्यकृतीचें योग्य चीज न झाल्यामुळें खिन्न अंतःकरणानें भविष्य कालाकडे नजर फेंकून 'समानधर्म्या'ची वाट पाहात बसला नसता. किंवा आधुनिक कवी ख्रि. वा. रे. टिळक यानां

रसज्ञ हो ! काय तुम्हांविना मी ।
करूं जगीं घेउनि काव्य नामी ? ॥

असा प्रश्न करण्याची पाळी येतीना. सारांश, कवीनें केलेल्या कवित्वाचा रस घेण्यास रसज्ञ पंडितही अवश्य आहे.

३. संसार हा परिवर्तनशील आहे. आणि त्याप्रमाणें काव्यसृष्टींत ही घडामोड होणें अपरिहार्य आहे. ही 'पुष्पांजली' सहृदय वाचकांस सादर करीत असतां, हें सांगणें अवश्य आहे कीं, हीं काव्यकुसुमें ग्रथित करण्यास वीस वर्षांवर काळ लोटला आहे. या कालांत

कविकल्पनेंत बराच फरक झाला असेल. तथापि, हीं ज्या कालांत ज्या अवस्थेंत व ज्या वातावरणांत संचित झालीं त्यांची छटा त्यावर पडणें अगदीं स्वाभाविक आहे. तथापि, त्यांत सहज मनोवृत्तीचें शब्दचित्र रेंघाटण्याचाच प्रयत्न झाला असल्यानें, कदाचित् कांहीं संप्रदायलुब्ध वाचकांचा कवीवर रोष होण्याचा संभव आहे. पण कृत्रिम बंधनापेक्षां सहज स्फूर्तीकडे जास्त ओढा असल्यामुळें, तो होणारा रोष मला सहन करणें भाग आहे. हा दोष किंवा गुण ह्याचा निर्णय वाचकांनीं आपल्या अभिरुचीप्रमाणें द्यावा.

४. एकट्या स्वतंत्र फुलापेक्षां त्याचा तयार केलेला सुमनहार किंवा पुष्पगुच्छ ज्याप्रमाणें पाहाण्यास अधिक रमणीय दिसतो त्याचप्रमाणें निरनिराळ्या मासिकांतून इतस्ततः विखुरलेल्या काव्य सुमनांपेक्षां ही 'पुष्पांजली' रसिक वाचकांस जास्त आल्हादकारक वाटेल, अशी उमेद आहे. यांत कांहीं कुसुमें सौरभहीन असलीं तरी, त्यांच्या रुचिर कांतिमुळें कित्येक वाचकांचे चित्त वेधितील, तर कांहीं त्यांच्या सौरभानें इतरांची मनें आकर्षण करितील.

५. रुचिवैचित्र्यामुळें हा काव्यगुच्छ सर्वांना सारखा आवडेल अशी अपेक्षा करणें चुकीचें होईल. तथापि, या अंजलीपैकीं एखादे काव्यकुसुम वाचकाची वृत्ती क्षणभर तरी तल्लीन करण्यास समर्थ होईल अशी अपेक्षा करणें अनुचित होईल काय?

६. प्रस्तुत पुस्तक बाहेर पडण्याच्या कामीं प्रथम प्रोत्साहन जर माझे कविमित्र रा. रा. भास्करराव तांबे व 'किरात' यांजकडून मिळाले नसतें, तर त्याच्या प्रकाशनाचा योग आणखी किती दिवस लांबला असता नकळे, म्हणून त्यांचें आभार मानणें अवश्य आहे.

७. या पुष्पांजलींत आमोद किती व कसा आहे हें ठरविणें, सरतेशेवटीं रसिक वाचकांकडेच आहे. तरी त्यांच्यापावेतों हा आमोद पोंचविण्याचें गंधवाहकाचें कार्य माझे सन्मित्र प्रो. श्रीकृष्ण नीळकंठ चापेकर एम्. ए. एलएल्. बी. डेक्कन कॉलेज, पुणें, यांनीं केलें आहे. तें त्यांनीं स्वतःच्या नैसर्गिक सौजन्य व रसिकतेला अनुसरून निरपेक्षतेनेंच केलें आहे. पण मला मात्र त्यांनीं त्यामुळें कायमचें ऋणी करून ठेविलें आहे.

८. महाराष्ट्र साहित्याचे विख्यात, रसिक आणि मार्मिक लेखक रा. रा न. चिं. केळकर यांनीं कार्यबाहुल्यांत वेळ काढून पुष्पांजलीची प्रत सबंध वाचण्याची तसदी घेऊन, आपला अभिप्राय दिला याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

९. सरतेशेवटीं, ज्या उदार प्रभूच्या कृपाछत्राखालीं सरस्वतीची सेवा करतां आली व ज्यांच्या विद्याभिरुची निदर्शक महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळाच्या आश्रयामुळें ही ‘पुष्पांजलि’ महाराष्ट्र वाचकांसमोर ठेवतां आली, त्या **श्रीमंत महाराज सवाई श्री तुकोजीराव होळकर सरकार बहादुर** यांचे मनःपूर्वक आभार मानल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं.

१०. ग्रंथकार व छापखाना यांत फार अंतर असल्यामुळें यांत जीं अशुद्धें राहिलीं आहेत त्यांकडे रसिक वाचक लक्ष देणार नाहींत, अशी आशा आहे.

इंदूर
ता. १ माहे एप्रिल १९२४ } **नरहर शंकर रहाळकर**

४३० ब, नारायण पेठ,

# समर्पण.

देवि,

सरस्वति !

मी ही " पुष्पांजलि "

तुलाच कां बरें समर्पण करीत आहे ?

" सखि ! जिथें

" ऐक्य तें तिथें

" शब्द ते व्यर्थ

जाणितीं सहज तीं हृदयें मनिंचा अर्थ "

( प्रेमोद्गार-पृष्ठ ३० )

"सरस्वती!" तूं मला वाहिलें हृदय आपुलें जसें

मी पण अर्पियलें तुज तसें !

( एका कु. कवीचे विचार-पृष्ठ ६४ )

तुझाच

" नरहरी "



कविः-भशीर बहादुर, नरहर शंकर रहाळकर, बी. ए.
( जन्म ता. २०-१२-१८८२ ) इंदूर.

*Photo by:—*
Messrs Ramchandra Rao and Pratap Rao, Indore.

# पुष्पांजलि.

## अनुक्रमणिका


| कवितेचा मथाळा. | पृष्ठ |
|---|---|
| १ चंद्राप्रत. ... ... ... | १ |
| २ ... प्रत. ... ... ... | २ |
| ३ स्थित्यंतर. ... ... ... | ३ |
| ४ प्रीतीचें गाणें. ... ... ... | ४ |
| ५ शंकेखोर प्रियकरास उद्देशून. ... ... | ६ |
| ६ गुलाबाचें फूल. ... ... ... | ८ |
| ७ कालची पुष्पकलिका ... ... ... | ९ |
| ८ जग मजला होय पारखें. ... ... ... | १० |
| ९ प्रियेचें पत्र ! ... ... ... | ११ |
| १० सखि–विरह. ... ... ... | १५ |
| ११ धिक्कार ! ... ... ... | १७ |
| १२ ताईनें आणलेलें गुलाबाचें फूल. ... ... | २१ |
| १३ आशा आणि प्रीति. ... ... ... | २३ |
| १४ उत्तर. ... ... ... | २५ |
| १५ विरहगीत. ... ... ... | २७ |
| १६ प्रेमोद्गार. ... ... ... | २९ |
| १७ दृष्टि–भेट. ... ... ... | ३२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ उभयतांच्या सौख्यास पुरेसा तो ! | ... | | ... | ३४ |
| १९ पत्रिका. | ... | ... | ... | ३७ |
| २० प्रीति. | ... | ... | ... | ३९ |
| २१ पत्रिका. | ... | ... | ... | ४१ |
| २२ विरहोद्गार. | ... | ... | ... | ४३ |
| २३ राग माझा वाईट असा आहे ! | | ... | ... | ४५ |
| २४ प्रियेचें चुंबन. | ... | ... | ... | ४८ |
| २५ सखीचे अश्रू ! | ... | ... | ... | ४९ |
| २६ प्रीतीचें चुंबन | ... | ... | ... | ५० |
| २७ भवितव्यता. | ... | ... | ... | ५१ |
| २८ सौंदर्य आणि प्रीति. | ... | ... | ... | ५४ |
| २९ कविता आणि कविताकार! | | ... | ... | ५६ |
| ३० शांभवीप्रत. | ... | ... | ... | ५८ |
| ३१ केशवसुतास. | ... | ... | ... | ६० |
| ३२ कवीचा वाढदिवस. | ... | ... | ... | ६१ |
| ३३ ...प्रत. | ... | ... | ... | ६२ |
| ३४ एका कुरूप कवीचे विचार. | | ... | ... | ६३ |
| ३५ तान्हुला. | ... | ... | ... | ६५ |
| ३६ स्वप्न. | ... | ... | ... | ६९ |
| ३७ सखीचा वाढदिवस. | ... | ... | ... | ७४ |
| ३८ माझी बहीण. | ... | ... | ... | ७५ |
| ३९ ओंवाळणी. | ... | ... | ... | ७७ |
| ४० आग ! | ... | ... | ... | ७९ |
| ४१ दिवाळी. | ... | ... | ... | ८१ |

४२ माझी आई. ... ... ... ८४
४३ आईचें चित्र. ... ... ... ९६
४४ मातृस्मृति. ... ... ... १०४
४५ विधवांचें गाऱ्हाणें. ... ... ... १०७
४६ व्यसनासक्ति आणि पश्चात्ताप. ... ... ११७
४७ सरस्वतीस. ... ... ... ११९
४८ मृत्यूप्रत! ... ... ... १२०
४९ बुलबुल आणि कोकिला. ... ... ... १२२
५० रानांत उमललेलें फूल. ... ... ... १२६
५१ सरिता. ... ... ... १२८
५२ ताईची संक्रान्त. ... ... ... १२९
५३ आईची विनवणी. ... ... ... १३१
५४ गृहिणी. ... ... ... १३७
५५ आराधना. ... ... ... १३९
५६ निद्रेप्रत. ... ... ... १४१
५७ अवन्तिकेस. ... ... ... १४४
५८ स्फूर्ती कशांत आहे ? ... ... ... १४९
५९ तारा आणि काजवा. ... ... ... १५२
६० सायंस्वप्नें. ... ... ... १५५
६१ तीर आणि गाणें. ... ... ... १५७
६२ एक उपमा. ... ... ... १५८
६३ दोन फुलें. ... ... ... १५९
६४ ओसाडी. ... ... ... १६२
६५ फटका. ... ... ... १६३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६६ काळ. | ... | ... | ... | १६५ |
| ६७ फटका. | ... | ... | ... | १६७ |
| ६८ जागृती. | ... | ... | ... | १६९ |
| ६९ क्षिप्रा तीरावर. | ... | ... | ... | १७१ |
| ७० ॐ ब्रह्म. | ... | ... | ... | १७३ |
| ७१ नवीसृष्टी–नवादेह. | ... | ... | ... | १७४ |
| ७२ या पुढें ? | ... | ... | ... | १७६ |
| ७३ सुख–दु:ख. | ... | ... | ... | १७९ |
| ७४ माझें गाणें. | ... | ... | ... | १८१ |
| ७५ पलीकडे ! | ... | ... | ... | १८४ |
| ७६ होळकरांचा फटका. | ... | ... | ... | १८५ |
| ७७ ‘ मित्रा’प्रत. | ... | ... | ... | १९८ |

# पुष्पांजलि

## चंद्राप्रत

व्योमीं मंद पदें कशास्तव बरें चंद्रा अशीं टाकिसी ?
आहे खिन्न तुझें असें वदन कां ?—सांगून दे तूं मशीं;

तूंतें देखिल काय पंचशर तो तारापथीं पीडितो ?
सोडोनी शर तीव्र कां तुजवरी मर्मी तुला भेदितो ?

झाली कीं वद देवता तव तुला धिक्कारिती मानिनी ?
कान्ती पाण्डुरवर्ण ही तव दिसे तेणेंच, वाटे मनीं ;

स्वर्गी ही अनुराग-कंटक तुला देतो व्यथा हा जर
भूलोकीं मज जाच दे नवल हें नाही मुळींही तर !

मासिक मनोरंजन

## ..........मृत.

सन्निध आली; ओळख झाली;
मैत्री घडली; प्रीती जडली;
लावुनि चटका शेवट गेली—
गेली हाय ! कशी ?

सूर्य उदेला; अस्ता गेला ;
शशी विकसला; विलया गेला;
उदया तारा आला; गेला—
क्षितिजाच्या खालीं !

जिकडे तिकडे शून्य जहालें
सौख्याचें तें स्वप्न संपलें
नभीं कृष्णघन दाटुनि आले
भरला अंधार !

पाहूं कोठें तुझा मुखशशी ?
हास्य चंद्रिका तव ती निरसी
कैसी हृदयांतील तमासी ?
मरण गोड वाटे !

## स्थित्यंतर

प्रीती ज्यावरती सखी बहु करी तो हा लतामंडप
ज्यातें वाढविलें तिनें मृदुकरें ते हेच हो पादप,
जीच्या मंजुरवें मला निशिदिनीं आनंदवीलें जिनें-
आहे ती मुरली; सखी परि कुठें ? माझें जळो हें जिणें!

पुष्पांचा गण हा सखीस्तव पहा निश्वास टाकितसे,
मालामाजि तयांस तो कर कुठें हा ! ओंवणारा वसे ?
जीं जीं मीं रचिलीं नवीन कवनें येथें तिथें लोळतीं
आहे कोमल कंठ तो कुणिकडे गाणार त्यांच्याप्रती ?

आतां येईल तो वसंतऋतुही येतील का हो पण
सौख्याचे अमुचे तरूणपणचे ते लोटिलेले दिन ?
त्या कालीं अमुच्या कसा समय तो होता अशी चंचल
आतां ही पण तोच कीं समय हा जातां न जातो खल!

या स्थानी क्रमिलीं सखीस्तव तदा वर्षें दिना सारखी
तैसे ते दिन हो क्षणासम, खरी ती धन्य माझी सखी !

उद्यान

---

## प्रीतीचें गाणें

Free love, free field, we love but while we may.

*TENNYSON.*

उडूं बागडूं नाचूं या,
येईल कां ही मजा उद्यां ?
प्रीतिस बंध न—रान मोकळें
रमेल मन तों प्रीती केली
वन स्तब्धलें—गाणें गेलें
पालवि मेली-आशा गेली
उडूं बागडूं नाचूं या,
येइल का ही मजा उद्यां ?

२

नवी पालवी-नवी टवटवी
थंडीचे ते दिवस उलगले
नवी टवटवी-प्रीति नवी वी
तेणें दिन ते नवे शोभले
उडूं बागडूं नाचूं या,
येइल का ही मजा उद्यां ?

३

प्रीतिपात्र तें मिळे वेगळें
नवीन गोडी तयांत आली
प्रीतिस बंध न—रान मोकळें
रमेल मन तों प्रीति केली !
उडूं बागडूं नाचूं या,
येइल का ही मजा उद्यां ?

मासिक मनोरंजन

———

## शंकेखोर प्रियकरास उद्देशून:-

येतात अश्रु सखया! मम लोचनांतें
निद्रा न ये; तुजकडे मन धांव घेतें
चित्तास ठाउक तुझ्या विरहें न शांति
मत्प्रीतिचा तरिहि संशय काय चित्तीं? १

भासे मना तुजविना जग हें उदास
देती विचार तव किंचित शांति त्यास
रात्रंदिनीं मज दिसे तव रम्य मूर्ति
मत्प्रीतिचा तरिहि संशय काय चित्तीं? २

बाहेर येति हृदयांतुनि जे उसासे
नाहीं तुवां परिसलें वद त्यांस कैसें?
माझा असे अखिल जीव तुझ्याच हातीं
मत्प्रीतिचा तरिहि संशय काय चित्तीं? ३

प्रेमौघ हा हृदयिंचा तुजला मिळाया
धांवे तया जिवलगा! अडवी न वाया

नामें तुझ्या खुलतसें मम चित्तवृत्ती
मत्प्रीतिचा तरिहि संशय काय चित्तीं ? ४

त्वन्नामघोष करुनी दिन कंठितें मी
गातें तुझेंच वदनीं नित गीत नामीं
ऐशी स्थिती तुजविणें असतां प्रिया ती
मत्प्रीतिचा तरिहि संशय काय चित्तीं ? ५

ऐसें असोनिहि तुझें जरि होत चित्त–
साशंक, मी कथित अंतिम एक गोष्ट
त्वन्नामघोषिं करुनी मन हर्षपूर्ण
शांतींत दिव्य सखया ! मग मी मरेन !! ६

# गुलाबाचें फूल.

## दिंडी.

गुलाबाचें नव पुष्प उमललेलें
ओष्ठदेशीं नेवोनि चुंबियेलें
स्पर्श अधरीं होतांच, पाकळ्यांतें–
उमलवुनिया निज कथित हितगुजातें

× × ×

" निधन येई मज आज; सुखें येवो !
गूढ माझें तुज परि ज्ञात होवो !
भाव कळला मम पूर्ण जरी तूतें
तरी मरणाचें भय न मजसि वाटे ! "

× × ×

बळें पुनरपि मीं पुष्प चुंबियेलें,
रंग त्यावर तों येति वेगळाले;
गंधरूपें लागलें पुष्प गाया
वेड तेणें हृदयास लाविलें या

× × ×

" जगीं जगण्याची प्रबळ आस होती,
क्षणीं केली त्वां परी तिची माती;
मरण येई मज हाय ! परि कशानें ?
—मृदुस्पर्शें तव—हेंच मनीं जाणें ! "

**मासिक मनोरंजन.**

## कालची पुष्पकलिका

गेलों दूर फिरावया उपवनीं, होतें अती रम्य तें
शोभा तेथिल पाहुनी मम मनीं येती किती रंग ते !
वारा झोंबत तो लतांस म्हणुनी कंपास त्या पावती
भीतिव्याकुल होउनी जणुं टिपें, पुष्पें न त्या ढाळितीं ! १

तेव्हां दृष्टिस एक पुष्पकलिका माझ्या पडे गोजिरी
प्रेमार्तास सलज्ज लोचन जसा वेधी मला त्या परी
जावोनि खुडिलें तिला, मृदुतनू रम्या अहाहा ! किती !
होता गंध तरी किती मधुर तो, नाहीं तयाला मिती ! २

तीतें हुंगुनि चुंबिलें, हृदयिं मी प्रेमें तिला लाविलें
झाली तृप्ति न ती, तिला म्हणुनि मी शीर्षावरी ठेविलें
केली दूर न मी जरी पहुडलों, ती प्राण वाटे मनीं
तीच्या वांचुनिया मला न गमलें तें रम्य कांहीं जनी ३

हा ! हा ! आज परी कशी दिसत ही निस्तेजता पावली
सांडोनी पडली मला धरणितें, ती चारुता लोपली !
झालों खिन्न, अशांत ती मजपुढें माझी सखी पातली
एकाएंकि तिला बघोनि नयनीं बाष्पें उभीं राहिली ! ४

काव्यरत्नावली.

---

## जग मजला होय पारखें

सुन्दरि! मज एकनिष्ठ भासलीस गे
भासचि परि ठरला तो शेवटीं सखे!

चेतोहर सुंदरता
अंगीं ती तव असता
असशिल तूं कपटलता
वाटलें न गे!

२

मजसम गे तुजवरती
प्रीति न कुणि केली ती
तुजसम पण कपटकृति
कुणि न मजसि गे

३

वचन जिथें पोरखेळ,
वर्तनांत कधि न मेळ,
रंग फिरे बघुनि वेळ,
प्रेम तें उगें!

४

झाली ही तव लीला
चटका परि हृदयाला-
लागुनिया; जग मजला
होय पारखें!

# प्रियेचें पत्र !

[ चालः—प्रिये ! पहा रात्रीचा ]

बघोनिया अक्षर तें, पत्र मला प्रियसखिचें वाटलें
घेउनिया पत्र करीं
धरिलें मी घट्ट उरीं
ठेवुनिया तें स्वशिरीं
प्रेमानें चुंबिलें

२

सखिहस्ताक्षर नुसतें
बघतां स्थिति मम होते-
ऐशी, तरि नवल न तें
वेड तिचें लागलें !

३

भृकुटि वरी चढवुनिया
पत्र लिही मला प्रिया
चित्र असें मम नयना-
पुढति तिचें राहिलें.

४

पत्रिकेंत काय मला
प्रिय सखिनें पाठविला-
आशय, तें कळण्याला
उत्सुक मन जाहलें !

५

हृदयाब्धि प्रेमानें
उसळे बहु जोरानें
कर कांपे कंपानें
पत्र तदां उघडिलें !

६

'लेख आतां प्रेमाचा
वाचिन मी प्रियसखिचा'
भंग परी आशेचा-
होइ, मोह तो गळे !

७

आंग्ललिपी दृष्टि पडे
अवचट हें काय घडे !

बालबोध कोणिकडे-
अक्षर तें लोपलें ?

८

वीज नभीं चमकावी
तेजोमय तीं व्हावीं—
गगनें, क्षणि परि जावी-
दीप्ति, तसें जाहलें !

९

सौदामिनिमागोनी
द्विगुणित तम तो गगनीं-
पसरे; मज लागोनी-
तमें तसें ग्रासिलें !

१०

सौख्यगिरीवर चढलों
ठेंचाळुनि परि पडलों
मोहानें मी फसलों
सर्व अतां उमजलें !

११

सफल होय बघ पुरतो
आज सख्या ! तव युक्ती
स्थिति परि मम होई ती
केवि दूर तुज कळे ?

१२

सखिविरहें हृदय जळे
इंधन हें त्यांत मिळे
त्या योगें अधिक बळें
हृदय आज भडकलें !

१३

अश्रुजलें हृदयातें
शांतवितों परि नच तें
शांत होइ अणु, उलटें-
अधिक भडकुं लागलें !

---

# सखिविरह.

[ चालः—नाहिं सुगति भासत ]

तव विरह अहह ! सहन मज
न होत जाण क्षण एकही सखे !
तुजविण मज शून्य अखिल विश्व लाडके ! ॥ध्रु०॥

रम्य वस्तु बघुनि मुळीं हर्ष नच मनीं
हृदय रिझे किमपी नच मधुर भाषणीं
निद्रा ती निमिषभरी ये न लोचनीं
तव चिंतनिं चित्त रमे एकसारखें.

२

एक[illegible] तुजविण मी शयनिं पहुडतां
भास तुझा होउनिया हात टाकतां
हाय ! तिथें तूं न जवळ; सर्व शून्यता !
घडिघडि मज भूल पडे यापरी सखे

३

मृदु मधु तव वचन कधीं श्रवणिं येउनी
उठतां शयनावरुनी भ्रांत होउनी
रातकिडा तों किरकिर गान गाउनी
भग्न करी सर्व आस हाय ! प्रियसखे !

४

रुष्ट दूर होउनिया बैसली असें
वाटुनि, मी त्वरित तुझ्याजवळ जातसे
व्यर्थ परी तूं न, चित्र तें तुझें कसें-
फसवी मज अदयपणें ? प्राणदीपिके !

# धिक्कार !

[ चाल:—नका करूं अविचार ! ]

असो मला धिक्कार !
कोमल हृदयीं कटु वचनांची
मारियली मी
कठिण कुठार ! ॥ धृ० ॥

घोर पातका धुऊं कुठें या ?
कृष्ण मुखा मम जगिं लपवाया—
स्थान न; मग मी कां वायां
वाहुं जिवाचा भार ?
असो मला धिक्कार !

२

प्रेमरसाचा मन्मुखिं पेला
प्रेमिजनानें प्रेमें दिधला,
दूर तया मीं कां केला ?
मूर्तिमंत अविचार !
असो मला धिक्कार !

३

मम विरहें सखि निशिदिनिं झुरली,
गौरतनुलता पांडुर झाली,

चिन्तनिं माझ्या जी रमली,
दुखविलि तिजसि अपार !
असो मला धिक्कार !

४

पारख करण्या मत्प्रेमाची
वदे स्वताला कपटि मनाची
विनोदांत, परि मूढाची
बुद्धी चळली पार !
असो मला धिक्कार !

५

इष्ट-हेतु जरि सिद्ध न दैवें-
झाला, तरि मी मनिं न अणावें,
कपटि स्वताला या भावें
वदली सखि साचार !
असो मला धिक्कार !

६

मी अविवेकी, परि वाग्बाणें
ताडियलें तिज निष्ठुरतेनें

झाली प्रियसखि मम तेणें
जीवावरति उदार !
असो मला धिक्कार !

७

सत्यप्रीतिज्योति भडकली
या अवमानें, करण्या सजली
बंधु कृपाणा या कालीं
हो अद्भुत प्रकार !
असो मला धिक्कार !

८

मी पापी बहु दुष्ट अघोरी,
खुपशि हृदयिं मम शस्त्र विषारी
तेंच झडकरी तूं स्वकरीं;
हाच करीं उपकार !
असो मला धिक्कार !

९

मम हृदयींच्या रुधिरस्त्रावें
प्रीतिदेवता पूजिन भावें,

प्रायश्चित्त न मज ठावें—
अन्य; कर झणीं वार !
असो मला धिक्कार !

१०

चूक न व्हावी परन्तु झाली !
क्षमा पाहिज तुवांच केली !
चरणीं तव शिर या काळीं
मार मला, वा तार !
असो मला धिक्कार !

११

मूढ अजवरी केवळ होतों,
प्रेमा निर्मळ जाणत नव्हतों !
परि मी आतां अनुभवितों
प्रीतिरसाचें सार !
असो मला धिक्कार !

मासिक मनोरंजन.

---

# ताईनें आणललें गुलाबाचं फूल.

माझ्या जिवलग ताईस तीच्या सखिनेंच एक अर्पियलें
नव पुष्प गुलाबाचें जें होतें पावसांत न्हालेलें १

जल मौक्तिक बिंदूंच्या भारें होतें विलीन झालेलें
जैशी कुलीन नारी विनयें वांकोनि मंद ती चाले २

हिरवीं पानें त्यातें लावुनि पेल्यांत त्यास ताईनें
ठवुनि त्या वरतीं तें जल सिंचियलें स्वकीय हस्तानें ३

नंतर कोमल हातीं घेउनि पेल्यास येई मजजवळीं
हांसुनि गाली विनयें निरखुनि मज काय बोलती झाली ४

" तात्या ! बघ ही गम्मत दिसतें आहे कशी मजेदार
यातें पाहुनि वद रे घेशी यांतून काय तूं सार ? ५

यावरतीं सिंचियले जल मी त्याचेच बिंदु हे दिसती
या बिंदूतें पाहुनि हृदयीं नाना तरंग मम येती ! ६

वाटे सुमन जणूं हें दुःखें ढाळीत काय अश्रूंतें
कारण तोडियलें त्या मातेपासोनी अदय नर–हस्तें " ७

ती बोलत असतां, मी होतों कवितेंत दंग झालेलों
यणें तद्वच नेणुनि, तिजवर संतप्त फार मी झालों ८

क्रोधें पेला हिसकुनि चुरडुनि पुष्पास दूर फेंकियलें
दुष्टें अरसिकें म्यां क्रोधानें कृत्य काय हें केलें ! ९

माझ्या निष्ठुर कृत्या पाहुनि ताई मनांत गंहिवरली
कुसुमस्थित ती मजला बोटानें परि तिनेंच दाखविली १०

पाहोनि पाकळ्या त्या शुद्धीवर मी तदा झणीं आलों
निंदुनि धिक्कारुनिया मातें, क्षिति मुक्तकंठ मी रडलों ! ११

रडतां रडतां माझ्या आले जे जे विचार हृदयांत,
ते ते अश्रूंनीं मम खचितचि आहेत लेखिले यांत १२

“ मूढांगो रमणीशीं ऐसें वर्तन कितीतरी करिती
हा ! हा ! धिक् धिक् त्यातें त्यांचें रसिकत्व ही जळो जगतीं

आधीं खुडिलेल्या त्या वागवितां त्यांत याच रीतीनें
हृदयीं होउनि भग्नचि गांठावें कां न त्यांस मरणानें ? १४

हालविलें जरि असतें मृदुल सुमन तें हळूंच मी हातें
बिंदू पडुनी मजला टवटवुनीया प्रफुल्ल तें दिसतें ! १५

* * *

रमणीच्या नयनींचा पुसणें अश्रू हळूंच मधु बोलें
अश्रू जाउनि झणिं कीं लज्जित हास्यें कपोल मग हाले” १६

---

# आशा आणि प्रीति

चाल:—" चंद्रकांत राजाची "

मधुमासांतिल एके दिवशीं सकाळच्या वेळीं
सागरतीरीं करिती युवती विविध अशा केली
माया, मैत्री, प्रीति, आशा इतर तशा तरुणी
स्वच्छंदानें नाचति गाति स्वैर मधुर गाणीं
नभमध्यातें रवी आक्रमी, इतुक्यामधिं कोणी
नौका-क्रीडा खेळ तयांना दिधला सुचवोनी
माया, मैत्री, प्रीति भराभर नौका निवडोनी
आंत बैसल्या तयार हातीं वल्हीं घेवोनी
नौकाऽभावें भोळी आशा तीरीं राहोनी
बघे आपुल्या प्रीतिसखिकडे आशाळू नयनीं
" समुद्र-शोभा बघुनी येइन मी सायंकाळीं
तोंवरि रिझवी चित्त कसेंतरि खेळुनि याच स्थळीं "
ऐसें वदुनी धीरदृष्टिनें देउनि धीर तिला
वल्हवि नौका प्रीति सागरीं, सोडुनी आशेला
जातां जातां प्रीतीनें जें गोड हास्य केलें
प्रीतीचें तें प्रीतिचिन्ह जणुं आशेला पटलें

प्रीती गेली, वेडी आशा मागें राहियली
वाट बघत ती प्रीतीची कीं करील काय खुळी.
सूर्य मावळे, तांबुस झालें सारें आकाश
सांज जाहली पक्षि कोटरीं येती सावकास
" प्रीति आतां येइल " ऐसा विचार मनिं येतां
आशेची ती कळी उमलली मोद होइ चित्ता
वाट पाहुनी दमली आशा परि नौका नाहीं
प्रीतीची ती अजुनि येत का, काय असे बाई ?
इतुक्यामध्यें दूर एक तो नौका तिज दिसली
हाय हाय परि प्रीतीची नच वेडि पुरी फसली !
मायेची ती नौका आली, मैत्रीचीही ती,
हाय परि कशी प्रीतीची नच येई अजुनी ती ?
काळोखानें विश्व वेष्टिलें, झाली तिमिरमयी
रजनी सारी, कोळोखहि तो सर्व-दुरी होई !
आनंदाची स्वप्नें भरलीं तीं काळोखानें
आशेचीं कीं, अहह ! ठकविलें तिजला प्रीतीनें !

# उत्तर

[ चाल:–अर्ध तनू वारुळीं ]

तव विरहानें व्याकुल हा जन असतानां सुंदरी !
तव ये प्रणयपत्रिका करीं ॥ धृ० ॥

कोमल हस्ताक्षर तव निरखुनि धन्य नयन जाहले,
हृदयही मोदभरानें खुलें;
प्रेमचंद हा विरहघनांतुनि निजकर हृदयावरी
प्रेषुनी दीप्ति देत गोजिरी;
तूं तेंथें परि हृदय तुझें तूं विचाररूपें दिलें
धाडुनि; तेणें मन तोषलें;

विरहें ढाळी अश्रु जयाची सखी,
तोच एकटा वाटे मजला सुखी !
अश्रुविणें ती प्रीती दिसते फिकी,

'प्रीती वसते संयोगीं नच, परि वियोगीं खरी'
वाटे सत्या कवि-वैखरी !

३

भृंगें झुरणें कमलिनिकरितां, कमलिनिनें त्याविणें
 कविता यांतच ती समजणें !
प्रणयसिंधुला भरती येते प्रियजन विरहें अति,
 प्रीतीलहरी हेलावती;
 प्रीतिलतेचें सगळें उलटें विरहानलिं हीं खुले
 येती त्यांतच हिजला फुलें !
 सखे ! आपुलें दोन देह हे जरी,
 आत्मा अपुला एकच असतां परी,
 चिन्तातुर का वेडे ! मग अंतरीं ?
ध्यानें दृष्टि तव हृदयीं ने, पहा तिथें सुंदरी !
 बघशिल मन्मूर्ती मग खरी.

मासिक मनोरंजन.

## विरहगीत

[ चालः–त्रिखंड हिंडुनि. ]

हुरहुर लागे तुझ्यामुळें
ती तुजलागी काय कळे ?
चालतसें मी बोलतसें
हांसतसें मी गात असें
हें परि वरती
नयनीं कढती
विरहाश्रु अति
आंत दाबितों जनीं बळें
शून्यीं कोसळती सगळें !

२

तव सहवासीं दिवस मला
क्षणापरी बघ जो गमला
तो तव विरहीं युगाहुनी
भासे मोठा अतां मनीं
कधिं मज दर्शन
दृढ आलिंगन
प्रेमें चुंबन
देशिल तूं मन म्हणुनि खुळें
चिंतनिं या घेई दोले.

सरल नासिका तव न जरी
कुरळ केश जरि तव न शिरीं
नसति नेत्र जरि मृगापरी
गौर पूर्ण तूं नससि तरीं
रूप सांवळें
परी प्रेमळें !
मज तव सगळें
फार आवडे, तुज पुढतीं
रूप जगांतील मज माती !

४

प्रेमपूर्ण तीं निरीक्षणें
हालचाल लडिवाळपणें
प्रेमळ अकपट मंजु हंसें
गोड गोड तव बोल तसें
यांचे स्मरणीं
मी दिनरजनी
तुज वांचोनी
कंठीं क्षण हे जड सखये !
अंत न पाही सत्वर ये.

---

# प्रेमोद्गार

[ चालः–तान्हुल्या ! वाटतें तुला ]

स्वामिनी
प्रीतिदायिनी
असुनि हृदयाची
कां वदसि उगिच मग दासी या चरणाची ?

२

स्थापिलें
प्रीतिचें भलें
राज्य तूं असुनी
कां व्यर्थ म्हणसि मग गरिब स्वतालागोनी ?

३

मी दास
असुनि तव खास
कां बरें वदसी
किंकरी स्वताला ? सांगा सखे ! तूं मजसी.

४

मज ‘ नाथ ’
‘ जिवाचे नाथ ’
‘ प्राणेश्वर ’ ‘ देव ’
वदुनिया सुचविसी हृदयिंचा मधुभाव

५

परि जिथें
ऐक्य तें तिथें
शब्द तें व्यर्थ
जाणितीं सहज तीं हृदयें मनिंचा अर्थ

६

परि खुळें
चित्त बावळें
मानतें नच तें
जरि ‘ नको ’ ह्मणावें, बळेंच तरि वदवीतें !

७

ही स्थिती
खरी आंतली

जाणतों सारी
त्यामुळेंच मजला गमे धन्यता भारी !

८

उभयतां
एक जीवता
पावलों असतां
मग कशास झगडूं शब्दांवर मी आतां ?

९

झर झरा
प्रीतिचा झरा
लागला वाहूं
चल तयांत आपण प्रेमानें ये न्हाऊं !

उद्यान.

## दृष्टि–भेट.

लकाकें नभीं वीज घोरांधकारीं
तमा सारुनी तेज दे दिव्य भारी
परी ती लकाकी जधीं हो समाप्त
धरा ही तमें होतसे व्याप्त जास्त ! १

जरीं पाहिलें गोड निद्रेंत स्वप्न
महानंदिं वृत्तीहि होतात मग्न
परी संपता गोड तें स्वप्न हाय
मनाची स्थिती घोर ती काय होय ! २

मृदू ओष्टिंचें ऐकतां गोड गान
मना ने गमे स्वर्गि ते गान–यान
परी थांबता गोड आलाप कीं ते
मनाला कसेसेंच होवोनि जातें ! ३

लिहाया कवी बैसला काव्य देख
मनीं कल्पना गोड ती येइ एक
परी ती जरी सोडुनी त्यास जाई
कवीच्या मनाची स्थिति काय होई ! ४

कवी जाउनी उंच ताऱ्यावरी कीं
मुदें तेथली दिव्य शोभा विलोकीं
अहा! काय एकाकि तारा तुटावा
कवी येउनी काय खालीं पडावा! ५

तृषार्तास पेला जलाचा मिळावा
मुखीं लावितां काय खालीं पडावा!
प्रकाशे प्रभातीं प्रभा तोंच तीतें
घनें व्यापणें थोर दुर्भाग्य वाटे! ६

*　　　　*　　　　*

फिरायास आलों स्थलीं या मजेंत
तुला पाहिलें बाष्पिच्या वाहनांत
तुझ्याशीं अतां येउनी बोलणार
अहा तोंच तें लागलें चालुं शीघ्र! ७

*　　　　*　　　　*

" कशाला कवे! सांगसी हे विचार
उगा खेद तेणें मना पीडणार!"
" खरे हे तुझे बोल; कैसे परी ते
मना माझिया धीर व्हावेत देते?" ८

## उभयतांच्या सौख्यास पुरेसा तो !

“ किती अक्षर मम घाण तरी बाई !
चुका तैशा किति त्यास मोज नाहीं
असें माझें पाहुनि पत्र छान
काय ‘ इकडे ’ वाटेल तरि कळे न १

किती वेडी मी काय मनीं घेत्यें
कसें होइल मम पत्र नकोसें तें
किती असले दुर्बोध तरी त्याचा
बोध स्वारीला खास व्हावयाचा २

पत्र जरि मम वाईट अक्षराचें
गोड मानुनि तरि तेंच घ्यावयाचें
जशी गोडी मम वसे अक्षरांत
तशि प्रेमाविण दुसरि कां जगांत ? ” ३

*   *   *

“ सवें पत्राच्या मूर्ति तुझी येई
सखे ! हृदया प्रत्यक्ष मोद देई !

पत्र नच तें–निजहृदयभाव मातें
अति प्रेमें धाडिला तुवां वाटे ! ४

काय पारख गे ! बोल याच वेळीं
मम प्रेमाची तुवां सखे ! केली
आजवरि कां साशंक तुझें होतें
हृदय मजविषयीं ? सांग तूं मला तें; ५

प्रीति माझी मी व्यक्त करायाला
युक्ति नाना अजवरी योजियेल्या
तरी जोंवर तो प्रीतिभाव तूंतें
व्यक्त नव्हता तों व्यर्थ यत्न होते ! ६

भग्न असतां रथचक्र एक पाही
रथा चालविणें शक्य कदा नाहीं
एकपक्षीं ती प्रीति दाखवून
तिचा होई उपयोग तो मुळीं न ७

प्रीति होईना व्यक्त चुंबनांत
नसे किंवा ती होत दर्शनांत
प्रीति शब्दांनीं व्यक्त होत नाहीं
कृति प्रेमादर्श तो नसे कांहीं ८

पुणे मराठी ग्रंथालय
४१७ ब नारायण
दा. नों.



दोन हृदयांचा एक भाव होता
प्रीति वाटे मज तीच, सखे ! आतां
तुझा माझा जरी एक भाव होई
तरी सांगे मग भेद कुठें राही ? ९

पत्र जरि तव दुर्बोध तरि मला तें—
कळे, याचें नच नवल मुळीं कांतें !
जिथें हृदयें वाचतों एकमेक
तिथें शब्दांची काय कथा देख ? १०

एक होई तें रूप जिथें पाही
अन्य तेथें तो भाव कुठें राही ?
'तुझें-माझें' हा द्वैतभाव जातो
प्रेम साम्राज्यीं लोपुनीं सदा तो ! ११

नदी मिळतां जाउनी सागरांत
पहा सागरता पावते क्षणांत
ध्वनित यानें जो अर्थ तुला होतो
उभयतांच्या सौख्यास पुरेसा तो ! १२

---

# पत्रिका.

( चालः–अर्ध तनू वारुळीं )

प्रणयप्रेरित तुझी पत्रिका सखया मज पोंचली
तेणें चित्तवृत्ति तोषली ॥ धृ० ॥

कवितासुंदरि गुंगुनि गेली वाचुनि तव आशया
लागे सहजचि मग गावया.

रसिका वांचुनि मंजुल गाणीं कवितेची या जनीं
रुचती कवणाच्या नच मनीं
जन्मबधीरा गाणें कसलें असे ?
विमल चंद्रिका अंधा कैशी दिसे ?
अरसिक जन त्या काव्य रुचावें कसें ?
रसिक खरा तूं म्हणुनि माझी कविता सखि धांवली
तुजला बोधाया पातली.

२

काम, प्रीति यांच्यामाजी अंतर भारी असे
समजे तुजला नच कसें ?
प्रीतीचें तें सोंग घेऊनी काम तुला न्यावया
झाला सज्ज असे ह्या वया

सोंगाड्या हा कुशल असे बहु, प्रीतीचें सोंग रे
उठवी त्यांतहि अगदीं पुरें;
काय कधीं नट–विक्रम विक्रम करी ?
त्यास कधीं का येइल विक्रमसरी ?
तीच गती या कामाची ही परी !
नाटक याचें प्रथम गोड, परि शेवट वाइट अति
कधींही होइ न वश त्याप्रति

३

कामव्यथित प्रथम यातना होइल तुजला खरी
कालें होइल ती परि दुरी;
तोच तुला मग बोधिल अंगें ' मार्ग तुझा नच बरा
होता खास चुकीचा पुरा; '
याच मुखें मग गाशिल गाणीं माझी नानापरी
म्हणशिल तारक मातें खरी;
चंद्र मागणें वेड काय हें नसे ?
सूज्ञपणा या म्हणेल कोणी कसें ?
कामाचा हा लाड न; आहे पिसें !
चपला चमके दिव्य धवल बहु चम्कन् मेघोदरीं
तुजला मिळेल ती का परी ?

**मासिक मनोरंजन**

---

# प्रीति.

[ चालः—सुफलाशेनें रुचिर ]

"' वदनपद्म तव अश्रु हिमें बत्र डवडवलें हे किती !
        रागें रक्त कपोलहि अति !
अधर स्फुरतो, भृकुटि वक्रता वरिते कां सुन्दरी ?
        कां हा रोष असा मजवरी ?
सेवेमधिं तव तत्पर किंकर हात जोडुनी असे
        शोभे तुजला मग हें कसें ?-"

        पुरे, पुरे मज ठाउक आहे किती
        प्रीति आपुली मजवरती पूर्ण ती ?
        ' वेडी ' मी ना भासे अपणाप्रती ?

कशास मग हो शपथ वाहिली ? सुस्कारे सोडले,
        लटकें प्रसन्न मुख दाविलें ?
प्रेमा दावुनि मधुर बोलुनी बहुपरि, ही मुद्रिका
        घातली करांत मम का फुका ?
कविता सुंदर, रमा तिच्यासह, कांहीं मज आपुलें—
        नलगे, घ्यावें जें जें दिलें "

अंगुलिमधुनी अंगुलिका मग सखिनें ती काढिली
रागें मत्करिं झणिं घातली
"अंगुलीका ही सर्व नसे जें दिलें
कोठें गेली माझीं आलिंगनें
देइं तशीं मग सगळीं मम चुंबनें"
ऐसें मद्वच सखी परिसतां लज्जान्वित जाहली
प्रेमें शीघ्र मला भेटली.

हास्य कपोलीं उदय पावलें, टवटवली मुखकळी
वदनीं प्रेमछटा फांकली

हळुं हळुं माझ्या अधरप्रांतीं अधर तिचा लागला
मी ही प्रेमें तो सेविला

दो हृदयांचे मीलन झालें भाव दुजा लोपला
प्रीतिचा सहज जय जाहला
प्रीति वस्तु ही कठिण सांगणें अति
हृदयीं पटते मात्र तिची खूण ती
तद्व्याख्या करण्या शक्त न भाषा, मती
भूलोकीं या प्रीतिदेवता एकच गमते सती
धन्या तिजमुळेंच वसुमती !

---

# पत्रिका

रात्रीं शांत समस्त विश्व परि मी वाचितसें पुस्तकां,
तैं मातें गवसे त्वदीय सहसा ती रम्य गे पत्रिका;
हस्तें कोमल जी असे लिहियली प्रीती धरोनी मनीं
ती माझ्या हृदयीं स्मृतीस तुझिया जागी करी गे झणीं १

आलिंगीन कधीं बरें तव वपू माझे जिवाचे सखी !
केव्हां हस्त धरून ते मृदु तुला घेईन गे मंचकीं,
माझ्याशीं करशील मंजुल कधीं कांते ! हळू भाषण,
केव्हां जी अधरीं तुझ्या वसतसे ती मी सुधा चाखिन ?२

नाना रंग तदा मनांत उठले, गेलों अती गुंगुनी
मूर्ती रम्य दिसे तुझी मजपुढें जी चारुतेची खनी;
आलिंगूं उठलों तिला झडकरी मी लांबवूनी कर
अन्तर्धानचि पावलें अहह ! कीं तों स्वप्न तें सुन्दर ! ३

स्वर्गांतून दिलें मला ढकलुनी कोणीतरी भूवरी—
कांटयांमाजि, असे मला गमुनि मी ठेंचाळलों अंतरीं

होती गे तव दर्शनें उसळली प्रेमोर्मि जी आंतुनी,
तीं आतां स्रवण्यास लागत असे मल्लोचनांपासुनी ४

हा ! हा ! कष्टविलेंस गे मज कसें तूं पत्रिके प्रेमळे !
मी पेटींत करून बंद तुजला शिक्षा करी त्यामुळें;
जेव्हां जाइन मी सखीप्रत, तुला बाहेर तैं काढुनी
मी सांगेन तिला तुझी कृति, तुला हातीं तिच्या देउनी !५

मासिक मनोरंजन.

---

# विरहोद्गार

[ प्रिये ! पहा रात्रीचा:–ही चाल ]

नको, नको, हृदयीं या शर टोचूं मन्मथा ! असें ॥धृ०॥

सखिविरहें हृदय विकल
त्यांत तुझा मार सबल
सांग कसें सहन करिल
—जेर होतसे !

२

चंद्रा ! ती शशिवदना
प्रतिकृति तव असतांना
तिजसाठी झुरतांना
—पीडिसी कसें ?

३

मंद शीत पवन जरी
मत्तनु परि दहन करी

भडके हा जाळ उरीं
—प्राण जातसें !

४

स्थिति ऐशी जरि मम ही
नाहीं मज तरि कांहीं
त्वच्चिन्तन सखि ! पाही
—सौख्य देतसे !

मासिक मनोरंजन.

---

## राग माझा वाईट असा आहे!

"तीन पत्रें धाडिलीं तरी नाहीं
'इकडलें' कां तें पत्र येत? बाई!
काय माझा अपराध असा झाला
राग म्हणुनी स्वारीस फार आला? १

'इकडचें' तें जरि पत्र मला नाहीं-
तरी चिंता जी मजसि तिचे कांहीं-
असे 'इकडे' का? मजसि काळजींत
मौज 'इकडे' वाटते टाकण्यांत २

सत्य लिहित्यें, नच राग अतां यावा
विनोदाचा परि भाव मनीं ध्यावा
जरी उत्तर नच यास अतां येई
तरी मीही पण धाडणार नाहीं—" ३

*    *    *

"प्रेमपूरित हें पत्र तुझें कांते!
चित्तवृत्तीतें सहज तोष देतें;
दूर आहे जरि तुझा वदनचंद्र
तरी येथें मम चढत हृत्समुद्र ४

'फार कोपें तें प्रेम नष्ट होई
कोप नसतांना प्रेम विफल जाई!
अल्परागें अनुराग खुलें भारी
रसिक जाणें मग त्यांतली खुमारी!' ५

गमे यांतील तें तत्त्व पटें तूतें
पत्र असलें धाडिलें म्हणुनि मातें
विनोदाचा तव राग बघुनि ऐसा
दुणावावा अनुराग मम न कैसा? ६

तुला चिन्ता तरि त्यांत सौख्य मातें
असें लिहिसी आश्चर्य मला वाटे!
सिद्ध करिसी सिद्धांत कसा बोल?
प्रमाणाविण बोलणें सर्व फोल! ७

असे किंवा सिद्धान्त हा उपांग
तुझ्या रागाचा, मजसि झणीं सांग;
असें नसतां मज दोष तुवां देणें—
शक्य नाहीं, मी पूर्ण मनीं जाणें ८

'आव' रागाचा विनोदांत केला
तुवा तेणें मज कोप 'खरा' आला;

## राग माझा वाईट असा आहे !

सत्य कथितों मी राग तुला येवो
परि न कोपें रसिकता लुप्त होवो ! ९

नको धाडूं तूं पत्र मुळीं मातें:
मीहि नाहीं कधिं धाडणार तूतें;
तुझी माझी होईल भेट जेव्हां
तुझ्याशीं मी नच बोलणार तेव्हां ! १०

नयन नयनां तव बघुनियां खुलोत !
अधर, अधरीं तव सहज तें मिळोत !
गाल, गालाशीं जाउनी जडोत !
हृदय हृदयीं तव भिडो तें मजेंत ! ११

असें झालें तरि बोलणार नाहीं
तुझ्या संगे मी 'एक शब्द' पाहीं !
राग माझा वाईट असा आहे
तोड त्यातें या जगीं कुठें नोहे ! १२

मासिक मनोरंजन.

## प्रियचें चुंबन

जातां या अधरीं तुवां प्रियतमे !
जें मुद्रिलें चुंबन
त्याची दिव्य सुधा सदा जपुनि मी
ठेवीन रात्रंदिन
एकान्ती अपुलें जधीं पुनरपी
होईल संमीलन
तेव्हां प्रेमभरें करीन तुजला
सव्याज मी अर्पण !

# सखीचे अश्रू !

छे, हे आवरसी असे प्रिय सखे !
कां अश्रु तूं आपुले ?
प्रीतिद्योतक ते, तया झडकरी
दे वाहुं गे मोकळे
प्रीती जाईल का त्वदीय गळुनी
ऐसें तुला वाटतें
छे, छे, हें भय वागवी न हृदयीं
राहोत ते वाहते !
नेत्रांतूनि न येत जों तव सखे ?
अश्रू कपोलावरी
आनंदें तव दास तों झणिं तया
चुंबूनि टाकीन मी
'प्रेमाश्रू तव चुंबणें' परवणी
मातें गमे सुन्दरी !
ऐसा मंगल रम्य चुंबनविधी
लाभो मला नेहमीं

## प्रीतीचें चुंबन.

"दे दे चुंबन लाडके ! न लपवी हस्तें कपोला असे"
"द्यावें मी तरि नित्य तें कितिकदां ? बाई मला वाटतें-
लज्जा फार मनीं परंतु 'इकडे' वाटे न कांहीं कसें ?"
कांतेचे वच ऐकुनी, पति करी ऐसें समाधान तें:—
" तारे या गगनीं तुला दिसति जे ते मोजिले तूं जरी
त्यांच्याहूनि अधीकदां जरि तुला मी चुंबिलें गे तरी
नाहीं तृप्ति कधीं प्रिये ! कथितसे होणार माझ्या मनीं
प्रीतीचीं गणलीं कधीं तरि कुणी तीं चुंबनें कां जनीं ?"

---

# भवितव्यता

[ चालः-चंद्रकांत राजाची कन्या० ]

प्रभात झाली, सूर्य उधळितो गुलाल गगनांत;
वृक्षलताही फुलें उधळिती प्रेमें डौलांत.
झुळुझुळु वाहुनि ओहळ सरिता गाति गोड गीत;
गान मधुर बहु पक्षी गाती मस्त लकेरींत.
पुच्छ उभारुनि थवा गुरांचा निघे वनीं जाया,
घुमवुनी पांवा गोड सुरांचा राखि गुराखि तया,
अशा अवसरीं एक कुमारी कटिं घट घेवोनी,
मंद पाउलें टाकित आली गात मनीं गाणीं.
वय चवदाची, सरळ मनाची, खाणहि रूपाची,
नाजुक, मोहक बांधा शेंगच जणुं ती चवळीची.
श्वेतवर्ण ती, श्वेतवसनही ल्यालेली रमणी
अवतरली ही पुन्हां जणुं महाश्वेता या भुवनीं।
सरळ नासिका चांफकळिपरि मोहक तरतरीत
डोळे तीचे हृदयविदारक मारक गरगरित.
कुंतल काळेभोर मोकळे स्कंधावरि रुळती,
तरुणांचें मन बद्ध कराया जाळें पसरविती.
कठिण उच्च कुच वक्षीं बसले चकोरपक्षि अहा!
चंचुपुटें तीं सिद्ध कराया हृदया विद्ध पहा!

तनुलतिकेला बहार आला दोन फुलें फुललीं,
उरस्थलीं तीं मुसमुसुनीया दिसतीं गरगरलीं.
पोर कुणाची ? ही गरिबाची, रूपीं श्रीमंत,
ठुमकत मुरडत गजगति चालत धुंद यौवनांत.
निर्झरतीरीं जों न पातलीं काय असें झालें ?
घट कटिंचा तो पडला खालीं, मुखही बावरलें.
पदर गळाला उडूं लागला वाऱ्यावर स्वैर,
केंस मोकळे उडूं लागले वदनीं भुरभूर
काय ऐकतें ? काय पाहतें ? वृत्ती बावरली;
स्वतास विसरुनि दृष्टि हिची ही कुणीकडे खिळली ?

* * *

तरुण बांड सरदार कोण हा घोडयावर स्वार
घोडा फेंकित अबलक आला कटितटिं समशेर !
झोंकनोक त्या सरदाराचा बाणा सरदारी,
शिरीं खुलतसें ऐटित त्याच्या मंदिल जरतारी.
भव्य भाल तें, भव्य वक्षही, रुबाब भव्य तसा,
हया दावया पाणी आला त्या ठाया सहसा.
दृष्टि मिळाल्या, वृत्ति जुळाल्या, मनें एकवटलीं,
परस्परांचें भान हरपलें हृदयें हारवलीं.
प्रीतीचें साम्राज्य माजलें, एकजीव झाला,
' मी-तूं ' ' तूं-मी ' मुळीं न उरलें, भिन्न भाव गेला.

* * *

ढग आकाशीं आले काळे, सुटला तो वात,
पोर परतली घरा, स्वारही गेला वाड्यांत.
तरुणि उसासे टाकी, चिंतन ध्यान करी त्याचें;
तोहि तसा निःश्वास टाकितां मनन करी तीचें.
लौकिकरीती, समाजरीती, उच्चनीच-भाव.
विषमस्थिति ही देइ न परि ती प्रेमाला वाव.

*　　　*　　　*

सरदारानें थोर कुलांतिल अन्य कुमरि वरिली;
मातापितरें तिलाहि दुसऱ्या गरिब वरा दिधली.
राज महालीं जरी वसतसे मोठा सरदार,
प्रतिक्षणीं परि तिची मूर्ति त्या दिसे सभोंवार.
क्षुद्र झोंपडी तिच्या नशीबीं आली जरि दैवें,
सरदाराचें तरी करितसे ध्यान नित्य भावें.

*　　　*　　　*

विधिनिश्चित भवितव्यताहि तिज कोण बदलणार ?
"हें नच होतां तें जर होतें—" मनिं जग वदणार !

' विविध '-काव्यमाला.

# सौन्दर्य आणि प्रीति

[ चालः—नृपममता रामावरती ]

" प्रीतिचें गान निजवदनीं
निशिदिनीं गात तूं असुनी- प्रियसख्या !
मग कशी प्रियसखीविषयीं
प्रीति नच वसे तव हृदयीं ?-प्रियसख्या !
तव सखी उणी नच रूपें
मग कुठें प्रीति तव लोपें ?- प्रियसख्या !
' प्रीतिचा जन्म रूपांत '
गातात कवी काव्यांत- प्रियसख्या !
ही जरी
सत्य वैखरी
तुझ्या मग तरी
वर्तना बघुनी
नच यावें जल का नयनीं ?-प्रियसख्या! "

* * *

२

" वानितों कोंवळ्या हृदया
प्रेमें तव मी या समया- प्रियसख्या !
प्रीतिची कल्पना कोती
परिसतां कींव ये परि ती- प्रियसख्या !

‘ रूपांत वसेना प्रीति ’
हें सत्य जाण तूं चित्तीं-    प्रियसख्या !
        सकुमार
        दिसे गुलजार
        अफूचें फार
            पुष्प, परि बघुनी
भ्रमर न तो मोहे स्वमनीं-   प्रियसख्या !

२

न प्रीति उपजते यत्नें
तिजपुढें व्यर्थ तीं रत्नें-    प्रियसख्या !
न प्रीति शिकवुनी येई
सहवास न कारण तिजसी-   प्रियसख्या !
प्रीतिचा झरा बघ आंत
नच वसें कधीं बाह्यांत-    प्रियसख्या !
        रूपास
        बघुनि नच खास
        वरी कुब्जेस—
            कृष्ण, परि बघुनी-
हृदय, हें आण तूं ध्यानीं-प्रिय सख्या !”

## कविता आणि कविताकार !

बसे कविता खोलींत कवि लिहाया
लेखनाचें साहित्य घेउनीया
मग्न झाला कवितेंत कवि अपार
फिरुनि फिरुनी खाजवी शीर्ष फार;
जरी ऐसा तो बहुत जाय वेळ
तरी कविस न ती जमत एक ओळ !

२

अहा ! इतुक्यांतचि शीत सुभग वारा
येऊं खिडकींतुनि लागला भरारा;
याच वेळीं खोलींत ये कवीचें
गात गाणें कोकील वसंताचें
तयें खोली जरि गानपूर्ण केली
कविस्फूर्ति न तरि जागृतीस आली !

३

" जरा कोठें कल्पना येउं लागे
तोंच आली ही ब्याद काय अंगें "
असें म्हणुनी तो कवी उठे वेगें
अहह ! हाकी त्या पांखरास रागें
पुन्हां डोकें खाजवी सारखें तें !
परि न कविता ये आमुच्या कवीतें !

४

याच वेळीं बागेंत फुलें होतीं
घेत आंदोलन वायुसह मुदें तीं
धेनु वत्सास्तव पहा धांव घेती,
गीत संध्येचें पक्षि मधुर गाती
सृष्टि कविता तो व्यक्त करि जनाला
तरि न कविता ये हाय ? या कवीला !

५

मधुर, मोहक, मृद्वांगि, मुग्ध बाला
निघे वेळीं या भेटण्या प्रियाला
तिचा इतुक्यांतचि सखा पुढें येई
तीस आलिंगुनि चुंबनास घेई
सखी सखयाच्या करीं हात घाली
प्रीतिकुंजीं मग उभयतांहि गेलीं

६

खरी कविता तो खऱ्या कवीमागें
निघुनि गेली रमण्यास तयासंगें
तिची नाहीं ती दाद या कवीला
बसे कविता खोलींत लिहायाला !
यत्न केला किति बापुडया कवीनें
तरि न कविता ये अजुनि ती कशानें !!

मासिक मनोरंजन

## शांभवीप्रत

( चाल:--अर्धतनू वारुळीं )

प्रसंग पहिला तुजसह हा, हो शेवटलाही परी
नलगे संग तुझा यावरी ! ॥ धृ० ॥
ज्ञानवल्लि तूं, गगन पुष्प तूं, पान गंध तव करी
वेडें सकला बहु अंतरीं
तूं रूपाची, गोड गुणांची, परिसुनि ख्याती अशी
पडलों हाय शेवटीं फशी !
क्षणीं हास्य मीं क्षणीं रोदना करीं
क्षणांत गगनीं क्षणांत पृथ्वीवरी
क्षणीं सूक्ष्म मी क्षणीं स्थूलता वरी
क्षणांत सावध परि क्षणीं मी बेसावध अंतरीं !
नलगे संग तुझा यावरी !

२

तव सहवासीं अनुपम सुख ये, ऐसें वदती जरी
उलटा अनुभव माझा परी
तव सुख घ्याया खचित सांगतों रसिक नसें मी जरा
आहे नालायक परि पुरा !
तुझ्या गुणांचे रसिक तयांनां खुशाल कर तूं फिदा

मातें नांव नको तव कदा !
व्यसनांची तूं ओंगळ अससी झरी
मूर्खपणाची मूर्त देवता खरी
अविचारांची जननी गमसी पुरी
चुकुनि सेवितां तुजसि एकदां अदल घडली पुरी
नलगे संग तुझा यावरी !

३

झालें गेलें, घेइन तुज नच या पुढतीं मी करीं
ठरलों अरसिक जगतीं जरी
पदरीं होतें पातक संचित, बुद्धि तशी जाहली
म्हणुनी संगति तव सेविली
तव सहवासें धडा मिळाला गोड मला हा किती
त्याची पडेल नच विस्मृति
दारिद्र्याच्या शून्य महालीं नरा
घेउनि जाशी धरुनी त्याच्या करा
विहार करिशी त्याशीं मग तूं पुरा
विहार नलगे परी मला तो, प्रणाम तुज मी करी
नलगे संग तुझा यावरी !

प्रभात.

## केशवसुतास

आर्वाचीन कवींत कोण गगनीं मारी भरारी वरी ?
शौर्यें कोण रणांगणी चमकला अंगें 'निशाणा' सवें
राष्ट्रा जागृति आणण्यास कविता जागी कुणाची पुरी ?
निद्राग्रस्त मनें दणाणुनि दिलीं कोणीं ' तुतारी' रवें ?

' आम्ही कोण ?' म्हणोनि कोण कवि तो
गर्जोनि आला पुढें ?
वेडापीर खराच कोण कवितेमागें पुरा जाहला ?
कोणाचा वच पौरषोक्त पडता कर्णांत वारें चढे—
शौर्याचें सगळ्या तनूंत ? कवी हा तो कोण सांगा मला ?

आहे तो कवि तूंच केशवसुता ! तूं ही कवींचा कवी
हा ! हा ! का कविता परी तव अशी गुल्दस्त ती राहवी?
रत्नें सोज्ज्वल मोलवान पडली येथें तिथें हीं अशीं
त्यांचा हार न गुंफण्या रसिकता आम्हांत येई कशी ?

कोणी संग्रह का तिचा न करणें एके ठिकाणीं कसा ?
चित्तीं हा शिरतां विचार सलतो मन्मानसा शल्यसा

मासिक मनोरंजन.

# कवीचा वाढदिवस

वर्षें बाविस जाहलीं मज जगीं जन्मास येवोनि तीं
शांतीची शिवली परी झुळुक ती मातें न कीं अल्पही
बागेची उपमा जगास कवि या देतात, देवोत ती
मातें चोंहिकडे परी दिसतसे ओसाड सारी मही.

कोठें प्रीतिलता ? कुठें वसतसे प्रेमा ! तुझा कुंज तो ?
आशावृक्ष असे कुठें ? विमलते ! कोठें त्वदीया झरी ?
सौजन्या! कवण्या स्थलीं असिस तूं? स्नेहा! कुठें तूं तरी?
सौख्या ! तूं वससी कुठें? रसिकते! कोठें तुझा वास तो?

हा! हा! सर्व मला पराङ्गमुख अशीं होवोनि गेली दुरी!
वाटावी मज का न हीं मग मही शून्या अशी लोचनीं!
शून्यामाजि अशा कितीतरि मला तीं घालणें वत्सरें ?
नाहीं स्वार्थ तसा परार्थहि मुळीं मी साधिला जन्मुनी.

लोकीं या जरि घातलीं अहह ! मी बावीस अब्दें तरी
मातें काय उरें खरें ' मम' असें ?-'ग्रा'-'वी'-' स'
हीं अक्षरें !

---

## ..............प्रतें

सुगुण निधान
दव मज गान-तहान ॥ धृ० ॥
गान न म्हणुं या
स्वर्गीं न्याया
ये मज परि हें यान !
तान सुराची
घेतां साची
हरतें माझें भान !
अभिनय मोहक
हृदय विदारक
नुरवी देहीं त्राण !
सुंदर काया
मोही हृदया
व्याकुळ करि परि प्राण !
चटका लावुनि
जाशी टाकुनि
हें परि निष्ठुर जाण !

---

# एका कुरूप कवीचे विचार

[ अर्ध तनु वारुळीं:-ही चाल ]

विधे ! काय रे नव्हतें तुजला काम दुजें चांगलें
म्हणुनी रत्न असें घडविलें ! ॥ धृ० ॥
किंवा माझा खेळ जगाला व्हावा म्हणुनी मला
देवा ! जन्म तुवां का दिला ?
किंवा निद्रेमाजी माती ठेवुनि मातीवरी
निर्मिली मूर्ति मम गोजरी ?
सौन्दर्याच्या मालेमधिं वा दृष्टमणी ओंविला
देवुनी कृष्णत्वातें मला ?
फेंपाणी ही गोड किती नासिका !
खोल नेत्र हे काय शुद्ध वापिका !
केंश उठविती कांटयाची भूमिका !
इंदिरेस तो शंख शिरोमणि बंधु होय कीं जसा
मी ही सुंदरतेला तसा !

२

वदनाची मम छबी पाहुनी नारीजन वाकवी-
भृकुटी; खदिरानल नयन वी !
दर्शन मात्रें ज्याच्या इतुकी मौज उडे त्याजला
मग तरी प्रीतीविषय कोठला ?

सुंदरतेनें ज्यास ढकलिलें, प्रीतीनें लोटिलें,
तयाचें व्यर्थ जिणें जाहलें !
काय तरंगिणि कूपा केव्हां वरी ?
काय चंद्रिका राहूतें स्वीकरी ?
काय सुंदरा तरुणी जरठा वरी ?
या न्यायें मज जग धिक्कारी, येथें मग कोणतें
चुकेना, होई जें योग्य तें.

२

'सरस्वती' गे ! प्रिये लाडके ! कविते ! तुजला परी
पटला कैसा हा अंतरीं ?
मर्कटमूर्ती हृदयीं तुजला रम्य काय भासली
म्हणुनी माळ तया घातली ?
रसिकत्वातें हृदयातें मम अंतररूपा तसें
पाहुनी वरिलें मज तूं असे !
रजनी काळी परि वी प्रीतीझरा,
दिवस गौर तो परि शिकवी मत्सरा,
बुधचि जाणतो गार कोणती हिरा,
'सरस्वती !' तूं मला वाहिलें हृदय आपुलें जसें
मी पण अर्पियलें तुज तसें

मासिक मनोरंजन.

# तान्हुला.

[ तान्हुला निजला असून झोंपेंत स्वप्न पाहत आहे; जवळच त्याची आई बसली असून प्रेमपूर्ण वात्सल्य—नयनांनीं त्याला अवलोकन करीत आहे. तान्हुला झोंपेंत दचकतो, रडवें तोंड करतो, रागाचा आविर्भाव दाखवितो व शेवटीं गालांतल्या गालांत हसतो; त्यास उद्देशून आई म्हणते:—]

(चाल:—निर्जनीं घोर या वनीं)

तान्हुल्या !
वाटतें तुला
काय तरि बाळा ?
झोंपेंत दचकसी काय असा ? वेल्हाळा !

२

जग कसें
ठाउकें नसे
मुळीं तुज कांहीं
तुज 'आजउद्याचा' विचारही पण नाहीं.

३

कठिणता
मूर्त ती स्वता

जगीं या भरली
झुळकही तिची परि नाहीं तूं अनुभविली.

४

बाधिती
षड्रिपु गांजिती
अम्हाला बाळा !
परि दूर पळति तव भिउनि शुद्ध आत्म्याला.

५

कां बरें
हृदयिं मग भरे
भयाची धडकी
चिमुकल्या ! तुझ्या ही ? काळिज मम तुटतें कीं.

*  *  *

६

तुज असें
काय तरि दिसें
म्हणुनि मुख रडवें
जाहलें तुझें हें ? नयनीं मज मच बघवे !

७

कल्पना
तुझ्या नच मना
मुळीं दुःखाची
कां भीसि, काढिसी ओंठ, काय तुज बोंची ?

८

संसृति
दुःखपूर्ण ती
मनुज रडण्याला
जन्मला जगीं, परि बाळपणीं सुख त्याला

९

तूं जाण
सुखाची खाण
पूर्ण ती असुनी
झोंपेंत दुःख तुज दुःख देत कोठोनी ?

*　　*　　*

१०

वळविल्या
मुठी, चढविल्या

भृकुटि कां भाळीं ?
हा राग कशाचा तुला तरी या काळीं?

*  *  *

११

कोंवळी
स्मिताची कळी
कोंवळया गालीं—
विकसली, कपोलीं खळीं गोड किति पडलीं!

*  *  *

१२

कुणिकडे
लपवुं या गडे
जगा पासोनी
का हृदय फाडुनी ठेवुं आंत लपवोनी ?

काव्यरत्नावली

## स्वप्न.

[ चाल:—नृप ममता रामा. ]

ताऱ्यांविण रजनी काळी
भयदायक होती झाली— सुंदरी!

जोरानें झंझावात
वाहत तो आकाशांत— सुंदरी!

घुबाडांचाही घूत्कार
श्रवणीं यें वारंवार— सुंदरी!

दुश्चिन्हें मजला भारी
भिवविती यापरी सारीं— सुंदरी!

कल्पना
दुष्ट बहु, मना
तीव्र यातना
हाय, त्या काळीं
देती किति वेळोवेळीं— सुंदरी!

२

क्षुब्धता नभीं ती जैशी
हृदयीं ही वागे तैशी— सुंदरी!

खळवळुनि विषण्णा वृत्ती
घाबरें मनाला करिती— सुंदरी !
शांतिस्तव पडलों शयनीं
पाहिलें स्वप्न तों नयनीं—सुंदरी !

स्वप्नांत
दूर देशांत
असुनि, अंगांत—
हुडहुडी भरली
ज्वर भरे मला त्या काळीं—सुंदरी

२

काखेंत गांठही आली
ग्रंथिज्वर घाला घाली— सुंदरी !
पाहुनी स्थिती मम ऐशी
स्नेहीजन ये मजपाशीं— सुंदरी !
" व्हा दूर; जवळ नच यावें
इतुकें परि कार्य करावें— सत्वरी

सुंदरी
हृदयमंदिरीं

वास जी करी
तिला मजजवळीं
आणवा तुम्ही या काळीं—सत्वरी ”

*        *        *

४

झोंपडींत खाटेवरती
असतां मी एके रातीं— सुंदरी!
मजकडे चारु तव मूर्ती
येतानां मज दिसली ती— सुंदरी!
तूं नव्हे-मूर्ति करुणेची
अवतरे मजपुढें साची— सुंदरी!
वाहती
अश्रुच्या तति
श्वास चालती,
नीर तव गालीं
स्रउनी तुज न्हाऊं घाली— सुंदरी!

५

“हा ! प्रिया !” एवढें म्हणुनी
धांव तुला घेतां बघुनी— सुंदरी!

शय्येवर उठुनी बसलों
"हो दूर-" असें तुज वदलों-सुंदरी!

" पाहिलें तुला मी नयनीं
तूंही पण बघ मज दुरुनी—सुंदरी!

मज हात
लावितां घात
तुझा बघ यांत
म्हणुनि मज जवळीं
येइ न तूं या अवकाळीं- सुंदरी !"

६

हे बोल पुरे नच झाले
तों तव कर कंठीं आले— सुंदरी!
चुंबिलें तुवां मम गाला
प्रेमानें वेळोवेळां— सुंदरी!
निश्चला सार्थ दृष्टीसी
मजकडे लावुनी वदसी— सुंदरी!

" हें जिणें
आपणाविणें

व्यर्थ कंठणें
नको ती पाळी
मरण बरें मज या वेळीं— प्रियकरा !"

७

निः स्वार्थ प्रेमा बघुनी
आंसवें लोटलीं नयनीं— सुंदरी !

लावुनिया दृष्टि नभांत
देवास जोडुनी हात— सुंदरी !

प्रार्थिलें:-" दयाळा ! मजला
मरण दे याच समयाला—श्रीहरी !

भासतो
प्रीतिकळस तो
मजसि हाच—" तों
जागृती आली
स्वप्नस्थिति मजला कळली—सुंदरी !

कुसुमगुच्छ.

---

## सखीचा वाढदिवस

सत्रावें तुज वर्ष आज सखये ! आहे जरी लागलें
केलें काय तुवां परी अजवरी मागें पहा शोधुनी
पानें षोडश वाचिलीं तव तुवां आयुष्य ग्रन्थांतली
कान्ते ! त्यांतुनि सार काय हृदयीं तूं आपुल्या घेतलें ?

शांति, प्रीति, शुची तशी सरलता केल्यास का मैत्रिणी?
आहे का विनयासवें वद सखे ! बंधुत्व तूं जोडिलें ?
लेखाया शिकलीस तूं सुजनता सांगे अलंकार का ?
प्रेमाचें तुजला तसें समजलें का तें रहस्य प्रिये ?

शंका ये मजला म्हणोनि तुजला केले न हे प्रश्न मी
छे, छे, हा कुविचार तूं न हृदयीं आणीं मुळीं प्रेमळे !
प्रश्नार्थांत वसे खुबी न तसली ती स्पष्ट बोलांत ये
प्रेमें मी म्हणुनी तुझ्यासह सखे ! भाषा अशी योजिली

"लाभो हें बहुमोल रत्न मजला देवा ! सदा"—प्रार्थना
ऐशी मी करितों तुझ्यास्तव सखे प्राणेश्वरी ! नेहमीं

# माझी बहीण

[ इंग्रजी वरून ]

आणा कुणी बाहुनि मत्स्वसेतें
खेळूं कसा मी जरि ती न येथें
घेवोनि मोदास वसंत आला
तेणें जनातें बहु तोष झाला १

ताई न येथें जर खेळण्यातें
वसंत वाटे न पसंत मातें
बागेंत नाचे फुलपांखरू तें
होई न मातें परि हर्ष देते २

बागेंत वेली स्वकरें तिनें ज्या
लावीयल्या पुष्पित जाहल्या त्या
त्या पाहतां सांप्रत आठवे ती
बाष्पें म्हणूनी नयनांत येतीं ३

हा गातसे कोकिल सुस्वरानें
गातातही भृङ्ग तसे मुदानें
त्यांचें मला गायन काय होय ?
ताई नसे ती जरि येथ—हाय ! ४

हे खेळती येथ बहीणभाऊ
ये ये स्वसे ! आपण खेळ खेळूं
नाहींस तूं येत अजूनि कां गे ?
तुझ्याविणें नीरस सर्व लागे ! ५

* * *

हांका कवीनें किती मारिल्या त्या
गेल्या परी कीं सगळ्याच वाया
लागे कवी नंतर तो रडाया
नेत्रांबुनें चित्र करी स्वकाया ६

कांहीं तधीं भूमिवरी तयाचे
बिंदू गळाले नयनोदकाचे
त्यांतून दृष्टीस तदीय ये ती
पुढील आश्वासनयुक्तपंक्तीं— ७

''वेडया! कुणा मारिसि फोल हांका
गेली स्वसा ती तव दिव्य-लोका
तेथें असे अक्षय जी सुखांत
बोलाविसी का तिज या जगांत?'' ८

करमणुक.

---

## ओंवाळणी

भाउबीज ही आज म्हणोनी
निज बंधूंतें प्रेमें भगिनी
आनंदानें ओंवाळोनी
प्रीती दृढ करिती.

२

माझी ताई स्वर्गीं साची
ओंवाळिल ती मातें कैंची ?
ओंवाळणि तिज धाडायाची
इच्छा परि माझी.

३

ओंवाळणि मम नच हेमाची
हृदयांतिल परि ती प्रेमाची
प्रेमें गाइन गाणीं तिचीं
ओंवाळणि मम ही.

४

ओंवाळणि ही वाऱ्यावरता
पक्ष्यांच्या वा पंखावरती

किंवा ठेवुनि गानावरती
पाठवुं मी तिजला?

५

युक्ति अन्य वा सुचली मातें
कवीकल्पनेविण न तरल तें
ठेवुनि तिजवर ओंवाळणितें
धाडिन मी स्वर्गीं!

---

# आग !

[प्रवासांत असतां आगगाडींत आमचे डब्यांत एक ब्राह्मणाचें कुटुंब येऊन बसलें. त्या लहानशा कुटुंबांत तीन गतभर्तृका ! त्यानां पाहून मला कौमार्यावस्थेंत स्वर्गीं गेलेल्या माझ्या धाकटया बहिणीची स्मृति झाली. त्या प्रसंगास उद्देशून:—]

[ चाल:–नागीण चपल. ]

ही आग भडकली खालीं
तज्ज्वाला
गगनाला
पोंचली आज या कालीं ॥ धृ० ॥

किती पोळल्या कळ्या कोंवळ्या
किती गळाल्या फूलपाकळ्या
वनता उद्याना आली !

कडकड पडतां तरुवर खालीं
निराश्रिता किति होती वेली
दुर्दशा काय ही झाली !
या आगीच्या पूर्वीं जाई

जिवलग माझी स्वर्गी ताई
हा तोष मनाला होई !

जिवंतमृतिचा प्रसंग दुर्धर
अनुभविती किति आज घरोघर
त्यांतून ताइ मम सुटली !

— —

## दिवाळी

दिपवाळी सण आज म्हणोनी
सृष्टी भरली आनंदानीं
प्रमोद नाचे स्थानीं स्थानीं
घेउनि रूप नवें

२

स्मरण तुझें मज माते ! होतां
दुःख होय अति मदीय चित्ता
परि या मोदाहुनि तें आतां
सुखकर मज वाटे

३

तुज साठीं हे अश्रु ढाळणें
प्रेममूर्ति तव ध्यानिं आणणें
तव नामाचा जप तो जपणें
दिपवाळी मम ही

४

मातें जरि तूं दिससि न माते !
माया तव परि मजवरि फिरते

रूप तिचें या नयना दिसत
दिव्य कितीतरि तें !

५

स्मरणें तव जरि मोद विरजतो
दु:खाचा ढग पुढती येतो
तोच मला तरि सुखकर होतो
इतर सुखांहूनी !

६

तव रव कर्णी गुणगुण करतो
आल्हादक मज कितितरि होतो
गंधर्वाचें गानाहुनि तो
गोड मला वाटे !

७

दिपवाळी मम गतवर्षीची
तव अनुसंगें आनंदाची
केली, गेली, नच यायाची
पुनरपि परतून.

८

दिपवाळी मीं सार्थ कराया
दीप प्रेमाचा तळपाया

अश्रुतैल तें घालोनीया
                श्वास धूम सोडी

९.

चिंतनिं तूझ्या स्वस्थ बसावें
किंवा धांवत वेगें यावें—
तुजमागें, परि काय करावें
                शक्त न मी त्याला!

# माझी आई.

"न मातुः परदैवतम्"

श्लोक [ पृथ्वी ]

'न देह चिर हा असे, न चिर कीं तसें प्रेम तें'
असें वदति जे कुणी करिति पाप ते वाटतें
विकार दुसरे जगीं असति सत्य निःसार ते
म्हणोनि पडती सदा तनुसवें पहा गार ते १

कधीं न बसते पहा सुपद-[1]वासना स्वर्गिं ती
'मदीय'-[2]'तव' हीं तिथें कधिं मनास ना बाधितीं
विकार सगळेच हें असति येथले[3] केवळ !
इथें जनन पावती मरति येथ ते दुर्बळ ! २

परंतु अविनाशि ती जननिचीच माया असे
तिच्या सम जिवन्त या न जगतीं कुणीही दिसें
तिचा उगम होतसे खचित दिव्यलोकांतुनी
कुठोनि समता तिला मग तरी मिळावी जनीं ? ३

---

१ महात्वाकांक्षा २ माझें तुझें; मी तूं पणा; ३ मृत्युलोकचे;

कसास उतरे परी सतत तीच भूमीवरी
दिवीं[1] सहज वास ती मग पहा सुखानें करी
श्रमें जगतिं पेर तो निशिदिनीं तिचा होतसे
परी फल तिचें दिवीं मिळतसें बहू गोडसें ४

मदीय जननी ! दिवीं त्यजुनि जासि तूं गे जरी
त्वदीय ममता तरी मजवरीच छाया करी
तुझीच ममता मला बघ जगास या बांधतें
त्वदीय ममतेविना मज न कांहिं गे रम्य तें ५

असह्य मम भार तूं उदरिं माउली ! वाहिला
तसा कठिण ताप ही प्रसव-कालिंचा साहिला
तसें जनन जाहल्यावर तुवां मला रक्षिलें
करोनि बहु यत्न तूं मज तसेंच संगोपिलें ६

अपत्यपरिपालनाविण तुझें दुजें काज न
अपत्यहितचिंतनाविण तुझा दुजा धर्म न
अपत्यसुख तें तुझें सुख असें तुवां मानिलें
'अपत्य चिर सौख्य तें अनुभवो !' असें इच्छिलें ७

जरा न दिसलों तुला त्वरित होसि तूं घाबरी
परी मजसि पाहतां मुदित होसि गे अंतरीं

---

१ स्वर्गीत

तुझें हृदय तें खुले, नयन पंकजें हासती !
विकास कमळें जशी रविमुळें पहा पावती ! ८

अहा ! परि कशी मला त्यजुनि तूंच गे ! माउली !
उपेक्षुनि अशी बरें अहह ! जासि तूं प्रेमळें ?
उभा तुजपुढें असे सुत पहा तुझा माउली !
अतां मग तुवां असे नयन कां बरें झांकिले ? ९

उदार किति थोर तें हृदय माउलीचें अहा !
तदीय ममता किती ! कितिक काळजी ती अहा !
कशी मजसि तीच कीं जगतिं जाइ हो सोडुनी
जिनें अधिक मानिलें मजसि नित्य जीवाहुनी ! १०

मला गमसि मूर्ति तूं सकल सद्गुणांची खरी
तुला न उपमा, तुला न जगतीं मिळे गे सरी
मनोहर अशा बहू मधुर बाललीलेविण
तुला जगतिं तो दुजा मुळिंच सत्य आनंद न ११

जगांत मृदु वस्तु या कितिक लोचना दीसती
तयाहुनिहि गे तुझ्या मृदुलता वसे चित्ति ती
अनेक रस ते जरी मिळविले तरी माधुरी
न ये वसतसें जशी तव विशाळ हृन्मंदरीं १२

जरी अखिल विश्वि या सकल दिव्य सौंदर्य तें
तरी न मम मानसा तुजपुढें सुखावेल तें
जगांत असती पहा विविध रम्य वस्तू किती
परी न समता मुळीं जननि ! गे तुझी पावती १३

जगांत असतील या जरि कितीक मोदस्थळें
तरी न जननी ! तुझ्यासम दुजें मला गे मिळे
तुझें हृदय तें जगीं मजसि एक मोदस्थल
जरी मज न तें अतां, तरि दुजीं पहा निष्फल ! १४

मनांत फल कल्पितां सुरतरू[1] तया देतसे
परी न समता तया जननी ! गे तुझी येतसे
मनीं उठति वासना पुरवि त्यांस चिंतामणी
परी न समता तुझी जननि ! सद्गुणांचे खनी ! १५

सुहेतु उठती मनीं पुरवि कामधेनु त्वरें
परी न समता तुझी जननि ! गे तिलाही बरें
कदापि नच देति हे[2] खचित वांछिल्यावीण गे
परी सतत देशि तूं न पुसतांहि सौख्यापगे १६

जरीहि जलदा ! तुला म्हणति लोक दाता खरा
तरी न तुज ये सरी जननिची अरे ती जरा

१ कल्पवृक्ष. २ कल्पवृक्ष, चिंतामणि आणि कामधेनु.

प्रदान समयीं किती धरिसि अंतरीं खिन्नता
तुला मग कशी बरें जननिची असे साम्यता ? १७

रुचेल तुज त्या स्थलीं उदक तूं सदा सिंचिसी
न कार्य तव रे जिथें स्थलिंहि त्या कधीं वर्षसी
कधीं करिसि वृष्टि तूं अधिक, अल्प तूं ही कधीं
म्हणून तुज दे सरी विमल माउलीचो न धी १८

उदारपण हें जरी करिसि सत्य रात्रंदिन
तरीहि गुरकाविसी उदक अल्प तूं वर्षुन
कडाडवुनि त्या विजा भय किती जनां दाविसी
अरे ! मग कसा बरें जननिसाम्य तूं पावसी १९

प्रसन्न हृदयें तुवां जननि ! गे मला घेतलें
अहा ! मधुर तें तुझें मजसि दुग्ध गे पाजिलें
मला हृदयिं घेउनी दृढ तुवांच कुर्वाळिलें
मला कितीकदां तुवा मुदभरें तरा चुंबिलें २०

तुझा सदयभाव तो सरल शुद्ध निर्भेळसा
कसा हरपला असा जननि गे ! अकस्मातसा ?
वदे, मजवरी असा करिसि राग कां माउले ?
असा न दिसला मला गतदिनीं कधीं प्रेमळे ! २१

सुधेहुनिहि तो तुझा मधुर बोल गे वाटला
अहा ! कुणिकडे परी जननि ! आज तो लोपला ?
मुखांतुनिहि याच ना मधुर बोल तूं काढिला ?
दिसे वदन तेंच हें, मधुर बोल कां लोपला ? २२

जगांत उरलें अतां नच मुळीं मला प्रेम तें
अहा विलय पावलें तुज सवेंच कीं वाटतें ?
असेल जगतीं, परी नच मुळींहि निर्व्याज गे
असोनि तव तें तसें विमल फार होतेंच गे २३

खरा कळवळा तुला; इतर माणसां कायतो ?
खरीच ममता तुला; इतर कोण ती जाणतो ?
निजार्थ[1] जवळीं तुझ्या विमुख-सत्य तो जाहला
तुवां सुत हितार्थ गे अखिल जीवही वाहिला २४

तुझीच ममता असे जगतिं एक निर्दोष ती
तुझीच सुकृती असे जगतिं एक निर्लोभ ती
लता गमसि तूं मला सकल सद्गुणांची भली
अह! मज कशी तिची मुकविली विभो! सावली ? २५

---

१ स्वार्थ.

प्रफुल्ल [1]कुसुमें [2]लता [3]तरुस घट्ट आलिंगि[4]ती
अहा अदय घोर तों पवन ओघ ते वाहती
लतेस तरुपासुनी अहह! निदयें पाडिलीं
तिची मृदुफुलें अहा ! धरिणितें कशीं गाळिलीं ! २६

तरूस हृदयीं अतां धरुनि कोण आलिंगिल ?
प्रियेविण कशी तरो ! स्थिति तुझी अतां होइल ?
तुह्मास सुम हो अतां कवण नित्य संगोपिल ?
फुलांस जगतीं अहा कवण जीवना देईल ? २७

नभीं उगवली न जों धवल दिव्य ती चांदणी
अहा तंव कसे तिला जलद टाकिती व्यापुनी !
पुरी न फुलली असे कमलिनी मनोहारिणी
तशांत गज मत्त तो उपटि ती मुळापासुनी ! २८

पवित्र जगतीं किती असति आज पुण्य स्थळें
परि मजसि तुच्छ तीं तुजपुढें पहा माउले !
तयांहुनिहि पुण्यदा जननि कीं मला वाटतें
सुमूर्ति तव ती कुठें ? अहह ! चित्त हें पोळतें २९

---

१ आम्ही चारी बंधू. २ माता ३ पिता ४ लतेचें विशेशण.

जगीं मधुरगायनाविण दुजें न सुश्राव्य तें
न साधन असे मना रमविण्या दुजें वाटतें
तुझा प्रथमवर्ण तो म्हणति सूर 'आ' गे असा
द्वितीय म्हणतात 'ई' खचित गायनी तो तसा ३०

मिळून तव नाम गे मधुर 'आइ' हें जाहलें
जगीं सहज नाम तें प्रियचि होउनी बैसलें
सुनाम तव घ्यावया न रसना न ते ओष्ट गे
अवश्य असतीं, परी सहज तें मुखीं येत गे ३१

जगांत परि या अतां जननि ! 'आइ' कोणा म्हणूं ?
मुखें सतत या अतां जप तरी कुणाचा म्हणू ?
अहा ! ढकलुनी मला कुणिकडे अगे माउली
वदे त्वरित होउनी अदय गे दडी मारिली ? ३२

अहा ! विमल तूं अशी खचित मोद-दात्री जनीं
सदा असिस तूं खरी मधुरशा रसांची खनी
रसज्ञ कविची जगीं सुकविता अशी तूंच गे
दया असिस मूर्त तूं, प्रणयधाम ही तूंच गे ३३

वियोग जननी तुझा निरवधी मला जाहला
त्वदीय सुत हा तुझ्या चरणपंकजा मूकला

त्यजोनि मज एकटा क्षण कुठें न जाणें तुला-
रुचे, परि तया अतां सतत दूर त्वां टाकिला! ३४

स्मृती तव मला सदा जननी गे किती होतसे
तुझ्याविण मला गमे गृह कसें पहा शून्यसें
नको शयन तें, नको अशनही, नको पान तें
सुरम्य तव मूर्ति ती मजपुढें सदा वागते ३५

किती गळति हीं टिपें, सजल नेत्र होती अतां
तया पुशिल कोण गे मम कपोल ते चुंबिता ?
शरीर मम कांपते कवण त्या अतां सांवरी?
तुझ्यासम अतां मला कवण साउली ती करी ? ३६

जरी पळ न पाहिलें तुज तरी मला वर्ष तें!
अतां सकल आयु हें तुजविणें कसें संपतें ?
जगोनि तुजवीण या जगतिं अर्थ कांहीं नसे
जरी जग दिसे मला तरि असे पहा नाहिंसें ! ३७

तुझें सदय चित्त ते कवण ठायिं पाहूं अतां ?
बघूं रुचिर मूर्ति ती तव कुठें ? अभागी स्वतां !
विचार हृदया तुझे सतत तोडिती माउले!
म्हणोनि मम मानसा किमपि शांति ती ना मिळे! ३८

मला हळद लावुनी प्रतिदिनीं तुवां न्हाणिलें
तसेंच मजला तुवां मधुर गान आलापिलें
चुकोनि तनया तुझ्या खचित दृष्ट लागेल गे
तुवांचि मज लाविलें म्हणुनि गालबोटा उगें! ३९

मला कथियलें किती वच तुवां हिताचे अहा !
तसेंच मम कोड तूं पुरविलेस नाना पहा
त्वदीय उपकार ते मजवरी किती जाहले !
अशक्य तनयास ते खचित फेडण्या प्रेमळे ! ४०

कधीं मजवरी न तूं किमपि राग गे काढिला
तुझी उपकृती न तो लवहि वर्णवे वाणिला
अहा मळविलें किती वमुनि मी तुझ्या अंबरा
परी न तुज ये कधीं खचित खंति चित्ती जरा ४१

नको जननि गे ! नको जननि गे ! मनीं राग हा
तुझ्या नत पदीं तुझा तनय होय आई ! पहा
कशास कर हे अतां जननिची न सेवा जया ?
कशास तरि नेत्र हे जननि ज्या न देखावया ? ४२

कशास तरि देवता इतर या न माता जरी
कशास तरि पाहिजे जग मला न आई जरी

निराश जरि हें तुझ्याविषयिं चित्त आशा धरी
भ्रमें पुनरपि भ्रमे, मन अशी दशा अंतरी ! ४३

सदा उठति मानसीं किति तरंग नानापरी
तुझी सुकृति आकृती मज अहा ! अतां ती दुरी !
'कुठें असति आइ तूं तरि ?' विचार हा खिन्नता
मनीं भरवि, पावती नयन अश्रुंहीं अंधता ! ४४

तुझें वच न मोडिलें, कधिं न दुःख तूंतें दिलें
असें असुनि कां बरे मजसि शोकिं त्वां लोटिलें ?
तुझा विरह माउळे ! नसुनिया दुजा वन्हि गे
अहर्निश मदीय तो भडकवी पहा देह गे ! ४५

विलाप लहरी किती खवळती मनीं माझिया
कसे न मग लागती सहज अश्रु वाहावया
अहो ! त्रिजग हें गमे मजवरी अतां ढासळे
परी हृदय हें कसें कठिण भूवरी राहिलें ? ४६

अहा ! हृदय हें उले ! परि कसें द्विधा होइ न ?
अहा विकल देह हा ! परि कसें उरे जीवन ?
अहा ! स्वमन हें जळें ! तनु न दग्ध कैशी परी ?
असह्य मज शोक हा, परि न चेतना संहरी ! ४७

माते ! जरी तूं दिससी न मातें !
हे ऐकतों बोल तुझेच वाटे:--
" बाळा ! पुरें शोक रडूं नको तूं
कालांतरें आपण सर्व भेटूं." ४८

काव्यरत्नावली.

---

टीपः--माझी आई कै. ति. सौ. पार्वतीबाई रहाळकर तारिख २ माहे आगष्ट सन १९०० रोजीं स्वर्गवासी झाली. तिच्या अशौच कालीं (in mourning period) ही कविता मी कशीतरीं लिहिली !

## आईचें चित्र.

[ On the receipt of my mother's picture.]

कौपर कविच्या चुटक्याचे आधारें

### साकी.

तेच ओष्ट हे माते ! तव गे ज्यांनीं मज बोधियलें
आतां ही पण तेच असोनी मौन त्यांस कां आले ? १

जेव्हां तें मृदु मधुर वचन तव अंतरलें गे मातें
तेव्हां पासुनि जड आयू मम कसेंतरी हें जातें २

मृदुल ओष्ट तव खचित तेच हे, हास्य मधुरही तें हें
बाळपणीं हा ! निशिदिनिं ज्यांनीं शांतविलें मज मोहें ३

उणी कायती वाणी, स्पष्टचि नातरि वदले असते
'रडूं सोनुल्या, नको तान्हुल्या, बाळा वरि शांतीते' ४

नेत्रांतुनि ज्या शांत किरण ते मायेचे मजभोंती
प्रेरियले त्वां तेच नेत्र हे धृति मज आतां देती ५

चित्रकला ती धन्य खरोखर चित्रकला ती धन्य !
तिच्या सारखीं कृती कराया तिजविण शक्य न अन्य.६

कालावरती पगडा अपुला बसविल तिजविण कोण ?
पुढें आपुल्या आणिल तिजविण नष्ट प्रियजन कोण ? ७

चित्रा ! तुजला पाहुनि मज ये सुखदु:खाचें भरतें
चित्तस्थिति किति चित्र होतसे होय काय ना कळतें ८

मूक गायना गाउनि चित्रा ! आज्ञापिसि तूं मजला
हृदयनिवासी गत मातेचें गाणें तें गायाला ९

शिरसा मातें वंद्य तवाज्ञा इतुकें नच पण हा मी
तिचीच आज्ञा ऐसें मानुनि गाइन गाणें नामी १०

क्षणभर तूतें तीच समजुनी अनुपम सुख सेवीन
वर्षतसे ही तिचीच माया ऐसें मी मानीन ११

क्षणभर मजला सौख्य व्हावया कविता पाचारीन
तिच्या कडोनी तन्मायेचें अंबर मी विणवीन १२

नंतर त्या मी वस्त्राखालीं तनु मम आच्छादीन
हृदयीं धरुनी चुंबी माता मज मनिं हें आणीन १३

जिवलग माते ! निधनवृत्त तव जेव्हां मीं आयकिलें
तेव्हां जे मी अश्रु ढाळिले ते तुज वद कां कळलें ? १४

धरणीवरती शव तव पडतां पवित्र आत्मा तव गे
विव्हल पुत्रांवरती भ्रमणचि करण्या सजला कां गे ? १५

नकळत चुंबन मजला माते ! किंवा तूं वद दिधलें ?
किंवा माझा शोक पाहुनी अश्रु तुवां ढाळियले ? १६

स्वर्गसुखामधिं अश्रु ढाळणें शक्य असे तें काय ?
माते ! मातें स्पष्ट सांगतें हास्य तुझें हें 'होय' १७

माते ! मृत तूं होतां आम्हीं आक्रंदन जें केलें
त्यातें ऐकुनी हृदय उकललें पाषाणहि ते द्रवले १८

सदय हृदय तूं अदय करोनी कशी तदा निजलीस
निश्चल होउनि दृष्टि तव कशी ब्रह्मांडी नेलीस १९

माते ! तुजला वंदन केलें जेव्हां मी शेवटचें
शेवटचें तें काय ! अहह ! हा ! शेवटचें ! शेवटचें २०

स्वर्गामध्यें वंदन आशीर्वच हे येति कुठोनी ?
सर्व ब्रह्मस्वरूप देखुनि वसती सुख सेवोनी २१

संगम माझा पुनरपि तुजसह होईल का गे तेथें?
पुनरपि वच तव मिळतिल मज का ऐकायातें येथें ?२२

परिसुनि निधना तव माते!तव मैत्रिणि किति गे रडल्या
मातेविण या बघुनि लेकरां कितितरि त्या गंहिवरल्या२३

प्रेमानें त्या बाया वदल्या पाहुनि रडतां मजला
"आई येइल उद्यां उगा गा, रडूं नको वेल्हाळा !" २४

'उद्यां' 'उद्यां' हें म्हणतां म्हणतां दिवस कितीतरि गेले
हा ! परि माझ्या दुर्दैवाचें 'उद्यां' न अजुनी आलें २५

'उद्यां' 'उद्यां' हें नशिबा जडलें मज बाल्यापासोनी
आज कराया जावें जें तें उद्यांस जातें निघुनी। २६

शेवटिं मजला कळलें तें गे! मज नच तूं दिसशील
स्थिति मम झाली कळतां तें जी कवण जगीं जाणील? २७

धरुनी मम अंगुली उपवनीं मातें तूं फिरवीलें
कोमल पुष्पां पाहुनि मजला त्यांच्याशीं तूं तुलिलें २८

खाऊ देउनि गोड मला तूं विद्यालयिं पाठविलें
शिकुनी येतां हृदयीं धरुनी प्रेमानें चुंबियलें २९

दुडदुड मातें बघुनि धांवतां कौतुक तुज किति झालें
ऐकुनि माझे बोल बोबडे त्वन्मन कितितरि धालें ३०

"धन्य पुत्र हा, धन्य जननी मी, धन्य पिताही याचा
धन्य विधाता जो हा दावी आम्हा दिन सोन्याचा ! ३१

ठेवि सुखी या संतत देवा!" वदलिस संतत ऐसें
यापरि वदतां प्रेमें उमलें वदन तुझें पंकजसें ३२

स्मरणशक्तिमधिं नोंद असे तव सगळया उपकारांची
सर्व विश्व बदलेल परी ती कधीं न बदलायाची। ३३

परिस्थिती या किती बदलल्या मागें तव गे माते !
स्मरणशक्ति परि दावी आतां तें दिन अपुले मातें ३४

माझ्यासाठीं कष्ट सोशिले कितीतरी तूं माते!
निशा काढिल्या किती लावितां नच पात्यातें पातें ३५

इकडे तिकडे किंचित मजला जरि गे माते! झालें
माझ्यासाठीं चित्त तुझें तें हाय! किती बावरलें ! ३६

अंगारे ते धूपहि ताइत घुटी जडी त्या मात्रा
क्षणांत करुनी नवस नवसले उपाय केले सत्रा ३७

दुष्टांची मज दृष्ट पडुं नये म्हणुनी काळी टीक
लावुनि नंतर मज नटविलें मातें ! तूंच सुरेख ३८

स्मरतें मातें सर्व अतां तें, प्रेमा काय तुझा तो
ठाउक ज्यातें खंडमुळीं नच, तुल्य न त्या कुणि दिसतो ३९

प्रिय पुत्रावर कोप कधिं न तूं जिवलग माते ! केला
रुसतां उलटा मीच मला तूं बोध कितीतरि केला ! ४०

स्मरणशक्तिचें पुस्तक उघडुनि बघतां सर्व दिसे तें
वाचुनि त्या गत गोष्टींतें मन आनंदानें डुलतें ४१

कविता, माझी सज्ज जहाली आई ! तुज गायाला
स्मारक गाणं गाउनि करणें योग्य गमे गे तिजला ४२

कसें तरी हें स्मारक आहे, पण हृदयापासोनी
स्वर्गीं यातें मान मिळे, जरि कोणि न येथें मानीं ४३

काल जरी तो उलट धांव घे आतां ये गतकाल
पुष्पांसह मी जेव्हां खेळत होतों रांगत बाळ ४४

विविध असे मी खेळ खेळुनी मातेतें रमवीलें
'लुच्च्या, सोद्या, गुलाम' वदुनी मातेनें भूषविलें ! ४५

बाळपणींचे मौजेचे दिन येतिल पुनरपि काय ?
शक्य जरी ते आणायातें तरि मी आणिन काय ? ४६

वेडें माझें हृदय कदाचित् इच्छिल आणायातें
छे, छे ! परि हा विचार नलगे हृदया ! ऐसा तूंतें ४७

असार जीवित माया केवळ दुःखद जग हें आहे
हाल भोगणें नशिबा जडलें नरास येथें पाहे ! ४८

ह्या दुःखांचा बंध तोडुनी सुखांत तूं गेलीस
तेथुनि तुजला दुःखिं आणणें शोभे का तनयास ? ४९

कुविचारा ! तूं दुष्टा माझ्या शिवूं नको हृदयास
माते ! स्वर्गीं सौख्य भोग तूं आनंदें करि वास ५०

दुस्तर संसाराब्धींतुनि तूं नौका हाकारियली
क्लेशाच्या त्या प्रचंड लाटा वादळें न तीं गाणिलीं ५१

स्वर्गद्वीपाकडेस नौका शौर्ये नीटचि ने ती
द्वीपामध्यें संतत ज्या सुख निशिदिनि वसंत फुलती ! ५२

लहान नौका असुनी मोठया जलधीला लाजविलें
स्थापुनि त्याच्यावरी प्रभुत्वा तेज तया दाखविलें ५३

आतां जें तूं सौख्य भोगिसी मोल तया जगिं नाहीं
स्वर्गसुखातें स्वर्गसुखाची एकच तुलना पाही ५४

द्वीप तुझें तें गांठायातें प्रयत्न किति मी करितों
दुर्दैवाचा वारा मज परि फेंकुनि मागें देतो ! ५५

वारुनि त्यातें कसा तरी मी पुढती पुढती जाई
लाट मला ती जोरानें परि उलथुनि मागें देई ! ५६

नौकेचें मम शीड मोडलें, होकायंत्रहि गेलें,
वारा, लाटा विरुद्ध झाल्या, म्हणुनि अशी ही हाले ! ५७

भोंक तळाला पडुनी पाणी आंत भराभर शिरलें
संसारीं मम नाव बुडाली, द्वीपहि दूर जहालें ! ५८

अनुपम सुख तूं स्वर्गीं घेसी विचार मनिं हा येतां
माझ्या दुःखा विसर पडोनी, मोद होतसे चित्ता ५९

राजपुत्र मी, धनिक पुत्र मी, गर्व न याचा मजला
श्रीमंताचा सुत मी याचा गर्व न या चित्ताला ६०

दुज्या कोणच्या वस्तुचा न, परि गर्व एक मी वाहें
कीं स्वर्गीं जी माता गेली पुत्र तिचा मी आहें ! ६१

पुरे, पुरे ! हे विचार आतां वेळ किती तरि गेला
माझ्या मनिंचा हेतू परि तो किंचित सफल जहाला ६२

स्मरणशक्तिच्या साह्यें पुनरपि देखियलें मम बाल्य
बाळपणींचे खेळ खेळलों, पाहियली मम माय ६३

मन्मातेचें सुख न भंगितां भेटविली ती मजला
म्हणुनि कल्पने ! अनन्यभावें वंदितसें मी तुजला ६४

स्मरणशक्तिची गती पावली बंध न जोंपर्यंत
काला ! तूतें 'शून्य' मानितों कवि हा तोंपर्यंत ! ६५

काल जरी तुज ओढुनि नेई माते ! मजपासोनी
शांतविण्याची शक्ति तुझी ती राहियली या भुवनीं !६६

( चित्रास उद्देशून ]

नेत्रमार्गे हृदयांत धांव घेई
तिथें अवलोकीं प्रिय मदीय आई

तिच्या ज्योतीतें मिळवि तुझी ज्योत
वसें तेथें मग नित्य तूं सुखांत

काव्यरत्नावली

———

## मातृस्मृति.

आई ! तव पद मुकलों आई !
रात्र उलटली अर्धी तरि ती
मन्ननयनीं कशि झोंप न ये ती
विचार नाना येती चित्तीं
मजला तव तों स्मृति गे होई — आई !

हाय,अम्हाला सोडुनि या परि
कैशी रुचली स्वर्गपुरी तरि?
निष्ठुर झालिस कां आम्हावरि?
रोष असा तुज कसला येई ? — आई !

आठवितां तव बहु उपकारा
नयनीं लागति अश्रूधारा
चैन जिवाला वाटे न जरा
झालों नाहीं तव उतराई ! — आई !

रागें तुजवर त्रागा मीही
कधीं कधीं किति केला आई !
कठीण वच बहु वदलों पाही
स्मरतां हृदयीं भडका होई ! — आई !

दोषी मी तो असतां कोप
केला तुजवर, तें मज पाप!
आतां होतो पश्चात्ताप!
अर्थ न परि मुळिं त्यामधि कांहीं!—आई!

मी अपराधी असतां उलटी
मनधरणी तूं केली मम ती
होतां त्याची आतां स्मृति ती
भडभडुनी मम काळिज येई!— आई!

तव करुनी ती चोरी, उलटी
केली शिरजोरी तुजपुढती
अन्न न घेई मी तुजवरती
दुःख दिलें तुज किति गे आई!— आई!

शेवट तूं तव घालुनि आण
जेवायातें नेशी जाण
आठवितां ते पंचप्राण
कळवळती मम आतां पाही!— आई!

तुजजवळीं मी स्वस्थ न बसलों
गोड सुखाचे शब्द न वदलों

तव सेवेमधिं किमपि न रतलों
हें मज आई ! दुःखद होई !— आई !

पुनरपि तव मुख मम दृष्टीला
पडेल नच जरि कळतें मजला
तरि मी जातां उज्जयिनीला
लोळण घेतों तव तव गे पायीं !— आई !

होतां माझ्या दुःख मनाला
स्मृति तव होते या अधमाला
कष्टविलें मीं व्यर्थचि तुजला
जन्मुनि पोटीं तव गें आई ! — आई !

तव आठव तो होतां रडणें
या परतें तें अधिक न करणें
ठेवियलें मम हातीं विधिनें
म्हणुनीं रडतों धाई धाई ! — आई !

प्रभात.

---

# विधवांचें गाऱ्हाणें.

श्लोक [ पृथ्वी ]

मदीय कविते ! सये जिवलगे ! मनोहारिणी !
सुमंजुवचभाषिणी ! नवरसामृतस्यंदिनी !
पुरें भ्रमण अंबरीं तव, सखे ! अतां भूवरी
झणीं उतरुनी पहा विगतभर्तृकांतें तरी ! १

रडोनि जरि कंठ त्या सुकविती तरी ही कुणी
बघे वळुनि त्यांकडे नच मनीं दया आणुनी !
म्हणोनि तुजला तुझा विनवि दास हा शारदे !
नको उशिर लावुं तूं झडकरी मला भेट दे. २

त्वदीय मधुरा गिरा जरि करी मला साह्यता !
प्रसाद मजला जरी तव असे तरी न्यूनता–
नुरे किमपिही मला; विनतिगीत आलापिन
जयें रसिकमानसा करुण–पाझरा फोडिन ३

* * *

नभांत जशि तारकापतनवृष्टि व्हावी अति
धरेवर तसे बळी पडति मृत्युवक्त्रीं किती !
गमे यमचि मूर्त तो अवतरे न ग्रंथिज्वर
दुजा प्रयलकालिंचा गमत काय तो भास्कर ? ४

कितीक विधवा किती विधुर ते तयें जाहले ?
सुपुत्रनिधनें किती पितर ते तयें डागले !
घरें अहह ! ओस तीं कितिक जाहलीं नांदतीं !
किती तरुण बालिका सतत अश्रुनें नाहती ! ५

घरोघरिंच जागतें दिसत आज वैधव्य तें
उपाय कुणि ना तरी सुचविती अजोनीहि ते
नका अदय होउं हो कृति न सौनिकी आचरा
विचार करण्या तयांविषयींचा पुढें हो सरा ! ६

जगीं पुरुष तो बळी, अबल कामिनी ती परी,
दुजा म्हणुनिया तिच्याविषयिं भाव कां अंतरीं ?
न भेद परि तो असे खचित ईश्वराचें घरीं
समान असती तया उभय लेंकरें तीं खरीं ७

तुम्हांस कळतें न का विगतभर्तृकांची स्थिति
उगाच मग अन्त कां बघतसां तयांचा अति ?
असोनि उघडे पुरे नयन ते, न कां पाहतां ?
विलापरव ऐकुनी श्रवणिं, शांत कां बैसतां ? ८

* * *

महा प्रलय मारुतें दशदिशा जरी व्यापुनी
दिलें प्रलयकालिंच्या भयरवा जगीं कोंदुनी

तयास तरि ये सरी न लव ज्या रवाची पहा
असा श्रवणिं कोठुनी रव तरी महा येत हा? ९

प्रचंड जरि गर्जना जलधि कोपतां तो करो
न त्या परि बरोबरी किमपि या रवाची खरी
धडाडुनि किती गिरीशिखर तें पडो भूवरी
तया परि न साम्यता अणुहिं या रवाची बरी १०

कडाडुनि विजा नभीं दुमदुमाट झाला जरी
तरी न उपमा तया तिळहि या रवाची बरी
नभास उपमा जशी नभचि, अर्णवा अर्णव,
रवास तशि या असे मजसि तोच वाटे रव !११

विलापरव हा महा परिसतां उले मन्मन
द्रवे हृदय, गाळितीं नयन अश्रु रात्रंदिन
दया हृदयिं हो कशी न? गतभर्तृका बालिका
विलाप करिती किती हृदयभेदि, कां तो फुका? १२

विलाप करिती न त्या परि विलाप मूर्तस्वयें
विलाप करितो गमे, तरि तुम्हा न कां कींव ये?
असें हृदय पाहुनी उपलही मनीं लाजती
दयौघ तुमचे कसे सकल आज ते आटती? १३

* * *

"दहा न वरुषें पुरीं तुजसि जाहली तों कशी
कुऱ्हाड पडली सुते! तव शिरीं अगाई! अशी?
जिणें विफल हें तुझें, तुजसि कल्पनाही नसे
जगांत तम यापुढें तुज, न दीप्ति कोठें वसे! १४

"न हौस पुरली तुझी, सुख न कोणतें पाहिलें
जगांत जगणें तुझें खचित नाहिंसें जाहलें
निशा शशिविना गती तव तशीं अतां जाहली
जगांत कवण्या स्थळीं तुज न साउली राहिली १५

" कशास तरि मी तुला जनन तें फुका दीधलें
जरी न नयनीं पुरें पतिसही तुवां पाहिलें
जिवन्तमृति ही तुला, तुजसि पाहतां मी रडें
मला रडत पाहतां रडशि तूं तशी बापुडें! १६

"मदीय रडणें कशास्तव परी न तूंतें कळे
स्थिती बघुनि ही तुझी मज दुणें रडें कोसळे?
'जरी सकल लाविती तरि न मीच कां लावणें—
सुकुंकुम बरें? अगें जननि? तूं मला सांगणें?' १७

"असें वचन ऐकतां हृदय होय माझें द्विधा!
कथूं तुजसि मी कशी तव शिरीं पडे जी गदा?

'सख्या मिरवितीं जरी मिरवुं मीं न कां गे तशी' ?
'न घे हळदकुंकु तूं' मजसि कां असें सांगसी ? १८

'कपाळ फुटलें तुझें' मज असें सदा बोलती
'कपाळ फुटणें कसें परि असें मशीं तूं कथी?'
"अनेक असले मला पुसत ती सदा प्रश्न ते
विधे ! तिजसि काय मी तरि कथूं आतां सांग तें १९

"तिला न शिवलें मुळीं खचित पाप तें कोणतें
सुवर्तन तिचें जसे विमल धौत तण्डूल ते
गमे उदय पावलें दुरित पूर्व जन्मांतलें
तिच्यावर म्हणोनि का कठिण वज्र हें कोसळे ? २०

"भयंकर गुन्हा करि विमल बालिका कोणता
विधे ! तव असा बरें मज दिसें न तो शोधितां
विधे ! कृति तुझी मला खचित नीच ती वाटते
म्हणूं तुजसि काय मी ? मज कळे न वाचा खुटे ! २१

" विधे ! परि कशास मी तुजसि दोष देऊं फुका ?
कळोनि चुकलें मला ममचि दोष आहे निका !
हिचा न करित्यें मुळीं जरि विवाह बाल्यीं तरी
प्रसंग नसतां कधीं कठिण पातला या परी !" २२

विलाप करिती असा सतत आज माता किती !
परी न जनता उठे, फसलि काळझोंपेंत ती !
नसे खचित चांगला मुळिं विवाह बाल्यीं अशा
तदीय अवलंबनें खचित जाहली दुर्दशा ! २३

* * *

" नभोंविवरिं गोपुरें कितिक भव्य मीं बांधिलीं
क्षणांत विधिनें परी अदय होउनी पाडिलीं !
कुठें न बसण्या अतां स्थल मला जगीं राहिलें
जगांत सगळीकडे मजसि रान तें माजलें ! २४

" कळी न फुलली पुरी तंव तिला खुडी वानर !
पुरी न तसबीर तों मसि पडे कशी तीवर !
सरोवरिं न ती फुले कमलिनी पुरी तों तिला
प्रमत्त गज तो कसा उपटिता बळें जाहला ! २५

" नभीं विमल चंद्रिका, जलद तों तिला ग्रासती
पिकावर उभ्या कशा पडति टोळधाडी किति !
शशी उगवला न तों गिळित त्यास राहू अहा !
मुखांत शिरला न तों पडत घांस खालीं पहा ! २६

"समागम तुझा प्रिया ! दिन न फार जों होइ तों
कसा अदय मृत्यु कीं तुजसि घेउनी जात तो ?

पुरीं न अपुलीं प्रिया ! अहह ! बोलणीं जाहलीं
तशांत विधिनें मला अवदशेंत या लोटिली !" २७

अशा झुरुनिया मनीं विगतभर्तृका सुंदरा
किती निधन पावल्या गणति त्यांस नाहीं जरा
जगा विटुनिया अती, करिति आत्महत्या किती !
तरी अजुनि काय हो ! सुधारणें न त्यांची स्थिति ? २८

*          *          *

"करूं सहन दुःख हें हृदयिंचें, परी यातना
नको किमपि या अशा, अहह! ती नको कल्पना !
न शब्द नुसते कधीं मिळति ते सुखाचे बरे
सदा कटुवचें अम्हा हृदयिं पाडितातो घरें ! २९

"न पायगुण का तुझा अम्हि म्हणूं ? गुणांची खरी !
दिवे हिजवरोनि ते उतरवा हजारो तरी !
अम्हा सतत सासवा कठिण देति दुःखावरी—
अशा कितिक डागण्या ? वदुं शके न ती वैखरी ! ३०

"उपोषण करोनिया झिडविणें तनू सर्वदा
मलीन परिधान तें वसन कीं करावें सदा !
स्थितीहुनिहि या गमे नरक-वास तो चांगला
कशास तरि हें जिणें ? विफल जन्म हा जाहला !" ३१

असा किति विलाप त्या विगतभर्तृका अंगना
सदा करिति, काय तो परिसतां तुम्ही सर्व ना ?
अजोनि मग शांत का ? शिथिलता न का जातसे ?
तयां विषयीं का दया न तुमच्या मनीं येतसे ? ३२

* * *

सुधांशुविण ती भयंकर दिसे निशा हो किती ?
धरेस नृप नातरी तिजसि कोठची शांति ती ?
असे विफल नाविकाविण तरी महासागरीं
न नायक तरी पळें प्रबल सैंन्य तें संगरीं ! ३३

जिणें पतिविणें तसें विगतभर्तृकांचे असे
न लक्ष कुणि त्यांकडे पुरविती अजोनी कसे ?
कुरूप करुनीं तया तिमिरिं काय हो ठेवितां ?
अमंगळ तयांस का गणुनि लोकिं धिक्करितां ? ३४

पशूहुनिहि नीच का विगतभर्तृका मानितां ?
विकार पुरुषांस जे नच तयांस का जाणतां ?
जरी निधन पावली प्रथम पत्नि ती हो तरी
दुजी वरित, ती पुरे न, तिसरी तरी ही वरी ! ३५

वरी क्रम असा जगीं पुरुष तो असे न्याय्य का ?
मनास अपुल्या पुसा, अदय हाय ! होऊं नका !

बळीं नर म्हणोनिया जगिं न पक्षपाता करा
विचार करुनी पुरा उचित तेंच हो आचरा! ३६

कुनीतिपथ सेविती, करिति भ्रूणहत्या किती!
किती विमल त्या कुला अहह! लांछना आणिती!
अनीति पसरे किती विगतभर्तृकांच्या करीं
न दोष परि हा तया, खचित मन्मथाचें शिरीं! ३७

महामुनिहि भागले मदन ना कुणी जिंकिला
कुठें मग तिथें तरी विगतभर्तृका निर्बला?
जसे पुरुष ते तशा विगतभर्तृका कामुका
तयांस मग तारितां जगिं पुनर्विवाहें न कां? ३८

'रुढी नच अशी' मुखें वदुनि शांत कां बैसतां?
रुढीस कुणि पाडिलें मनिं कसें न तें आणतां?
रुढी आम्हिच पाडिली, जगिं न ती स्वयें पातली,
तदंकित अम्ही न, ती खचित किंकरी आपुली ३९ *

जरी प्रगतिला घडे अडथळा जुन्या रूढिनें
झुगारुनि तिला बळें नव रुढी तरी पाडणें
जगीं नियमनें अम्हास्तव, अम्ही न त्यांच्यास्तव
अम्हास्तव रुढी असे, परि अम्ही न रुढीस्तव ४०

* हे विचार 'केशवसुता'च्या 'तुतारी'तून घेतले आहेत.

‘पुराणमत जेवढें म्हणुनि तेवढें चांगलें
अलीकडिल तें नवें गमत सर्व खोटयांतलें’
असें न म्हणतां बघा उभय पक्षही नीट ते
करा मग दिसेल जें झडकरी तुम्हा योग्य तें ४१

मुळी न बघतां ‘नवें’ म्हणुनिया जरीं त्यागितां
तरी मग तुम्हां असो नमन हें सदाचें अतां !
जुनें कुणिकडे तरी दिन नवीन कोणिकडे ?
न लक्ष्य पुरवाल कां तिळहि कालमानाकडे ? ४२

जुनें नभ परी नवे किति तयांत ते तारक
जमीन जुनि दे परी न नव पीक का मोहक ?
महार्णव जुना नवीं तरिहि काय रत्नें न वी ?
जुन्यांतुनिच जें नवें निघत तें मना तोषवी ! ४३

गरीब रुतल्या किती अहह ! पंकिं धेनू पहा!
तयांसि कुणि उद्धरा, पदरिं पुण्य जोडा महा
हताश नच व्हा मुळीं तनमनें झटा सत्वरी
प्रयत्न सुरु ठेवणें सतत, सिद्धि देवावरी ! ४४

धर्माचें तत्व कळो ! दुर्बुद्धी सर्व गळो !
त्वरित दुष्ट रूढि पळो ! हेंच मागणें !

---

# व्यसनासक्ति आणि पश्चात्ताप

[ चालः— अर्धतनू वारुळी ]

वातावरणासम मत्तनु ही व्यसना ! तूं वेष्टुनी
नेलें दुर्मार्गीं मज जनीं
प्राणाधिक मी प्रेम अजवरी केलें जरि तुजवरी
आतां तिटकारा ये परी !
अपकारांतें तव मी स्मरतां प्राणहि देणें बरें—
वाटुनी होतें मन बावरें
धवल वदन हें कृष्ण किती जाहलें ?
गाल लाल हे खोल किती पोंचलें ?
मोहक तनुनें भेंसुरपण सेविलें !
लज्जा हृदया भाले टोंची, निधनध्वज फडकतां
येई शुद्धीवर मी अतां !

२

स्वहित कळें तें पशुलाही पण मातें नच समजलें
व्यसनें अंध मला बनविलें
पात्रांतिल जल सांडुनि गेलें, उरलें अल्पहि जरी
द्यावें सांडुनि तें कां परी ?

आयुर्ज्योति न विझली तोंवर रक्षावें तें तरी
वाटे हीच सूज्ञता खरी !
गतगोष्टींवर पाणी हें सोडितों !
पश्चातापें शुद्धि मना आणितों !
सन्मतितें मी प्रेमें स्वीकारितों !
व्यसनासक्ती मरो कुजो वा जळोहि कोठेंतरी
नको तच्छायाही मजवरो !

३

पश्चातापा ! जागें केलें मजला तूं बघ पुरें
आतां निद्रा किमपि न उरे !
आजवरी मी तमांत होतों, प्रकाश परि पाहिला
आत्मा आतां संतोषला !
सद्वर्तन मज अमृतचि वाटे प्राशुनि तें निशिदिनीं
होइन अजरामर मी जनीं
होतों कोठें इतुके दिन मी तरी ?
वाटे आलों आजचि जन्मा परी
असुनी होतों जिवंतमृत मी जरी
उरलेली ही रंगभूमिका यथायोग्य वठवुनी
जाइन नांव इथें ठेवुनी !

# सरस्वतीस

होतां चित्त उदास कोण तरि ती उत्साह देई नवा ?
  नेई ध्वान्त लयास कोण उदयें विश्वांतला या क्षणीं ?
कोणाची नुसती प्रभा चमकतां चैतन्य येई जडा ?
  कोणाची मधुरागिरा परिसतां देवांगना लाजती ?
नैराश्यांतुनि काढुनी झडकरी आशेंत ती कोण ने ?
  कोणी अंकित आपुल्या त्रिभुवनें केली बरें सर्व हीं ?
आहे जीवन नित्य कोण कविचें ? सृष्टी कुणाची कुढी ?
  कोणाला करितां वजा उरतसें बाकी पुरें शून्य तें ?
मातें थोर अशी सरस्वति ! जगीं तूं वाटसी एकटी
  झालों पाहि खरोखरी तुजमुळें ! वेडापिसा मी पुरा;
नाहीं गे ! पुरता प्रसाद मजला झाला तुझा तोंवरी
  टाकोनी मजला दशेंत असल्या गेलीस कोण्या स्थलीं ?
रानोमाळ पहा तुला हुडकण्या मी हिंडतों सारखा
  पाहूं अन्त नको, अतां मजसि दे वाग्देवते ! दर्शन.

मासिक मनोरंजन.

## मृत्यूप्रत !

[इंग्रजीवरून]

वसंतांत जैं गुलाब फुलतो
झोकें झोंके नभांत घेतो—
वायूसह, तव समय काय तो
मृत्यो ! आहे रे ?

नियमित कालीं पर्णें सुकतीं
पुष्पें तैशीं तीं कोमजतीं
व्योमीं तारे अस्ता जाती
ठरलेल्या काळीं

मृत्यो ! तव परि समय न ठरला
कवणाचें नच बंधन तुजला
रुचेल तुज त्या तूं समयाला
येशी मृत्यो ! रे

'दिवस' अम्हा हा काम कराया
'संध्या' सुहृदा ती भेटाया
श्रान्त चित्त तें बहु रमवाया—
उपवनशोभेनें

शान्ति, स्वप्नें, निद्रा, रमणी—
सेवायातें, ईश्वरभजनीं—
मन रिझवाया आम्हा 'रजनी'
सर्व काळ तुजला !

मंजुल गानें वातावरणें
डुलती जेथें आनंदानें
नवल न ऐशीं जरि सुस्थानें
स्थानें तव असतीं

ऊर्मिक्षुभित प्रचंड ऐसा—
सागर, घर ही जेथ अवदसा
पोरें भूतें खाया न पसा
स्थानें पण तव हीं !

रणवाद्यांचे घोष काय ते
प्रीतीचेंही मधुर गान तें
तव छायांकित विश्वचि वाटे
महाबली जगिं तूं ?

मासिक मनोरंजन.

---

## बुलबुल आणि कोकिला

विलय पावतसे जशि मूढता
जनमनीं शिरतांच विदग्धता
रवि तसा उदयाचलिं पोंचतां
तिमिरराशिहि पावत नष्टता १

रजनिबालक तारक खेळुनी
अखिल रात्र मुदें गगनांगणीं
गमति ते दमले अति, चालले—
द्रुतपदें म्हणुनी गृहिं आपुलें २

नव उषा खुलतांच तिची मुलें
हंसत जागृत होति पहा फुलें
उडुगणा लपतां नभिं पाहतां
गमति हांसति त्यांसचि तत्वता ३

पवन मंद सुगंधित वाहती
मृदुफुलें किति त्यासह डोलती
उडुगणा म्हणती जणुं:—'खालिं या
लपुं नका तुम्हि आपण खेळुं या' ४

*　　　*　　　*

सखिसवें समयीं असल्या वनीं—
फिरत मी असतां, मधु भाषणीं—

## बुलबुल आणि कोकिला.

सखि मला रिझवी, तिज मी तसें
वदुनि गोड वचा रिझवीतसें ५

मधुर तान अशामधिं ऐकली
परिसतां सखि त्या बहु तोषली
जिकडुनी रव ये मज सारखी—
धरुनि अंगुलि ने तिकडे सखी ६

मदभरांत लतेवरि बुलबुल
बसुनि गात लकेरिंत मंजुल
बघुनि त्यास तदा बहु हर्षलों
जवळ एक शिलेवर बैसलों ७

प्रिय तदीय तशी सखिं कोकिला
जवळ त्या बसली सति निश्चला
बुलबुलासह गातहि कोकिला
पतिस जें प्रिय तें प्रिय कीं तिला ८

जशि लकेरचि छेडित तो नवी
तशिच ती झणिं काढुनि दाखवी
अनुकृती न शके करु कोकिला
बुलबुलें न असा रव काढिला

कपट हाय ! अशांतचि बुल्बुलें
प्रियसखीसह आचरिलें ! खलें
अदय सोडुनि पंचम तो स्वन
करित अन्य सुरीं मग गायन १०

प्रकृतिनें सरला अति कोकिला
कपट हें कळलें मुळि ना तिला
प्रियसख्या अपुल्या सुख व्हावया
करित यत्न तसा मग गावया ११

असुख ओढवलें परि काय हा !
स्वर पुरा न निघे तंव तो पहा
फुटुनि कंठ पडे विकला उरीं
पतिपुढें मृत ती धरणीवरी १२

बघुनि त्या मृत पत्निस बुल्बुलें
नयनवारि जरा मग गाळिलें
उडुनि तो मग जाय निघोनिया
अहह ! का बघण्या दुसरी प्रिया ? १३

कृति तदीय बघोनि अशा परी
मम सखी द्रवली बहु अंतरीं
गळलिं शीघ्र तिच्या नयनांतुनी
टपटपाहि टिपें किति त्या क्षणीं १४

रडत मत्सखि का? नच सांगणें
सहज तें रसिकें मनिं ताडणें
स्थिति अशी बघुनी सखिची पहा
हृदय होय मदीय विदीर्ण हा! १५
नयन मी पुसले सखिचें हळू
उठवुनी वदलों तिज मी:—"चलूं,
कडकडून पडे, अपुल्या घरीं
रडुं नको अशि तूं प्रिय सुंदरी!" १६
मजसवें उठुनी सखि चालली
परि पथीं नच ती मुळिं बोलली
उभयतां हृदयीं क्षत जाहलों
स्थितित या असल्या गृहिं पातलों १७

हा चुटका वाचून त्याच्यावर एका सन्मान्य रसिकवरानें Against Science असा शेरा मारला तसेंच Bulbul and Kokila do not mate ही वस्तुस्थिति आहे हें मला बजावलें. मला त्यांचें दोन्ही शेरे मान्य आहेत. पण कोकिला पंचमस्वरांतच नेहमीं गातें व बुलबुल वाटेल त्या सुरांत गाऊं शकतो या गोष्टीवर या कवितेची मी उभारणी केली असून या दोन्ही पक्षांस मी Mates कल्पून पुरुषवर्ग स्त्रीजनाशीं कसें वर्तन करतो हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे, एवढें सांगितलें म्हणजे पुरें होईल असें वाटतें.

## रानांत उमललेलें फूल

पुष्पा! किती तव तनू सुकुमार आहे
पाहोनिया तुजसि मन्मन फार मोहे
जन्मास निर्जन वनीं सखया! कशास
आलास तूं नच कळे परि मन्मनास १

येथें कुणी तुज कधीं नच पाहणार
गन्धें कुणी न तुझिया बघ मोहणार
प्रेमें न कोणिहि तुला कुरवाळणार
घेऊनिया न हृदयीं तुज चुंबणार २

येथें न भृंग कधि तो तव अंतरंग
सेवील, होइल तुझा बघ हर्षभंग
वृत्ति प्रसन्न तव ही करिसी स्मितातें
कोणी प्रतिध्वनित तें न करील येथें ३

होणार त्वन्मृदुतनू कृश या वनीं रे!
जाणार लोपुनि असें तव तेज सारें!
काया तुझी रविमुळें बघ पोळणार?
मातींत कां अहह तूं मग लोळणार! ४

## रानांत उमललेलें फूल.

छे, छे? नकोत मज दुष्ट विचार ऐसे
ते बोंचती हृदयिं या बघ शल्य जैसे
भावी स्थिती तव मदीय मनांत येई
दुःखामुळें हृदय हें मम दग्ध होई ! ५

मी हे मनांत असतां तव गीत गात
कां लागली अचल दृष्टि तुझी नभांत ?
देवाकडे बघसि काय सख्या ! मदीया ?
पाहोनि ही स्थिति तुझी मज ये रडाया ? ६

काव्यरत्नावली.

---

## सरिता

[इंग्रजीवरून]

"कुठोनी हें जल विमल तुझें येतें ?
तसें पुढतीं हें सांग कुठें जातें ?
तुझी ऐशी गे ! मन्दगती कां ही ?
मला सरिते ! तूं त्वरित सांग बाई !"
"जन्म माझा गिरिवरी असे झाला
माय माझी जाहली मेघमाला
मला आंदोलन वायु सदा देई
तसा पुष्पांचा संग मला होई
तरुणपणिं तें स्थल सहज खेळतानां
सोडियेलें मी वनश्री पहाण्या
दिव्य शोभा ती नयनिं पाहतांना
विसरलें मी परि परत घरीं जाण्या
लतामंडप तो एक देखियेला
तया पाहुनि मम धीर नष्ट झाला
जया मधुनीं तारुण्य सांडताहे
शरिर नवल न मग त्यास अर्पिलें हें !
परी सौख्याचे दिवस शीघ्र गेले
म्हणुनि मातें मंदत्व असें आलें
दूर ऐकूं ये शब्द सागराचा
तोच आतां रे ! काळ मम तनूचा !"

काव्यरत्नावली

# ताईची संक्रान्त.

संक्रान्त आज म्हणुनी रमणीय बाला
न्हातात लावुनि शिरांस सुंगधतैला
माझ्या शिरीं विखुरले परि काय केश
नाहीं जयांस शिवला कधि तैललेश १

अश्रूंत तें सतत होय मदीय न्हाणें
आतां मला न उरलें जगतांत लेणें
लेतात त्या भरजरी लुगडी दुशाले
दैवीं परी मम सदा भगवेंच आलें! २

गातात त्या वदनिं गोड नवीन गाणीं
आहे मदीय नशिबीं रडणेंच कोनीं,
त्या रंजवीति रमणी रमणास मोदें
माझें नशीब मजला परी यातना दे ३

प्रेमें प्रियास युवती तिळगूळ देती
प्रीती तया मधुर तत्सम मागतातो
देऊं कुणास हळवा परि मी दया!
आलें कसें परि असें मम या कपाळा! ४

त्या वांटतात युवती नव वायनांतें
तें वांटणें न उरलें मज दुर्भगेतें !
आतां मला असति मृत्घट शेवटीचे !
माझ्या शवापुढतिं पावक वाहण्याचे ! ५

वाद्यें कशीं पुढतिं मंगल वाजवीत
जातात या नटुनिया किति पालखींत
माझी वरात परि जाइल तीरडींत
ती शेवटीं म्हणत 'राम'मुखें पथांत ! ६

सुधारक.

# आईची विनवणी

[ इंग्रजीच्या आधारें ]

[ चालः—"चंद्रकांत राजाची" ]

हात जोडते, पदर पसरते, परिसावी विनती
माय मुलीची करिते बाई ! अपणालागीं ती ॥ धृ० ॥
प्रेमळ, सालस, थोर, दयाळुहि, उदार, मृदु तेंवीं
स्वभाव अपुला पूर्णपणें तो ठाऊक मज बाई !
मातृह्रदय परि असे खुळें हें, ऐकत मम नाहीं,
'नको' 'नको' मी म्हणतां वदवी मुखांतुनी पाही.
हा पोटींचा गोळा जिवलग जीवाचा ठेवा
तुमच्या पुत्राचा हा आतां—तुमचा तुम्हि घ्यावा !
बहु संतोषें देतें घ्या हा, सत्ता यापुढतीं
यावर तुमची असे सदाची—सरली अमुची ती !
अनन्यभावें किती प्रार्थिलें प्रभुजी देवाला
नवस नवसिले किती तरी ते कुळस्वामिणीला
प्रसन्न होउनि देव, देवि तशि, त्यांहीं मग दिधली
एकुलतीही धन्या कन्या, जणु भक्ती फळली !
आजवरी इज जिवापलिकडे बहु संगोपियलें
मुखांतलाही घांस घालुनी प्रेमें वाढविलें

हा प्राणांचा प्राण आज मी देतां अन्याला
हृदय कळवळे, मनहि तळमळे, हुरहुर जीवाला;
आंत आंतल्या कालवतें किति काहुर माजें तें
हृदयचि पिळतें काळिज तुटतें मायचि जाणें तें!
कळी कोंवळी बहु लडिवाळें जोपासली बाई!
देवाजीवर पूर्ण हवाला टाकुनियां पाही!
पाचारा तिज कोमलशब्दें मायेची वाणी—
योजा तिजशीं, हीच विनवणी परिसावी विहिणी!
गरीब गाईहुनी गरीब ही, हरिणीहुनि भ्याड
घ्या सांभाळुनि अल्लड पोरिस, पुरवावें कोड!
कुणि रागाचा शब्द बोलतां, कीं रागें बघतां!
पोर भीतिनें गांगरते हो! वचन नये वदतां!
अश्रू नयनीं ते डवडवती हो कंपित तनु ती
म्हणुनि याचितें योजा इजशीं प्रेमाची रीती.
साधी, भोळी, सरळ हृदय ही, निष्कपटी बाला,
आज्ञाधारक लाजाळू बहु शिकवावें इजला.
बुद्धि चांगली असे बयेची हट्ट तिज न ठावा
जसा पाहिजे तसाच मोळा तिजसी लावावा.
सून आपुली साजायाला जें जें तिज यावें
तें तें आपण तिज शिकवावें, शिकेल ती भावें.

## आईची विनवणी.

नाजुक बाळा, मूर्त जिव्हाळा माझ्या जीवाचा
तसा विसांवा प्राणांचा मम, निधि ही आशांचा
दूर आज मी इजला करितां मजला जें होई
आइच केवळ जाणिल सारें, केंवि कथूं बाई!
माय मुलीची क्षणभर व्हा हो, माय-मुलीची माय
घाव तरि दिसे मम हृदयींचा खोल किती हा जाय.
सुरबालेसम गोंडस बांधा बघतां हा नयनीं
आनंदानें सहज हृदय ये माझें किति भरुनी.
मंजुल गुंजित मम बालेचें पडतांना श्रवणीं
गमे गान जणुं सुरलोकींचें कोंदें या सदनीं;
याच परी कां तुम्हांस बाई! कौतुक इजविषयीं
वाटेलचि का? सांगा सांगा मजला लवलाही.
स्नेहातिशयें शंका येते, राग न मानावा
मातृमनींचा भाव सरळ तो आपण मनि घ्यावा.
उदासीनता असो कशीही; दु:खहि कसलें तें
सहजस्मितमुखबाला बघतां सर्व लया जातें!
आनंदाची खाण मदीया, विश्रामस्थान,
तिच्या सुखांतचि माझें सुखही होय सदा लीन
कधिकाळीं जरि अश्रू दिसले मजला तन्नयनीं
भडभडुनी मम काळिज येतें, सुचत नसे कांहीं

याचपरी का तुम्हास होइल सांगा हो विहिणी!
विहिणि न आपण, भगिनी माझ्या, सांगा मजसि झणीं.
पोर गुणांची, सालस मोठी, कधिं नच कवणाला—
कथील अपुल्या वाचें बाई ‘ अमुक हवें मजला ’
तशीच सोशिक, दु:ख न कवणा अपुलें सांगेल
सोशिल अपुलें आपण आंतचि, तिळहि न दावील.
तिजसी बघतां सर्व मला परि अपोआप कळतें
कळेल यापरि काय तुम्हांला बाइ! ‘कळो’ म्हणतें.
माळ गळ्यांतिल माझ्या बाळा ताइत तिकडील,
प्राण बहिश्चर अमुचा आता वियोग होईल!
मातेचा अवतार संपला माझा आतां कीं
तुम्हींच माता हिची यापुढें जाणावें लोकीं.
प्राण काढुनी देतें मी हा सांभाळा त्याला
माय, बाप, गणगोत यापुढें सर्वचि तुम्हि इजला.
पायां पडतें, पुन्हां प्रार्थितें बोला बोला हो
मम कन्येची माय व्हालना? विहिणी सांगा हो!
“झाली अमुची सर्वस्वी ही, सांभाळूं इजला.
पोर पोटची जशी” वचन हें द्या ह्या आईला.
दृष्टिपुढें मम सदा फिरे जो, दृष्टीच्या आड
होइल आतां, क्षणांत जाइल संसारीं गाढ

प्रेमळ बोलें 'बाळे'! 'बाळे'! घडिघडि दिनरजनीं
बाहत होतें लाडकिला मी, जाईल ती इथुनि.
परि जातां ही पाहुं कुणाला? बाहूं कवणाला ?
देवा! देवा! जन्म मुलीचा कारण शोकाला.

*           *           *

ये, ये, बाळे ! जवळ लाडके! धरुंदे हृदयाशीं
कवळुनि तुजला, गोरेमोरें कां मुख तूं करिशी?
आजवरी जरि आई तव मी होते वेल्हाळे।
या पुढती परि याच आइ तुज समज बरें बाळे!
जन्माची मी केवळ माता, मी न खरी आई
सर्वस्वाच्या तुझ्या या पुढें माता या पाहीं.
निरोप तुजला देतांना ये कंठ अहा भरुनी
शब्द न फुटतो, आंतचि दबतो किति तरि अडखळुनी
गेल्यावर तूं गजबजलेलें प्रेमसदन अपुलें
शून्यचि होउनि येइल खाया आम्हा हें सगळें!
हृदयांतिल या प्रकाश जाउनि भरेल अंधार
आशा लोपुनि घोर निराशा दिसेल चौफेर!
शून्य गृहाला, खिन्न मनाला प्रसन्नता कोण
आणिल बाळे गेल्यावर तूं अमुच्यापासून?
कोंपऱ्यांत ती मूक होउनी वीणा राहील
हात फिरवुनी कोण तिजवरी गाणीं गाईल?

कोण मुलींना बोलावुनियां गृहांत खेळेल
परोपरीचे खेळ खेळुनी हृदया रिझवील ?
अंगत पंगत कोण मुलींशीं करील आतां ती ?
झोंपाळ्यावरि घेउनि झोंक गाइल गाणीं तीं ?
तूंच लाडकी, पाच, हिरकणी माझ्या जीवाची !
तुजविण दुनियां मजला वाटे ओस पहा साची.
ये ! ये ! झडकरि कवटाळूं दे ! दे चुंबन मजसी
एकाकी कशि तुजविण राहिन ? ठाउक देवासी !
दीन दयाळा ! प्रणतवत्सला ! द्यावें धैर्य मला
सहन कराया जगीं यापुढें कन्याविरहाला !
अतां सांगणें शेवटचें मम हेंच असे बाळें !
स्मृती असूं दे या आईची, अधिक न मी बोलें.
आंवर आंवर अश्रु लाडके !
ही बघ तव माता—
बाई !—
विहिणी ! —
भगिनी !—
इजसी सांभाळा आतां !!

कमलेचीं पत्रें.

# गृहिणी

[ इंग्रजीच्या आधारें ]

[ चाल:—अर्ध तनू वारुळीं ]

सती सद्गुणी चतुर गेहिनी प्रीतिदेवता जया—
लाभे, काय उणें मग तया ?
सुहास्य वदनीं तिच्या उमलतीं पुष्पें मोहक किती
ज्यातें तारागण लाजती !
सुंदरि येतां सन्निध ऐशी भयाण कानन जरी
वाटे नंदनवन तें परी;
सन्निध येतां प्रिया भासतें सकल विश्वही नवें
मही ही नटें नव्या वैभवें;
नर जन्माचें प्रीतिसार हें असे;
शून्य तिजविणें सारें जग हें दिसे.
प्रीती जातां काय जगीं मग वसे?
कुसुमाहूनी प्रीती मृदुलतर अल्प झुळुकही करी
तिजला विकल बहू अंतरीं !

२

अरुणोदयिंचे वारे सुखकर खगमधुकूजित तसें
हृदया मोद किती देतसे!
हिमस्थित तशीं कुसुमें पडतां बालरवी त्यावरी
देती सौख्य मना कितितरी !

तारागण तो नभीं चमकतां शांत रसातें झणीं
प्रेमें भरवी अपुल्या मनीं!
परि या सर्वांहूनी सुखकर असे
गृहिणीसुख तें, त्याविण कांहीं नसे,
सर्व विश्व हें तिच्याच ठायीं वसे
स्फूर्ति तीच, ती कविता; विद्या, सकल रसांची खनी,
किति तरी करणें वाखाणणी!

३

नेत्र कटाक्षें प्रेमें जितुकें वजन ओढि सुंदरी
तितुकें बाष्परथ न ने परी!
दिव्य शक्ति ही तिच्याच ठायीं तिजसम बलनिधि कुणी
नाहीं अन्य खरोखर जनीं
प्रीतिद्योतक, मार्गदर्शिका तीच आपणा जनीं
तिज ही हृदयाविण नच कुणी;
आपण तरु, ती वेल आपणावरी;
आपण काया, प्राण असे ती परी;
चंद्र असे नर, सखी चंद्रिका खरी;
प्रेमदायिनी ऐशी गृहिणी गृहीं न ज्या सुन्दरी
त्या मग कां न म्हणावें दरी?

**मासिक मनोरंजन.**

# आराधना

गेला काल किती त्वदीय करितां आराधना मी तरी
नाहीं होत कशी प्रसन्न अजुनी त्वद्वृत्ति दासावरी?
झालें भेटुनि मास फार तुजला, सेवेस आलों न मी
त्या योगें तुजला मदीय कविते! आला असा राग कां?

झाला, होउ नये–प्रमाद, पदरीं दासास घेई आतां
भूषा थोर जनां गमे सतत कीं रोषाहुनीही क्षमा
झाला पुत्र कवीस, उत्सव तयें साह्याविणें तूझिया
कैसा तो करणें? जगास पुरता ठावा दरिद्री पुरा!

नाहीं मी नृपती, धनीकहि न वा, लक्ष्मी सदा वांकडया
दृष्टीनें अवलोकिते मज, तुझा मी दास झाल्यामुळें
इच्छा फार असे मनांत करणें पुत्रोत्सवातें, परी–
व्हावी पूर्ण कशी जरी मजवरी रागांत तूं ही पण?

झाली ज्या दिवशीं परस्पर पहा ती आपुली ओळख
तूंतें तेंच दिनीं प्रसन्न हृदयें सर्वस्व मी वाहिलें
तूंही प्रेमभरें प्रसन्न नयनें दासाकडे पाहिलें
दृष्टिक्षेप तुझा असा मजवरी होतांच मी हांसलों.

माझें पाहुनि हास्य लोक म्हणती–'कोणासवें हांसतो?'
त्यांतें तूं दिसशी न गे, परि मशीं गोष्टी गडे सांगसी!

माझ्या दृष्टीपुढें कुणा न बघुनि 'वेडा' मला बोलती
वेडा पूर्ण मला अतां ठरवुनी ते व्यर्थ धिक्कारिती!
आहे प्रेम तुझें जरी मजवरी मी तेंच संबोधन
मातें भूषण मानितो, मिरवितों 'वेडा' म्हणूनी जनीं
तूं माझी असतां नको मज कुणी तें साह्य गे द्यावयां
आलों मी म्हणुनी अतां तुजकडे, लोटुं नको दूर तूं!

---

# निद्रेप्रत

[ इंग्रजीच्या आधारें ]

निद्रे ! ये झडकरि धांव
कर कृपा मला तूं पाव, जिवलगे !
तूं झरी गडे शान्तीची;
तूं जननी सुविचारांची;
तूं दु:खातें हरणारी;
तूं गरिबां सुख देणारी;
तुज सवें सुखें रमतांनां
बंदिजना बंध कळेना;
उच्चनीच लघुगुरु यांचा
तुज जवळीं भेद न साचा, जिवलगे !

२

ही दुष्ट निराशा जाची,
मम हृदया संतत टोंची;
देईन गोड मोबदला–
तुज, तरी शांति दे मजला !

घे गिरदी किनखापाची
घे शय्या मृदुल रुईची
घे शांत स्थल रमण्यातें
जें देई स्थान तमातें, जिवलगे !

३

घे गुच्छ फुलांचा ताजा
स्वीकार करि परी माझा;
" सर्वही मला हें देती,
मोबदला कां या म्हणती ? "
एसें जरि वदसी तूं गे,
घे, अन्य तुला देतों गे,
पूर्वीं न कुणी तुज असला
मोबदला कधिंही दिधला, जिवलगे !

४

मम हृदयमया जी झाली
अन्तरिं जीं पण मिळाली
जी स्फूर्ती मम काव्यांची
जी खनी सर्व सौख्यांची ?

निद्रेप्रत.

त्या प्रेममूर्ति प्रियसखिचा
होईल लाभ तुज साचा
तद्दर्शन हा मोबदला
योग्य न का वाटे तुजला?–जिवलगे !
निद्रे! तरि झडकरि धांव
कर कृपा मला तूं पाव

मासिक मनोरंजन.

———

## अवन्तिकेस

[ प्रिये पहा रात्रीचाः—ही चाल ]

अवन्तिके ! वैभव तव पूर्व सर्व आज नष्ट जाहलें ! धृ०
कालिदास, भवभूति,
दण्डि, बाण चण्डकृति,
भर्तृहरी विमलमति,
तव कवि तुज हरपले !

२

वाग्देवी कंठमणी
थोर कवी मावळुनी
त्या जागीं अल्पगुणी
मजसम तुज लाधले !

३

शककर्ता विबुधमान्य—
विक्रम नृप, भोज धन्य,
शूर रसिक नृपति अन्य
आज कुठे राहिले !

४

म्हणती सौन्दर्यखनी–
तुज, न आज परी कुणी
रूपें दे मोह मनीं
  रूप कुठें लोपलें ?

५

अस्तातें विधु जातां
तेज येत खद्योता
खुलति तशा पुरवनिता
  रूप खरें मावळे !

६

' मोर पुढें नृत्य करी
प्रमदा करताल धरी '
पूर्वींचें सर्व परी
  स्वप्न अतां जाहलें !

७

विस्तृत आरामतति,
विविध रम्य पुष्पपंक्ति
आज सर्व लोपे ती
  उलट केंवि जाहलें !

८

वरगृहास वधु जातां
वधुगृहास भेंसुरता
अवन्ति! तूं तशि आतां
तेज तुझें नष्टलें!

९

वेदशास्त्रपूर्णनिपुण
जाउनि तो ब्राह्मणगण
चंगिभंगि मूढ पूर्ण
तुजसि आज लाभले!

१०

नृत्यकला गानकला
गेल्या त्या अस्ताला
फाटे नभ तरि त्याला
ठिगळ कुणीं लाविलें?

११

पूर्वकविग्रंथांनीं
परिचय तव होवोनी
पाहिन तुजलागोनी—
कधीं? असें वाटलें.

१२

होतां परि भेट, हाय !
विपरित हें होय काय ?
रम्य रूप तुझें जाय !
   विद्रुप हें दीसलें !

१३

प्रेरावी दृष्टि जिथें
अश्रूंतें कारण तें
अवन्तिके ! दुर्दिन ते
   तुजसि कसे पातले ?

१४

स्थिति ऐशी जरि झाली
स्थळें दोन या काळीं
चित्तवृत्ति मम धाली—
   बघुनि, हृदय तोषलें.

१५

देखावा क्षिप्रेचा
पांग फेडि नयनांचा

वर्णाया नच वाचा—
  शक्य, शब्द खुंटले.

१६

दुरितदहन सुखनिधान
पतिताधमजनपावन
महाकाल मोक्षभुवन
  हृदया मम भासलें !

१७

क्षणभंगुर वैभव तें
तव गेलें, जावो तें
अक्षय परि हें तूंतें
  वैभव बघ लाभलें !

काव्यरत्नावली

---

## स्फूर्ति कशांत आहे ?

" स्फूर्ती ! वदे तूं वसतेस कोठें ?
धुंडाळिता भागति मोठ मोठे !
मातें तुझें तें स्थळ सांग सांग
फेडी सखे ! हा मम एक पांग"     १

" कोणी वियोगी तव वास सांगे
संयोगिं कोणी वदतो तसा गे
मातें तुझा लागतसे न थांग
होणार का गे मम आस भंग ? "   २

*     *     *

स्फूर्तीस तों स्फूर्ति झणीं जहाली
या लेखिल्या चार तिनेंच ओळी
त्या वाचुनी थक्क मनांत झालों
' वेडा खरा मी ' हंसुनी म्हणालों ! ३

*     *     *

" कोणी म्हणे मी वसते वियोगी
कोणी वदे मी असतें मदंगीं
संयोगिं मी बोलतसे कुणि तो
लागे कुणाला परि थांग ना तो !   ४

‘ कोठे असे देव ? ’ जना विचारी :—
‘ कोठेतरी ’ ‘ तो मुळिं निर्विकारी
आकार नाहीं मग त्या कशाला
न्हावें बरें स्नान वसावयाला ? ५

काष्ठीं स्थळीं तो वसतो जळांत
वाटेल ज्याच्यांत मिळेल त्यांत ’
तैं जें तुझ्या नेत्रपथांत येतें
माझें कवे ! स्थानचि सत्य तें तें ६

प्रत्येक वस्तूंत पहूडलेली
आहेच मी इच्छित कार्यकालीं
जागें कराया मज शक्ति लागे
माझ्यांत ती शक्ति परी न वागे ! ७

माझें जिणें सर्व तिच्यांत आहे
तीच्याविना मी मृत शुद्ध पाहे
धुंडाळिलें तीस जरी जगांत
लागेल तूंतें न कदाहि अंत ८

स्वाधीन ती शक्ति तुझ्याच आहे
ऐसें असोनी मग वेड कां हें ?
हातांत वस्तू जगतांत पाहे
हा न्याय वा वेड तुझ्यांत आहे ! ९

आहे खरी ती हृदयांत तूझ्या
या वाच रे वाच वचांस माझ्या ”

*   *   *

त्या वाचुनी थक्क मनांत झालों
‘ वेडा खरा मी ’ हंसुनी म्हणालों. १०

काव्यरत्नावली

## तारा आणि काजवा.

झालें निद्रित विश्व शान्त रजनी होती तशी जाहली
मच्चित्तीं परि शांतता नच मुळीं; नाना विचारावली—
येवोनी मम मानसा दुखविती; निद्रा नये लोचना
आरामी पडलों म्हणूनि शयनीं आराम द्याया मना १

ताऱ्यांची गगनांगणीं द्युति अती होती वरी फांकली
खालीं ही पण काजवे पसरिती अल्पप्रभा आपुली
झाली वृत्ति मदीय त्या उभयतां तल्लीन ती पाहुनी
गर्वें तारक काजव्यास वदला तारस्वरें तों झणीं २

" खद्योता! द्युति अल्प रे तव किती स्पर्धा कशाला तरी
माझ्याशीं करिशी नभांत उडशी तूं व्यर्थ वेडयापरी
आहे का उपयोग बोल कवणा त्वद्दीप्तिचा या जनीं
स्पर्धा आजवरी कधीं बलवंतांसंगें न केली कुणी ३

" कोठें कांच, हिरा कुठें, गगन तें कोठें, धरा ती कुठें
राजा थोर कुठें, भिकार तसला तो रंक सांगे कुठें,
मर्यादा त्यजुनी न वर्तन असें थोरासवें आचरीं
जा, जा, जा तर खालतीच मषका! येऊं नको तूं वरी" ४

अंगाचे मग तारकें करुनिया विक्षेप नानापरी
खद्योतास कितीतरी हिणवलें त्या काय सांगू परी

खद्योतें परि आपुली न समता ती अल्पही सोडिली
बोले नम्रवचें पुढें करुनिया त्याच्या प्रणामांजली:—५

" व्योमीं वास तुझा, धरेवर असे माझा मला हें कळे
तें तूं स्पष्ट मला कथोनि तुजला मोठेपणा का मिळे ?
स्वप्नीं देखिलही खरोखर कसा हेवा न ठावा मशीं
कां रे ! व्यर्थ अशीं घरें कटुवचें मन्मर्मि तूं पाडिशी ? ६

"गर्वोक्ती परि ही तुझी परिसतां खेदोर्मि हेलावती
तूं रे थोर जरी तरी तव मला येते पहा कींव ती !
कां हा गर्व असा मनीं धरिसि तूं त्वद्दीप्तिचा निष्फल
चंद्राची द्युति रे तुझ्याहुनि, रवी त्याच्याहुनी उज्वल !७

"एकाहूनि अनेक थोर असती तूंतें न कैसें कळे ?
बुद्धिभ्रंश घडे त्वदीय गमतें हा आज गर्वामुळें !
येतां मेघ तुझ्यावरी मग कुठें त्वत्कान्ति लोपेल रे
छे, छे मेघ तरी कशास? नलगे, आहे धुकेंही पुरें—८

"कान्तीचा जरि आव घालुनि नभीं टेंभा असा वाहसी
तूंतें धूम्रहि खलचा लपविण्या तो शक्त वाटे मशीं
माझी दीप्ति पुरे मला, न कवणा झाला जरी लाभ तो
गर्वाचें घर खालती तव बरें येईल हें सांगतों." ९

झालें भाषण हें तदीय न पुरें, तों मात ही जाहली
एकाकीं श्रवणीं कडाड रव ये ज्वाला नभीं फांकली
तारा तो तुटुनी धरेवर पडे, खद्योत त्या पाहतां
"गर्वें घातचि जाहला तव बरें?" झाला तया बोलता १०

*　　*　　*

हा! हा! यापरि आज थोर गरिबां गर्वांत धिक्कारिती
त्यांनीं मानसिं तारकस्थिति परी ही ठेवणें जागती
येतां मन्मनिं हा विचार हृदया शांती अती वाटली
निद्रेच्या वश जाहलों सहज मी बागेंत रम्यस्थलीं ११

काव्यदोहन

---

## सायंस्वप्नें

सायंछाया त्या होत्या
आनंदानें बागडत्या
प्रकाश तम हे परस्परां
चुंबिति करुनी अति त्वरा १

ऐशा कालीं दोघिजणी
सायंस्वप्नें बघत मनीं
बसल्या होत्या उद्यानीं
फुललें जें नव पुष्पांनीं २

एक होति ती म्हातारी
दुसरी परि तरुण कुमारी
एकाचें मुख सुकलेलें
दुसरीचें परि फुललेलें ३

एक चिंतिते पुढच्यातें
दुजी परी गेलेल्यातें
" हा ! दिन गेले सौख्याचे ? "
" येतिल दिन कधि मौजेचे ? " ४

तरुणी रेखित ती होती
कल्पकता—फलकावरती
भावि सुखांची मधुचित्रें
वेडया आपुल्या स्वमनकरें ५

वृद्धा अवलोकित होती
गत कालाच्या फलकीं ती
अंधुक अंधुक आकृति त्या
तिनें काढिल्या ज्या होत्या ६

फिरतां फिरतां मी तेथें
गेलों बसल्या त्या जेथें
त्यांच्या जवळीं मी बसलों
त्यांतें पाहुनि कौतुकलों ७

‘ सायंस्वप्नें ’ दोघींचीं
स्वतां पाहिली मी साचीं
नवल !
परि त्यामधि कांहीं
अंतर मज दिसलें नाहीं ! ८

काव्यरत्नावली

# तीर आणि गाणें

[ इंग्रजीवरून ]

हवेंत शर सोडिला श्रवणिं चाप आकर्षुनी
कळे न मम मानसा कुणिकडे पडे जाउनी
अतीशयित ती असे शरगती पहा चंचला
अशक्य नयनां गमे म्हणुनि पाहण्या त्या स्थला १

हवेंत मधुरस्वरें मधुर गान मीं गायिलें
कुठें अदळलें तदा मधुर गान हें ना कळे
कुणांत जगतीं असे चपल ती गती जी अहा
त्वरें अनुसरील त्या मधुर गाननादा पहा ? २

अनेक दिन लोटल्यावर वनीं स्वयें हिंडतां
तरूंत मज लाधला शर न अग्र तें मोडतां
तसेंच मम गान तें गवसलें मुळापासुनी
"कुठें गवसलें कवे ! वद तरी ?"—
" सख्याच्या मनीं " ३

काव्यरत्नावली

# एक उपमा

[ इंग्रजी वरून ]

हे काला ! सरिते ! जगांत तुमची आहे गती सारखी
विश्रान्ती म्हणुनी अशी न कधिंही आहे तुम्हां ठाउकी
जातां टाकित मंद मंद पद ते स्वच्छंद रात्रंदिन
कोणीही तुमची गती शमविण्या निःशक तो शक्त न,

होतो भीषण अर्णवांत तुमचा तो अंत लोकीं सदा
गेलेला तुमचा न ओघ जगतीं येईल मागें कदा
आहे साम्य जरी तुम्हांत इतुकें वाटे कवीला तरी
कीं आहे तुमच्यांत अंतर अती, कोणांत ना त्यापरी.

जातानां सरिते! जगा हसविसी, आनंदवीसी अती
सस्यें भूषविसी धरा, विचरसी तूं नाचसी स्वैर ती
गाणें सुस्वर गाउनी रिझविसी नाना जनांच्या मना
कालाची तुज साम्यता म्हणति ही वेडी पुरी कल्पना

काला ! तूं मजसी परी रडविसी, उद्विग्नता आणिसी,
नैराश्या हृदयांत तूं भरविसी, खेदीं मला लोटिसी,
गाणें भेसुर गाउनी भिवविसी, सौख्यास नेशी दुरी,
तूं जातां करिसी उजाड मजसी सारें जगाभींतरीं !

**काव्यरत्नावली**

## दोन फुलें

तारुण्यानें लवलेली
पुष्पासम जी फुललेली
मोहक मृद्वंगी बाला
निघे उपवनीं जायाला १

मंद पवन सुटला होता
अलिगण तेथें बागडता
आलापिति गाना भुंगे
सहज तिथें तन्मन रंगे २

उपवनशोभा पाहोनी
आनंदित झाली रमणी
निघे गृहीं जों जायाला
पाहे तों वनदेवीला ३

शान्तीची केवळ मूर्ति
शांत गभीरा तद्वृत्ति
शांत अंती मंजुल वाणी
सुगुणांची केवळ खाणी ४

दोन फुलें त्या देवीनें
तोडियलीं मग हस्तानें

एक सुमन सुचवी हृदया
दुसरें तें वपु-सौंदर्या ५

' आवडती तुज मधुर फुलें
म्हणुनि आणिलीं हीं बाळे !
या दोन्ही पुष्पांमधुनी
रुचेल तें घे निवडोनी ' ६

एक पुष्प मग निवडोनी
तरुणी घे तिज पासोनी
निवड बघुनि देवी द्रवली
शब्द न एक परी वदली ७

अंतर्हित तेथें झाली
तरुणीही गेहा गेली
इंगित चुंबित गोड फुला
धन्य गणीं मनिं अपुणाला ८

' योग्य निवड मी कशि केली ! '
या सुविचारीं मनिं धाली
गोष्टिस दिन या बहु झाले
नंतर तिज सुम तें स्मरलें ९

जीर्ण शीर्ण परि सुकलेलें
फूल तिचें तिजला दिसलें
वपुसौंदर्या निवडोनी
घात घेतला मी करुनी १०

" हृदयाच्या त्या सौन्दर्या
कैंवि त्यागिलें मी वाया ? "
अनुतापें मन कळवळलें
अश्रुजलें तन्मुख भिजलें ! ११

## ओसाडी

ओसाडी दिसते भयाण नयनां विस्तीर्ण ही प्रीतिची
झालों श्रान्त तृषार्त मी भटकतां हीचेमधें अंतरीं
गेलों टाकित जों पुढें धरुनिया आशा जलाची पदें
तों तों दूर पळे मला भिउनिया पाण्या सुखाचा झरा !
होतां दीन असा मला गवसली काळी निराशा-शिळा
जावोनी बसलों तिच्यावर न जों विश्राम मी घ्यावया
येई संशय-भूत तें बसुनिया तों वातचक्रावर
तेणें पूर्ण मला पछाडुनि क्षणीं केलें पिशाचापरी !

प्रीतीला भुलुनी पिशाच बनलों याचा मला खेद तो
होतो हें समजा मुळीं नच, गणीं धन्यत्व त्याच्यांत मी
प्रीतीचा चटका न ज्यास बसला तो व्यर्थ कीं जन्मला
दुःखीं या सुख जें नरा मिळत तें देवांसही दुर्लभ !

त्याची का जर कल्पनाच नुसती देवांस झाली तर
देवत्वासहि टाकुनी क्षणिं भुतें होतील माझे परी !

काव्यरत्नावली

# फटका

सप्तसमुद्रा पलीकडोनी, चिर-तरुणी ही नव-रमणी,
सवाष्ण अक्षय, नव वर शोधित, येत मुदें भारत भुवनीं १

आर्यावर्ती स्त्रीदाक्षिण्यीं, तत्पर संतत नरजाती,
ख्याती ऐशी परिसुनि पारख, करण्या ये ही चपलगती २

निसर्ग सुंदर, बांधा गोंडस, गौरकाय, सडपातळ ती,
गुलाब गालीं, सुगंध वदनीं, नयनिं तरलता गहिरी ती ३

मोहक ऐशी पुतळी बघतां, आर्यमंडळी उठली ती,
तरुण, वृद्ध, ते गरिब, धनिक ही, तत्करग्रहा धडपडती ४

असुरकन्यका बहुरूपी मग, अनेक रूपें घेई ती,
प्रेमकटाक्षा फेंकुनि जिंकी, सहज लीलया हृदयें ती ५

घरोघरीं तत्प्रस्थ माजलें, मज्जाव न तो हिज कोठें,
ज्या जवळीं ही सदा बसे, त्या म्हणति उलट ते जन 'मोठे' ६

ही न जिथें तो समाज शिष्ट न, हिजविण पर्ण न मुळिं हाले,
आर्यपौरुषावरी या परी, हिनें प्रभुत्वा गाजविलें ७

राव, रंक वा मूर्ख, शहाणा, भेद न आणी ही चित्तीं,
रंगेल सदाची! असो कुणी ही कसाहि इजला नच खंती! ८

पडुनि गळां ही अधरसुधा मधु, भक्तजनांला पाजविते,
मायावी बहु पोटीं शिरुनी, गूढ मात्रही ओकविते ९

स्वतां मूक, परि भक्तां करिते, बृहस्पतीसम वाचाळ,
पिंगा, फुगडी,लोळण, नर्तन, गायन शिकवी स्नेहाळ १०

गाली–सुमनां भक्ताकरवीं-निवडुनि त्यांची नवमाला-
गुंफवोनिया 'इतर' जनांला, वाहवीतसे ही बाला ! ११

एकनिष्ट जे भक्त तयांचें, वडिलोपार्जित भूगतही,
स्वार्जित तैसें धन हरुनीया,निर्घोर तयां मग करिते ही १२

धी, श्री, लज्जा, शक्ती, थरथर कांपति इजला बघुनीया,
जेथें ही, त्या तिथें न वसती, जाती गाशा घेउनिया १३

जहाल, घातक, कपटी मोठी, गोरी जितुकी ही वरती
काळी आंतुनि तितुकी भरली, हिजसम कुलटा नच
जगतीं १४

महिमा हीचा वर्णन करण्या, सहस्रमुखही शक्त न तो,
व्यर्थ कशाला यत्न करूं मग, लेखणि येथें थांबवितों १५

* * *

'कोण, कोण ही ?' म्हणुनि कशाला, पुसतां मजला
फिरफिरुनी,
तीच आपुली सखी 'वारुणी' नाहीं जाणत कां अजुनी?

मल्लारिमार्तण्डविजय १९१७

---

## काळ.

[ राग बिहाग ]

धन्य म्हणूं वा अधन्य तुजला
काला! न कळे किमपी मजला! धृ०

प्रियविरहानें व्याकुळ जो जन
एक क्षण, युग घेई तन्मन;
तव गति मंदा भासे त्याला!

२

प्रियजनसंगमसुख अनुभवितां
दीर्घ कालही जाइ, न कळतां
तव गति वाटे मग ती चपला!

३

आजवरी किति राष्ट्रें पडलीं
बळी तव मुखीं; किति उद्भवलीं
नूतन, सीमा नाहीं त्याला!

४

तव गति कवणा हंसवी, रडवी,
कवणा बुडवी, ठकवी, चकवी,
भिन्न भिन्न ती दिसते सकलां!

५

तव शक्तीची अगाध करणी
धरणी, तारे, सुधांशु, तरणी,
तत्पर निशिदिनिं तव सेवेला !

६

सत्ता प्रबला अशी जयाची
त्या पुढतीं नच पाड नराची
नवल न अंकित तुज जरि झाला !

७

आदि अन्त तुज नाहीं कांहीं
ब्रह्मरूप तूं अक्षय पाही
वन्दन करितों तव चरणांला ।

मासिक मनोरंजन

## फटका.

[ प्रयत्नवादी, दैववादी मनुष्यास उद्देशून म्हणतो.]

रडा ! रडा ! बाईल होउनी घरांत बसुनी रडा !
'दिवस आमुचे गेले, फिरले दैव !' म्हणूनी रडा, रडा !

जरी खिळखिळीं हाडें झालीं खातां मारा फटक्यांचा
स्वस्थ रडा तरि तुम्ही म्हणोनी 'खेळ असे हा दैवाचा !'

घरांत बसुनी चुलींत विष्ठा आपण होउनि टाकावी
'दैवाची गति फिरली !' ऐशीं मग रडकीं गाणीं गावीं !

उद्यमविरहित मूर्ख नराची
बाईलपणा लपवायाची
दैव असे ही ढालचि साची

लपा, लपा, तुम्हि तिच्याच मागें, निर्लज्जांनो ! लपा, लपा
दैववादि ते पूर्ण बनोनी अश्रू ढाळा टपाटपा !

२

'ठेवी प्रभु ज्या स्थितींत तिजमधिं सौख्या आपण मानावें
ईशेच्छा ती बलिष्ट' ऐसें नित रडवें गाणें गावें !

अन्न असोनी अन्न न खावें, असुनी जल जल नच प्यावें
स्वस्थ मरावें अन्न जलाविण, देवाला दूषण द्यावें !

प्रयत्न कधिंही करूं नये तो! हातपाय ना हलवावे!
'असेल अमुचा हरी तरी तो देइल'! ऐसें बोलावें!
'देव' 'देव' तो कोण असे हो?
प्रयत्नान्ति तो धांवतसे हो!
किंवा आपण मूर्त देव हो,
छे, छे! मी हें काय शिकवितों तुम्ही आपुले रडा, रडा!
प्रवृत्तीच्या गिरीवरोनी खुशाल धड धड पडा, पडा!

३

'समाधान हें सुरलोकींच्या बागेंतिल सुंदर झाड'!
ऐसें म्हणुनी तळीं तयाच्या सेवावी निद्रा गाढ!
'जी स्थिति देइल देव तिजमधीं समाधान तें ठेवावें'!
'वारा जिकडे वाहिल तिकडे पाठीतें मग फिरवावें!'
ऐशीं संतत गाणीं गावीं, चित्तातें बहु रिझवावें
आपण कोठिल? काय करितसूं? विसरुनि हें अवघें जावें!
समाधान केवळ नाशाचें
मूळ असे या जगतीं साचें
अवलंबन तें योग्य न त्याचें
करावयाचें काय तुम्हा परि पौरुषतेचा शिकुनि धडा?
तुम्ही आपुले बाइल बनुनी घरांत बसुनी स्वस्थ रडा!

**मासिक मनोरंजन.**

# जागृती

चालः—"अर्धतनू वारुळी"

स्वतंत्रतेचा ऱ्हास जाहला शिरली परतंत्रता
ऐसें राष्ट्र जगीं या वृथा
मेलेली ती भाकर खाणें परकीया सेवणें
धिक् धिक् राष्ट्राचें त्या जिणें
परकीयांचा गाडा वाहुनि मान किती वांकली
गात्रें विगलित तीं जाहलीं
चला, उठा तर शौर्याची ती उंच उभारा गुढी
तोडा गुलामगिरिची बिडी
'महाराष्ट्र' या नांवाची तरि चाड मनीं बागवा
मेळवा जगाकडुनि 'वाहवा' !
झाडा आळस तो नच बरा
लज्जा पितरांची ती धरा
माना उंच जरा तरि करा
सहनशीलता अती गुन्हा हा, वरणें धीरहि अती
कारण अन्ति निराशेप्रती
धार धरा तर प्यार जिवापर, पौरुष दावा खरें
बनलां ऐशीं कां मेंढरें ?
पितरें स्वर्गीं अश्रु ढाळिती, येथें हीं लेंकरें
रडतीं, कण्हतीं करुणस्वरें

घाम फुटूं द्या, स्फुरूं हात द्या, उद्यम कांहीं करा
स्मरा हो मातृभूमिला स्मरा !
मारूं अथवा मरूं म्हणोनी दंड ठोकुनी खडे—
व्हा हो; करा न मागें पुढें
समरीं विजयें कीर्ती, निधनें स्वर्ग, अशीं बक्षिसें
बसला स्वस्थ उगें मग कसें ?
तुम्ही 'मावळे' म्हणुनि मावळे कीर्ती तुमची अशी
जोडतां कां या अपकीर्तिशीं
भगवा झेंडा गगनीं उडे
शिवबा हा मी त्याच्या पुढें
चालुनि सांगतसे रोकडें
फुंका सत्वर तुम्ही तुतारी, निशाणही फडकवा
झडवा नौबद, यश मेळवा
'पडलेलें हें राष्ट्र संकटीं आलें उदयाप्रती'
ऐसा बोल निघो भारतीं

———

# क्षिप्रातीरावर

[ चाल—नका करूं अविचार ! ]

रमे इथें मन फार !
रम्य स्थानें अन्य आज तीं
मजला गमती
सर्व असार !—धृ—
विमल तारका निरभ्र गगनीं
दीप्ति आपुली देती भरुनी
हृदया होई त्या बघुनी
अनुपम सौख्य अपार !
प्रतिबिंबित मज नक्षत्रें तीं
निर्मल उदकीं खालीं दिसतीं
परि त्या बघुनी मम येती
नयनीं अश्रू-धार !
नभांत तारा वरी शांतता
जलीं सेवितो परि चंचलता
तरंगसंगे येइ अतां
कुदशा त्या अनिवार !
आशातारा तुजविषयींचा
विभो ! वसे मम हृदयीं साचा

मार्ग चुके हा परि त्याचा
काय करूं लाचार !
मायासरिता पृष्टीं होई
प्रतिबिंबित तो देवा ! पाही
प्रीतितरंगें त्या येई
अनित्यता साचार !
आत्मज्ञानार्णवीं शांतता
रूप विमल तव बिंबो ईशा !
हृदयीं उपजे ही आशा
तूंच पूर्ण करणार !

मासिक मनोरंजन

## ॐ ब्रह्म

येतां मेघ नभांत वासरमणी तो झांकला जातसे,
होतें गोचर नीर तें न नयनां येतां वरी शैवल.
सेवी दर्पण बिंब तें न हृदयीं होतां मळें व्याप्त तो,
दृष्टीनें न दिसे जरी पडळ तें ये लोचनांच्यावरी;
जाई झांकुनि अग्नि उज्वल अती धूमें जरी वेष्टिला,
रत्नाचें पडतें न तेज जरि तें वस्त्रांत बांधीयलें,
उल्बें वेष्टित राहतो निशिदिनीं गर्भाशयीं गर्भ तो,
जाती झांकुनि सर्व अस्थि तनुच्या जैशा त्वचेच्यामुळें;
गेलें झांकुनि त्या परी जगतिं या तें ब्रह्म मायेमुळें
व्हावें ब्रह्म मना ! तुला, तरि असे हा मार्ग तूतें खुला;
मायाबंधन तोड हें; नच पुढें राही अतां त्यामधें,
जें जें या जगतीं तयांतिल तुझी आसक्ति घे काढुनी
अभ्यासें तुज साध्य हें, वदति ते ज्ञाते पुराणान्तरीं
ब्रह्मप्राप्ति-नव्हे-स्वयं मग मना ! होशील ॐब्रह्म तूं !

मासिक मनोरंजन.

---

## नवी सृष्टी–नवा देह.

आशा सारी मावळली ती
उदय पावली आतां भीति
आयुष्याची आली खंती
मरण तरी येवो !

२

गतवर्तन तें आतां बघतां
सुजती डोळे रडतां रडतां
शिक्षा त्याची पुढती दिसतां
कंप सुटे देहा !

३

"पश्चात्तापें तव तनु न्हाली
पापें सारीं विलया गेलीं
देवाची तुज ओळख पटली
कां मग तूं भीसी ?

४

हृदय तुझें हें आतां कवणा
देउं नको तूं मर्त्यजनांनां
अर्पी संतत 'त्याच्या' चरणा
तारिल 'तोच' तुला"

५

गुप्तध्वनि हा परिसुनि हंसलों
हंसुनी रडलों, रडुनी हंसलों,
नूतन सृष्टीमाजी शिरलों—
घेउनि देह नवा !

मासिक मनोरंजन

## या पुढें !

[ नंद गृहाच्या जवळ:-ही चाल ]

देवा ! तुजविण मजला न रुचो
अन्य विषय कांहीं
या पुढें-धृ०—

मस्तक चरणीं तव जरि नत न
घडावरी तरि त्या वागवुन
कांहीं फल नाहीं
या पुढें !

२

ध्यान तुझें जरि नयन न बघती
तरि ते खांचा का नच होती
नलगे दृष्टी ही
या पुढें !

३

रसना तव जरि नाम न घेई
झडुनी तरि ती का नच जाई
आतां लवलाहो
या पुढें !

४

भक्तिप्रेमें कंठ न येई
भरुनी तरि तो किमर्थ होई ?
असुनी फल नाहीं
या पुढें !

५

करिति न पूजा कर हे तव जरि
गमतें मातें त्यांतें ही तरि
निष्फल तनु वाही
या पुढें !

६

ध्यास न तव जरि लागे हृदया
हृदय वृथा तरि तें तूं सदया !
दिधलें मजलागीं
या पुढें !

७

पवित्र पुण्यस्थानें तव तीं
बघण्यातें जरि पद नच जाती
निष्फल तरि तेही
या पुढें !

८

त्वच्चिन्तनिं मी नित्य रमावें
इतुकें मजला देवा ! द्यावें
अन्य नको कांहीं
या पुढें !

## सुख–दुःख.

भीषण लाटा काय उसळती
प्रचंड वारे वाहुं लागती
घोर कृष्णघन उदय पावती
भरला अंधार !

२

जिकडे तिकडे भीती भरली
डोळस दृष्टी अंध जाहली
शक्ती सारी विलया गेली
पंगू मी झालों !

३

पिशाच्चगण मज वेष्टायाला
श्वापदेंहि तशि भक्षायाला
वादळ गगनीं उडवायाला
सज्ज असे झालें !

४

तत्वें सारीं जरी खवळलीं
भीक तया मी मुळीं न घाली
आहे माझा 'ईश्वर' वाली
तारिल 'तोच' मला !

५

सौख्यें दुःखें इच्छा 'त्याच्या'
केवळ मनुजें पाळायाच्या
त्यातें पाळुनि, व्हावें 'त्याच्या'—
आज्ञेंतुनि मुक्त !

## माझें गाणें

[ चाल:–तस्करा हातीं· ]

तारका गगनीं
गाणीं मंजुल तीं
मधुरशा स्वरें मुदें गाती !

२

स्वैर ते वात
गुंगत गगनांत
विचरती गोड गीत गात !

३

वर्षतो गान
वरुनी चंडोल
गान नच–जादूचा लोळ !

४

ओतुनी कंठ
धरणीवरि मोर
लोटितो टाहोचा पूर !

५

पक्षिगण वृक्षीं
भृङ्गहि उद्यानीं
जाहले सर्व गुंग गानीं !

६

गात मधु गाणीं
निर्मल निर्झरिणी
धरणिच्या अंकीं खेळोनी !

७

गानमय सगळें
सगळें विश्व दिसें
हृदयिं मम गान न कोंवि वसे ?

८

बालकवि गाणें
मज भोंती गातो
मजसिही 'गा, गा, गा' म्हणतो

९

गाउं मी कसलें
गाणें मज न कळे
हृदय मम शून्य हाय दुबळें !

१०

हृदयिंची तारा
ज्या दिवशीं तुटली
त्या दिनीं कविता मज विटली !

११

जाहलें मूक
मूक जरी गान
हृदय परि पिळतें आंतून !

काव्यरत्नावली

———

## पलीकडे !

देवा ! पाही
तुजविणें नको मज कांहीं—॥ धृ॰ ॥
नको लावणीं, नको कांपणी,
नको मोद तो, नको खेद तो,
नको जागृति, नको सुषुप्ति,
नलगे कांही
या पलीकडे मज नेईं !

२

फुलणें नलगे, कुजणें नलगे,
प्रकाश नलगे, ध्वान्तहि नलगे,
आशा नलगे, भीती नलगे,
नलगे कांहीं
या पलीकडे मज नेईं !

३

संगम नलगे, वियोग नलगे,
नकार नलगे, रुकार नलगे,
काया नलगे, माया नलगे,
नलगे कांहीं
या पलीकडे मज नेईं !

काव्यरत्नावली.

# होळकरांचा फटका.

( चाल–साधी-खडया सुराची )

होळकरांच्या-नरसिंहांच्या छाव्यांचा फटका
कवी ' नरहरी' गर्जुनि गातो, सावधान ऐका ॥ धृ ० ॥

* * *

पवित्र, सुंदर, रांकट, मोहक महाराष्ट्र देश
नरवीरांची खाणच केवळ, त्यांत खानदेश

त्या प्रांतामधिं पोर वयामधिं मातुलगृहिं मल्हारी
शेळ्या वाळित दिवस कंठितां होय नवल भारी !

ऊन तापलें, पोर भागलें, निजलें बांधावरी
भुजंग मोठा फणा काढुनि छत्र धरी त्यावरी

पाहुनि कौतुक, कौतुकले जन म्हणति 'थोर पुरुष–
मल्हारी हा होइल खासचि,' होय जनां हर्ष

शेळ्या सोडुनि कटितटिं बांधुनि खड्ग स्वार झाला
बांडे यांच्या फौजेमध्यें उत्साहें शिरला

शौर्य पाहुनी मल्हारीचें द:खनचा बाजी–
प्रसन्न झाला, घेउनि गेला, राष्ट्राच्या काजीं

एका मागुनि एका पराक्रम करुनी स्वामीला
तोषविले बहु मल्हारीनें ' सेनापति ' बनला

* * *

गो-ब्राह्मण-प्रतिपालक शिव-नृप महाराष्ट्रदेशा-
स्वातंत्र्याची सुधा पाजुनी, हलवी दिल्लीशा
छत्रपतींची दमली पुढती विजयी समशेर
पेशवाइची बाहिर आली नंतर तलवार
दिल्लिपतीचा माळव्यांतला सुभेदार जोर-
करूं लागला, प्रजा जाहली त्या योगें जेर !
तधीं माळवा द:खनदेशा आरोळी मारी
हांके सरशीं बाजी धाडी तिकडे मल्हारी
द:खनचा हा सिंह लोळवी दिल्लीचें धूड
शत्रूचीं तो नरडी रगडीं, फोडि काड काड !
उत्तरेंत मग नाच नाचला द:खनचा भाला
दरडावी मग हिंदुस्थाना द:खनचा डोळा
रणगाजीच्या पराक्रमा या बघुनि पेशव्यानें
' सुभेदार'-पद मल्हारीला दिधलें प्रेमानें
मालवप्रांतहि दिला तोडुनी मल्हारीराया
होळकरांची मुहुर्त-मेढचि रुजलि मालवी या

* * *

सुखांत माती पडली हर! हर! दैव आड आलें
मल्हारीवरि संकट मोठें अवचट कोसळलें
कुंभेरीच्या वेढयामध्यें सुत कामा आला
गगन फाटलें, अग्नीचा जणुं वर्षा तो झाला !

* * *

कालाची गति वक्र जाहली गिलचे शिरजोर
होउनि म्हणती 'करूं मराठा क्षणांत हा ठार'
वार्ता ऐकुनि विश्वासासह सदाशीवराव
समर कराया सज्ज जाहला, मिशीस भरि ताव
पाटीलबावा, सुभेदारही अनेक सरदार
चालुनि गेले गिलच्यावरती बेखट्के दूर
पानपतावर तोंड दिलें मग युद्धाला त्यांनीं
त्या युद्धाचें वर्णन करणें शक्य न शब्दांनीं
सूर्यावरती मेघ धांवले, झाला अंधार
विजयश्रीची माळा तुटली, हो हाहाकार
मोत्यें गळलीं दोन, हरपली सत्ताविस रत्नें
रुपये, खुर्दा किती सांडला गणति न हो यत्नें
लाखावरतीं सहज बांगडी पानपतीं फुटली
नुकसानी ती भरण्या वर्षें तीस हीं न पुरली

दगडाची परि करूनि छाती स्वीकृत कार्याला
सोडी ना आमरणचि स्थैर्ये लाजवि मेरूला

* * *

शूर जातिचा, थोर मनाचा, सच्चा दिलदार
वीराचे वीरत्व पाहतां गर्जे लल्कार
'भले बहाद्दर! भले बहाद्दर! वा! रे! वा! वीर!
रुपये घालुनि ढाल भरारे याची भरपूर'
मल्हारीचा अजब दरारा हिन्दुस्थानांत
नांव काढतां रडतीं पोरें होति गप्प शांत
आणि दावितां घोडयाला जर घेइ न तो पाणी
'मल्हारी कां जलांत?' गिलचा पुसत तया लागुनी

* * *

सुख दुःखाला समान लेखुनि कर्तव्यीं रमला
रंकाचा तो राव जाहला स्थापी राज्याला
होळकरांच्या गादीचा तो मूळपुरुष ऐसा
कर्मयोगि प्रत्यक्ष वाटणें नवल न हें सहसा
मल्हारी–अवतार संपला मालेराव गेला
देवि अहिल्या राजस्नुषेवर राज्यभार पडला
भवतापानें जरी गांजली मनीं पोळलेली
कर्तव्याला तोंड द्यावया कटीबद्ध झाली

अबला असुनी राजकारणीं लाजवि मुद्‌सद्दी
बघतां तत्कृति महापुरुषही हो कुंठित बुद्धी

दंगेधोपे लुटालूट ही मार पोळ जाळ
हाणामारी मनगटजोरी होता तो काळ

सेनानायक तुकोजि म्हणुनी त्याला अधिकारी
रिपुदंडाला नेमुनि, ठेवी सूत्रें करिं सारीं

मालवदेशीं राखि शांतता रामराज्य केलें
'धन्य अहिल्या साध्वी राज्ञी ' जनगंगा बोले

* * *

भील, भिलाले, ठक, रामोशी, चोर, वाटमारे,
नांव सतीचें परिसुनि ठेविति खालिं शस्त्र सारे

राघु भरारी धनलोभानें देवीवर स्वारी
करण्या सजला त्यास युक्तिनें फिरवी माघारी

* * *

किती मंदिरें, किती घाट ही, किती धर्मशाला,
किती बावडया, कती विहीरी, गणती न हो त्याला

आर्यावर्ती तिनें बांधिल्या, किती सदाव्रतें
तिनें स्थापिलीं, कोण जाणतो, मन हें गोंधळतें

क्षेत्र न ऐसें एक भारतीं ज्या ठायीं सतिचें
धर्मकृत्य नच दृष्टीस पडतें, वर्णुं किती वाचें ?

भूतदयेची कमाल केली शेतें पिकवोनी
पशुपक्षांनां करी मोकळीं खाया लागोनी

मानवजन्मीं पुण्यें अपुल्या देवपणा मिळवी
सच्चारित्र्यप्रभाव तीचा अखिल जगा दिपवी

नाम सादृशें वंचित होउनि कोणी कवि इजला
गौतमपत्निस उपमित परि मज वाटे तो चकला

चरित कलंकित पूर्व तियेचें विसरुनि तो गेला
घसरुनि म्हणुनी दुरुपमेच्या गर्ती तो पडला

देवि अहिल्ये ! तुझीच उपमा तुला नसे अन्य
अजरामर तव नाम जाहलें जगांत तूं धन्य

होळकरांचे कुल नच नुसतें अखिल भारताचें
कूळ अहिल्या साध्वी देवी पावन करि साचें

राज्यशकट हा सात्विकभावें वर्षें ती तीस
चालवुनीया देवी गेली मग निजधामास

देवीचा अवतार संपला—तुकोजि ही शीघ्र
नंतर गेला, तत्सुत आला लढत पुढें व्याघ्र

यशवंताची तडफ अजब ती भाल्याचा मारा-
कठिण, सोसवे कुणां न, पळती मग सैरवैरा

क्षणांत शिंध्या, क्षणीं पेशव्या, क्षणीं भोंसल्याला
क्षणांत जाटा, क्षणीं रोहिल्या, क्षणीं फिरंग्याला

क्षणीं पठाणां, क्षणीं रजपुतां, क्षणांत भिल्लांनां
क्षणांत या, मग क्षणांत त्या, करि जर्जर सर्वांनां

पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण, भाला खेळिवला
गनीमि-कावा-लढवय्यांचा शिरोमणी बनला

नांव ऐकतां यशवंताचें थरारती सारे
'नको नको तो प्रसंग त्याशीं' म्हणती 'देवा ! रे'

मित्रां जितुका प्रेमळ तितुका शत्रूंशीं क्रूर
विजातियें ही त्यास ठरविले 'वीरांचा वीर'

ग्रहें न कोणा परी सोडिलें, फिरलां तो काळ
'कधीं असें मग कधीं तसें' हा दैवाचा खेळ !

होळकरांचा समरसिंह मग निद्रावश झाला
निजला कसला शौर्यस्तंभचि कडकडुनी पडला !

होळकरांच्या वीर-रसाचा अंकचि शेवटला
इथें संपला, पडदा पडला, काल पुढें फिरला

*　　　*　　　*

वीरस्त्री ती तुळसाबाई, मल्हारीराव
मार्तण्डही तो, हरीराव मग करिति खंडेराव-

राज्य या परी अनुक्रमें ही, तुकोजि मग दुसरा
गादी वरती आला गमला कोंदणांत जणुं हिरा !
काल सुखाचा होता तेव्हां पूर्ण शांततेचा
आपसांतलें वैर जाउनी प्रेमवर्धनाचा

करारनामें, तहनामें ही होउनि दोस्तीचे
इंग्रेजांशीं नातें जुळलें होतें मैत्रीचें
समय असा अनुकूल पाहुनी तुकोजि नृपतीनें
अखिल भारतीं देशाटन ही केलें हौसेनें

मध्येंच अवचित एकाएकीं आली बंडाची
धामधूम ती आर्यावर्तीं वेळा गरदीची
प्रसंग मोठा होता दुर्धर परी खैर झाली
खूप शर्तिनें इंग्रजास या मदत फार केली

बंड मोडलें शांत जाहलें चहूंकडे जेव्हां
तुकोजिरायें लक्ष घातलें संस्थानीं तेव्हां

*                *                *

काळ बदलला, ध्येय बदललें, कार्याचें क्षेत्र
बदलुनि गेलें नवल न यामधिं गमतें अणुमात्र

तारायंत्रें, लोहमार्ग ही, सूतयंत्र पाही
ठायीं ठायीं सडका राज्यीं, डांकेच्या सोयी
जमीन-महसुल-शिस्त बांधिली. भूमिमापना ही
करुनी, पाणी बंधारे ही उभारिले कांहीं
विद्याखातें, उद्यमखातें, काढुनि मुलखांत
सुधारणा किति नव्या नव्या त्या आणी अमलांत
रंका रावा लहानथोरा प्रजाजनां सकला
समान लेखुनि पाळी प्रेमें भूप धन्य झाला
शिस्तशीर पण वक्तशीर ही करुनि कारभार
चहूकडोनी तयें मिळविला बहु जयजयकार

*　　　*　　　*

भूप शिवाजी नंतर गाजी आले गादीवर
कठिण दरारा, रुवाब मोठा त्यांचा सर्वांवर
विशाल-बुद्धी, अचाट शक्ती, भेदक बहु दृष्टी
असो कसा ही कुणी तयाची गाळण उडवी ती
हांक मारतां तयें, कांपरें भरे शरीरांत
पुढें जावया शक्ति नुरे ती कांहीं पायांत
हलकट, पाजी, नीच, मस्त, जे दुष्ट, दगलबाज
हरामखोरा अशा नरांनां दंडियलें तेज !

संस्कृतप्राकृतइंग्रजिभाषाकोविद बहु रसिक
तया सारखा दुर्मिळ केवळ हजारांत एक

साहित्याचा, संगीताचा, कलाकुशळतेचा
भोक्ता मोठा आधारचि तो होता सर्वांचा

कर्णासम ही दाता होता, मानी मुलखाचा
गुणीजनांचा खरा पारखी, सच्चा वचनाचा

उच्च शिक्षणांसांठीं मोठी स्थापि पाठशाला
वेतनवृत्या विद्यार्थ्यांना देइं अनेकाला

राजमंदिरें ठायीं ठायीं अनेक बांधियली
शिल्पकलेच्या निपुणाईची कमाल बहु केली

राज्य यापरीं करुनि सुखानें विश्रान्ती घेई
राज्यभार मग पुत्र सवाई तुकोजि शिरिं देई

*   *   *

राव तुकोजी, तान्हा तुकोजी, तुकोजी महाराज
सवाइ तुकोजी, महाराजांचें खरेच महाराज

राज्याची तो सूत्रें हातीं घेतां नेटानें
परोपरींचीं जनहितकार्यें साधी प्रेमानें

प्राथमीक तें शिक्षण मोफत सक्तीनें करूनी
विद्यामृत मधु प्रजाजनांला पाजी मायेनीं

विधवाविवाह नवा कायदा करुनि दीन अबला
पुनर्विवाहा इच्छिति त्यांचा मार्ग खुला केला
बालविवाहें समाज खंगे हें मनिं आणोनी
बाल-लग्न-प्रतिबंध-कायदा केला कळवळुनी

नव्या युगाच्या, नव्या मतांच्या प्रजाजनांसाठीं
लग्नाचा तो नवा कायदा करुनि, आडकाठी-
जाति-जातिंतिल दूर सारिली; प्रेमी-जीवांला
एक व्हावया कायद्यान्वयें हक्क पुरा दिधला

शेतकरी जो राज्यस्तंभचि तत्स्थिति सुधाराया
पेढया काढुनि सवलति देउनि सुखवी या समया

पंचायतिच्या, संस्था स्थापुनि गांवोगांवीं ही
प्रजाजनांला न्याय मनसुबा समजुनि तो येई

झीज सोसुनी व्यापाराला उत्तेजन देई
नित्य नव्या सवलती द्यावया मागें नच घेई

प्राचीपश्चिम सुधारणांचा नित्य गोड मेळ
घालुनि, रक्षी प्रजाजनाला धन्य लोकपाळ !

न्यायनिपुण तो, कार्यदक्षही प्रजापालनांत
स्वप्निं, सुषुप्तीं, जागृतींत ही मनिं प्रजाहेत

ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र या चारी वर्णाला
समान दृष्टी लक्षी, नाहीं भेदभाव कसला

हिन्दू , ख्रिश्चन, यवन, शीख वा कुण्याहि धर्माचा
असो प्रजाजन समान दृष्टी लक्षी नृप साचा

रामराज्य तो आज करी या इंदुर-संस्थानीं
किती गोडवे गावें त्याचें नच बल कविवचनीं

दीर्घायुष्या तुकोजि भूपा मल्हारीराया !
देई, राखी सुखी तयाला विनती तव पायां

* * *

पित्यास साजे असाच आहे अमुचा युवराज
प्रजाजनानां अम्हा वाटतो केवळ धृतिराज

असुनि बाल वय, सोडुनि आलय, जाउनि इंग्लंदीं
आनंदी तो वृत्ती ठेउनि शिक्षण संपादी

महाकार्य जें करावयाचें असें पुढें त्याला
योग्य व्हावया त्याच्या साठीं करित तयारीला

होळकरांच्या मुर्दुमकीचें मुद्सद्दीगिरिचें
सात्विकराजसतेजगुणाचें मूर्त रूप साचें-

युवराजा तूं यशवंता रे ! प्रजाजनां गमसी
हृदयें सारीं सहज तयांचीं आकर्षुनि घेसी

*                *                *

नव्या मनूचा, नव्या दमाचा, नव आकांक्षांचा
युवराजा ! तूं पुतळा, अमुच्या भावी आशांचा
श्रीमल्हारीमार्तंडप्रभु मार्कंडेयांचे
आयु तुला तो देवो चरणीं विनति हीच त्याचें

वाढदिवस तव आनंदाचा युवराजा आज
म्हणुनि कवीला वाटे भावें पूजावें तूज

होळकरांची सद्गुण पुष्पें वेंचुनि ही माला
अभिनव रचिली, इजला प्रेमें कंठीं हो घाला

रंग न जाईल, वास न जाइल, अद्भुत ही माला
सुकेल कधि नच, जपुनी कंठीं बाळगणें इजला

*                *                *

होळकरांचा फटका ऐकुनि, चटका जरि नाहीं
मना लागला, कवी 'नरहरी' लटका तरि पाही

१९२२

## 'मित्रा'मत

### अंजली.

[ १ ]

व्योमीं तारक ते अनंत दिसती मोठे तसे सानही
तेजाचें परि एक जीवन अहा ! सर्वांत त्या खेळतें.
सृष्टी नित्य नवीं फुलें प्रसवते नानापरीचीं जरी,
आहे एकच तो सुगंध गुण कीं सर्वांत सांठीवला.

रत्नें सोज्ज्वल भिन्न भिन्न परिचीं भूगर्भि तीं लाभतीं,
दीप्तीचा परि धर्म एकच तयांमाजी दिसे दाटला.
मोतीं सांपडतीं महोदधितळीं नानातऱ्हेचीं जरी,
पाण्याचा गुणधर्म एकच वसे सर्वान्तरीं तो परी.

नाना चित्रविचित्र रंगविति तीं चित्रें चितारी पहा,
छाया आणि उजेड योग्य भरणें, हें तत्त्व कीं एकच.
काव्यें नित्य कवी नवीन रचिती नानापरीचीं जनीं,
काव्याचा गुण तो रसात्मकपणा हा एक सर्वांतला.

होती या जगतीं महापुरुष जे त्यांच्यांतलें एकच
ध्येय-प्राप्ति मिळावयास झटणें, हें मर्म वाटे निकें.

[ २ ]

"यावज्जीव करीन गे निशिदिनीं मी मातृभाषे ! तुझी–
सेवा ग्रंथ लिहोनियां, लिहवुनी विद्वज्जनांहीं तसे;

मी दावीन करोनि मुद्रणकला पाश्चात्य देशासम;
क्रांती मी घडवोनि आणिन पहा या आपुल्या मासिकीं
गेली चित्रकला तिचा करिन मीं उद्धार यत्नें महा;
मी लावीन पुन्हा जनां अभिरुची साऱ्या नव्या वाङ्मयीं;

ज्ञानाचा नव लाभ देइन तसा मी आपुल्या स्त्रीजनां;
मी देईन सदैव लेखकगणां प्रेमादरें मान्यता;
सामाजीक तशींच राष्ट्रिय मतें तीं प्रागतीकें जुनीं
ठेवाया जनतेपुढें कधि न मी पाहीन मागें पुढें."

ध्येयें या परिचीं मनीं धरुनियां संस्था 'मनोरंजन'
स्थापोनी तशि चालवी अधिक जो पंच्वीस वर्षांहुनी
कर्ता मित्र असा जरी हरपला येई न कोणा रडें !
दु:खाचा नग थोरला जणुं महाराष्ट्रावरी कोसळे !

[ ३ ]

गेल्याचा परि शोक काय करणें, गेलें न तें ये पुन्हां,
ज्ञान्यांच्या वचनांस या स्मरुनियां धीरास द्यावें मना

पुष्पांजलि.

वर्षांची गणना न आयु-गणना, कार्येंच तन्मापन
यत्कार्यें जगतांत तोच जगला, आयुष्य कीं सार्थ तें.
मित्रा ! या नियमें न तूं मृत, परी आहेस जीवंत, रे
दुःखक्षोभ कशास हा मग उगा अस्मन्मना पाहिजे?

जीं ध्येयें धरुनी पुढें निजबळें कार्यें तुवां थाटलीं
त्यांचे लालनपालनास झटणें प्रेमें तयां पोसणें;
कर्तव्या असल्या पवित्र करुनी, ठेवूं तुझी ती स्मृति
आम्ही संतत जागृता निज मनीं, मित्रा! जिवाच्या सख्या

वर्षश्राद्ध तुझें अजी, ह्मणुनियां हें शारदासेवक
प्रेमें लेखमिषें तिलांजलि तुझ्या आत्म्यास द्याया उभे
मीही प्रेमभरें जुना तव सखा ही अंजली अर्पुनी
आत्म्या शांति तुझ्या, चिरायुपण ही याची मनोरंजना!

१९२१ मासिक मनोरंजन

# पुष्पांजलि.

## शुद्धीपत्र.

| पृष्ट. | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३ | ११ | अशी | अती |
| ३ | १३ | सखीस्तव | सखीसह |
| ८ | १३ | जगा | जगीं |
| ९ | १२ | जनी | जनीं |
| २० | ५ | पाहिज | पाहिजे |
| २१ | १ | वाईस | ताइस |
| २१ | ६ | ठउनि | ठेउनि |
| २१ | ७ | येई | येइ |
| २१ | ८ | गाली | गालीं |
| २१ | १६ | यणें | येणें |
| २२ | ४ | कुसुमस्थित | कुसुमस्थिति |
| २३ | ३ | प्रीति | प्रीती |
| २३ | १४ | प्रीति सागरीं | प्रीतिसागरीं |
| २४ | ४ | येती | येति |
| २४ | ५ | प्रीति | प्रीती |
| २५ | ५ | प्रेमचंद | प्रेमचंद्र |
| २९ | १२ | सांगा | सांग |

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३२ | १६ | स्थिति | स्थिती |
| ३४ | ३ | पाहुनि | पाहुनी |
| ३६ | ३ | जरी | जरि |
| ३७ | १४ | घेऊनी | घेउनी |
| ३९ | ७ | पुरे, | " पुरे, |
| ४० | १६ | तदव्याख्या | तद्व्याख्या |
| ४१ | ६ | कव्हां | केव्हां |
| ४९ | ५ | जाईल | जाइल |
| ४९ | ९ | सखे ? | सखे ! |
| ५१ | १३ | चांफकळीपरि | चांफेकळिपरि |
| ५६ | ८ | येऊं | येउं |
| ५७ | ६ | हाय ? | हाय ! |
| ६० | ८ | मल ? | मला ? |
| ६० | १३ | काणी | कोणी |
| ६१ | १४ | माते | मातें |
| ७७ | १३ | वाऱ्यावरता | वाऱ्यावरती |
| ८४ | ५ | बसते | वसते |
| ८८ | १४ | तरा | तरी |
| ८९ | १६ | अह ! | अहा ! |
| ९८ | ६ | ऐकुनी | ऐकुनि |
| १०० | १० | नटविलें | नटवीलें |
| १०० | १८ | गाण | गाणें |
| १०८ | ८ | घेउनी | घेउनी |

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ११२ | १८ | विषयीचा | विषयींचा |
| ११३ | ६ | सुधारणें | सुधरणें |
| ११५ | १३ | आम्हिच | अम्हिच |
| १२७ | १ | छे ? | छे, |
| १२७ | ८ | रडाया ? | रडाया ! |
| १२९ | १५ | दया ! | दयाळा ! |
| १३६ | ४ | झोंक | झोंके |
| १४२ | ९ | एसें | ऐसें |
| १४२ | १४ | पण | पूर्ण |
| १४९ | १५ | कुणि | कुणी |
| १५० | ४ | स्नान | स्थान |
| १५१ | ११ | एकाचें | एकीचें |
| १६२ | ८ | पर्ण | पूर्ण |
| १७२ | ७ | शांतता | शांतशा |
| १८६ | १ | एका | एक |
| १८९ | १४ | कतीं | किती |
| १९४ | १७ | सक्तीनें करूनी | सक्तीचें करुनी |

